म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र. ९८०८५

IRBK-0116085
IRBK-0116085

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 JUL 1976

27 JUL 1976

14 AUG 1976

21 JAN 1977


22 SEP 1977

18 MAY 1979


10 JUN 1979


MAY 1983

[ कृ. मा. प. ]



# स्टर के






५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 AUG 1975
25 AUG 1975
2 SEP 1975
15 SEP 1975
10 OCT 1975
8 OCT 1975
12 NOV 1975
28 NOV 1975
7 JAN 1976
25 FEB 1976
2 MAR 1976
18 MAR 1976







# ट्रिंग-ट्रिंग-फास्टर फेणे

भा. रा. भागवत

IRBK-0116085

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© भा. रा. भागवत
१९७४
म—३६३

पहिली आवृत्ती १९७४/१८९६

सजावट :
**राम वाईरकर**

मुखपृष्ठ :
**प्रभाकर खानोलकर**

प्रकाशक :
**रामदास भटकळ**
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

मुद्रक :
**श. म. देव**
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार पेठ
पुणे ४११ ०३०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १६०८५ नों. दि. १६/०२/०७
वि. ७/ ५T.

# ट्रिंग-ट्रिंग-चा अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| फास्टर फेणे लेखक बनतो | .... | १ |
| फोन करतोय फास्टर फेणे | .... | २२ |
| पार्सलबाजी अंगाशी आली ! | .... | ३१ |
| फास्टर फेणेची घोडदौड | .... | ४६ |
| फास्टर फेणेचे मार्जारी प्रकरण | .... | ६५ |
| फास्टर फेणेचे काश्मिरी साहस | .... | ८७ |

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ....... नों. दि ..........
वि. ....... ......

# फास्टर फेणे लेखक बनतो !

[ बन्यानें स्वतः सांगितलेली साहसकथा ]

ट्रिंग-ट्रिंग !- ओ हॅलो ! मी फास्टर फेणे बोलतोय्.-साधना कचेरी ना ?—येस्-येस्-दि सेम चॅप ! नेफा आघाडीवरून नुकताच परत आलोय्. कुमार अंकाची मुदत भरत आलीय. अन् मला किनई-पेन वापरायची सवय नाही. शाईने बोटं माखतात. ' आयडीआं 'साठी डोकं खाजवायला लागलं की नाकतोंडही माखतं. म्हणून म्हणतो....अ....डिक्टेट केली नाही.—नाही, रागवू नका !—बरं, चालेल. कथामालेत सांगेन....तोंडी. मग लेखनाचं पाहू.

कुमार अंकासाठी काहीतरी लिहावं ही आयडीआ आली तेव्हा मी नेफा आघाडीवर होतो. जी-सेव्हन ठाण्यावर घमासान लढाई झाली; त्यानंतर लामाचं सोंग घेऊन आलेल्या एका चिन्याचं टाळकं मी सडकलं ते तुम्हाला आठवतं ना ? तेव्हाची गोष्ट आहे. कमांडरसाहेबांनी माझं दाबून अभिनंदन केलं. पण त्याच वेळी बजावलं, की आता कंप्लीट रेस्ट घे; देवासारखा बसून राहा; कुठेही कडमडू नकोस. मी तोंडाने आवंढा गिळला होता; अन् कानांनी

ते शब्द गिळले होते. दोन दिवस कुठेही कडमडलो नाही. देवासारखा बसून राहिलो. टपालातून मासिकं येत ती चाळली. त्यात साधनेचा अंक चाळला. कुमार अंकाची जाहिरात त्यात वाचली. आणि समोरच्या आरशात टवकारून पाहिलं. माझ्या डोळ्यांत काहीतरी पाणी चमकलेलं दिसलं. मी टाळ्याला जीभ लावली. अन् आवाज काढला—" ट्टॉक् ! "

रात्रभर मला झोप आली नाही. मेंदू जसा काही पेटला होता. काहीतरी शिजत होतं. काय कुणास ठावकी ! पण इतकी वर्षं पुण्याला शांतपणे शाळेत घालवली तेव्हा कधी सुचलं नाही ते बेटं आत्ता सुचत होतं. माझ्यातला कलाकार जागा झाला होता. तो म्हणत होता—" तू काहीतरी चिताड—किंवा खरड. "

चिताड ? कधी जन्मात चित्र काढलं होतं का या फास्टर फेण्याने ? बसलो काढायला तर रेघोट्या काढून ठेवीन नुसत्या. आणि पेन्सिलीपेक्षा रबरांचाच उपयोग जास्त करीन.

चालेल—मन म्हणालं, खूप खाडाखोड केलीस तर टोन येईल तुझ्या रेषांना. मग हाफटन ब्लॉक करून छापतील संपादक.

हाफटन ! बाप रे ! म्हणजे भलताच मोठा !

आणि हे बघ. वेडंवाकडं काही काढलंस तरी चालेल. हल्ली चालतं. तो पक्वाशा नावाचा एक म्हातारा आहे युरोपात. तो तर म्हणे कपाळावर मिशा नि पोटात डोळा काढतो. अन एकेका पिक्चरचे लाख पौंड घेतो !

मी म्हणालो, ते त्याला जमत असेल—म्हणजे लाख पौंड घेणं ! मला साधं बक्षीस पण मिळणार नाही. चित्र बित्र नकोच. लेख लिहीन मी. गद्य—पद्य वाटेल ते. मन म्हणालं, बरं, पण उद्याच लिही. मुदत संपत आली आहे.

लगेच मला कविता सुचायला लागली. नेफा—नेफा ! शेफाऽरला चिनी

माका ! देखा-देखा ! पण डोकं भणभणलं त्या शब्दांनी. मोहोळ बनलं जसं काही मधमाशांचं ! गुं–गुं–भुं–भुं–म्हटलं, नकोच ते कविता करणं ! पद्य नको; गद्यच बरं. मन म्हणालं, अरे गद्‍ध्या, हल्लीचं पद्य पण गद्यच असतं. पण मी त्याची दादागिरी चालू दिली नाही. म्हणालो, गद्यच बरं. त्यात पुन्हा ती निबंध वगैरेची भानगड नको. तिथे परीक्षेच्या हालात जमलं नाही ते इथे जंगलात कुठचं जमायला ! त्यापेक्षा–गोष्ट ! तव्येत गोष्ट लिहू आपण !

पण गोष्टींचे प्रकार तरी थोडे का असतात? छप्पन्न प्रकारच्या छप्पन्न गोष्टी ! झालं ! पुन्हा डोकं भणभणायला लागलं. ट्रीमेंडस गोंधळ उडाला त्यात ! मुंबईच्या रस्त्यावरून चालते तशी वर्दळ सुरू झाली. आवाजांचा आरकेस्ट्रा सुरू झाला. मोटरी पोंपों करू लागल्या–त्या युद्धकथा असाव्यात. मांजराचं म्यांव म्यांव, कुत्र्यांचं भों भों–प्राणिकथा ! मधूनच सायकलींची किण् किण्–सुर्र. म्हणजे काय जणं काय ते ! कविताच डोकावत असावी ही. डोक्यावरनं जेट घुमत होतं. ती रहस्यकथा असावी. केव्हातरी विमान केव्हातरी शिट्टी ! कशाचा कशाला मेळ नाही ! छे ! छे ! ! छे ! ! ! डोक्यात ट्रॅफिक जॅम झाला अगदी ! वाक्यं एकमेकांना आडवी तिडवी जात होती. लेख असे डोक्यातच एकमेकांना अडकायला लागले तर ते बाहेर कसे पडणार ? बडे लेखक अशा वेळी काय करतात ? की त्यांच्या डोक्यांत कधी ट्रॅफिक जॅम होत नाही ? देवाने काही खास तरतूद केलीय की काय त्यांच्या डोचक्यांत ? मुंबईत केंप कॉर्नरवर तो फ्लाय-ओव्हर नावाचा पूल बांधलाय. तशी काही तरतूद ? असेल बाबा ! आपल्या डोक्यात तसे पूल बील नाहीत !

पुलावरनं आगगाडी आठवली. त्या मघाच्या ट्रॅफिकमधनं तेवढीच सटकली होती. धडाड–धाड धडाड–धाड करत जाणारी लोकल म्हणजे जंक्शन टॉप साहसकथा ! –दॅट्स् इट ! एखादी साहसकथाच लिही की लेका तू– आघाडीवरची शौर्यकथा ! यंग मॅम, ते ओल्ड मनं म्हणालं, लाखो पोरं आहेत

या महाराष्ट्रात. त्यांना कुणाला मिळाला नाही असा चान्स तुला मिळाला अन् भारत-चीन लढाईत तू चक्क भाग घेतलास ! मग आता एखादी जबर-दस्त थ्रिलिंग कथा लिहून स्पर्धेत घे की भाग ! नशिबात असेल तर येईल छापून ! पण लिहून उद्याच्या उद्या पोस्टात टाक, बरं का ?

ट्रॅफिकला जरा वळण लागलं. जाइए— चालली गाडी रुळांवरनं. पण तेवढ्यात बेटा डोळा लागला. परेडचं बिगुल वाजलं तेव्हा तो उघडला. आता डोकं तब्येत बनलं होतं. टॉप गीअर. आणि ब्लॅक—कोरं. हवा मात्र भादव्यासारखी होती. घुसमट, कोंदट, उबट. अशी हवा असली की मग एकदम वारं सुटतं, वादळ होतं म्हणे.

उठलो. टमरेल भरलं, आणि छावणीच्या हद्दीबाहेर गेलो. हातातली चीज पाहिल्यावर संत्र्याने अडवलं नाही. कदाचित् त्याला असंही वाटलं असेल, की टमरेल समजा फक्त शोभेला असलं अन् बेत सटकायचा असला तरी वाईट काय त्यात? पीडा गेली. हवी आहे कुणाला ही फास्टर फेणेची कटकट ! सुंठीवाचून खोकला गेला !

खोकला बराच लांब लांब लांब गेला. जातच राहिलो मी सारखा. उतारा-वरून खाली जात राहिलो. लक्ष होतं कुठे ठिकाणावर ? हे हातात काय धरलंय नि कशासाठी ते पण विसरून गेलो. काय म्हणता ? लक्ष कुठे होतं ? अहो, कुमार अंकावर ! साहसकथेच्या प्लॉटमध्ये मन गुंतलं होतं. हळू हळू ठीकठाक गोष्ट उलगडत होती.... मेंदूचा ड्रायव्हर गाडी लायनीवरनं नेत होता.

आता गाडी कुठून कुठून जाते ते नीट लिहून काढायला हवं होतं. यू नो व्हॉट आय मीन ! गोष्ट कागदावर उतरायला हवी होती, सूनर दि बेटर— आपलं बेटर. शुभस्य शिघ्रम्— आपलं शीघ्रम्. नाही तर परत जाईस्तो विसरून जायचं !

गेला हात खिशात. आलं पेन्सिलीचं थोटुक बाहेर. नेहमीप्रमाणे तिला टोक नव्हतं. पण सुदैवाने कागदाची दुहेरी घडी घातलेलं एक पाकीट निघालं. त्यात ब्लेड होती. सगळी मला सांगतात, ब्लेड खिशात ठेवायची नसते. अगदी कबूल. कालच मी निश्चय केला की पुन्हा म्हणून ब्लेड खिशात ठेवायची नाही. ही माझ्या बोटाला गुंडाळलेली चिंधी दिसते ना – आय मीन, त्या वेळी दिसत होती — तो ब्लेडनेच दिलेला प्रसाद ! लगेच मी ब्लेड फेकून द्यायचं ठरवलं होतं. आणि ती दुसऱ्या कुणाच्या हाताला लागू नये म्हणून एवढी बंदोबस्तात गुंडाळली होती. आता ती फेकून देण्यापूर्वी पेन्सिल तासण्यासाठी तिचा उपयोग होणार होता. योग असतात एकेक !

मी पेन्सिल तासू लागलो. एकदम आठवण होऊन पुन्हा खिशात हात घातला. इथे नाही – तिथे नाही. कुठेच नाही. औषधालाही खिशात कागद नव्हता ! ती ब्लेडला गुंडाळलेली चिटोरी दाटीवाटीने छापलेल्या मजकुराची होती. शिवाय त्यांना चण्याच्चिवड्याचं पिवळं लागलेलं होतं. यूसलेस ! चणे आहेत तर दात नाहीत, दात आहेत तर चणे नाहीत !

माझी थोर निराशा झाली. आय् मीन घोर. आता परत छावणीवर जाऊ तेव्हा लेखन होणार. मी हातातल्या टमरेलावर डोळे वटारले. हे आणलं नसतं, कागदच आणला असता तर साहेब लोकांसारखा ? आत्ता त्याचं सोनं झालं असतं !

मी ते यूसलेस टमरेल खाली टाकणार तोच –

टक्क – टण्ण –

दोन दगड आले होते. पहिला माझ्या टकुऱ्यावर आपटला– दुसरा आपटला टमरेलावर ! बोटांना झिणझिण्या आल्या अन् टमरेल खाली पडलं.

दरम्यान डोळ्यांपुढे काजवे चमकत होते. माझं डोकं आभाळात चाललं होतं. त्या टेंगळामुळे उंची वाढली असावी ! मी डाव्या डोळ्याने डावीकडे

अन् उजव्या डोळ्याने उजवीकडे पाहिलं.— म्हणजे जेमतेम कसंबसं. मला दिसलं की दोन बाजूंना दोन माणसं उभी आहेत. त्यांतला एक दुसऱ्याला हाताने दटावतो आहे — टमरेलावर दगड मारून आवाज केल्याबद्दल. टकुऱ्याला मात्र त्याची हरकत नसावी.



अर्धा क्षणच हे दटावणं झालं. मग दोघे माझ्या अंगावर चाल करून आले. एव्हाना मी आभाळातून भुईवर आलो होतो. मुंडी खाली घालून मी सूर मारणार तोच त्यांनीं दोन्हीकडून येऊन माझे दंड पकडले. इकडून याने, तिकडून त्याने.

मी गप्पकन् आवंढा गिळला अन् डावीकडे पाहिलं. हात्तिच्या ! हा तर जवान ! — हं, त्या संत्र्याने कंप्लेंट केली असणार, म्हणून मला पकडायला आलेत. मुसुंबी लेकाचे ! येतो की हो मी. पण प्लीज— कागद आहे का हो एखादा ?

हे प्रश्न मनातच राहिले. कारण ते उच्चारण्यापूर्वीच ते दोघे खदखदा

हसले होते. मी त्यांच्याकडे निरखून पाहिले. — ड्रॉक ! त्यातल्या एकाचा पोशाख जवानाचा होता. पण ते कुणीच भारतीय नव्हते. ती बथ्थड नाकं नि ते पिचापिचे डोळे ! दोघेही भाई भाई चिनी असणार. पण वेट ! काही गुरखे नि तिबेटी लोक पण जरा जरा असे दिसतात की. नो, आपली पहिली शंकाच खरी. कारण तेवढ्यात मला भाषा ऐकू आली—

" चिंग टॉंग बुंग लांग फिन्— "

" मिंग चांबा जुंग जुंग— "

एकमेकांचं पटलं अशा अर्थी दोघांनी माना डोलावल्या. मग नंबर एक माझ्यावर गुरगुरला,

" लामा— लामा— कायकू उसकू पकड दिया ? "

नंबर दोन : " हम तुम्हारा बदला लेंगे ! तुमकू अभी ले जायेंगे हमारा कमांडरके पास ! "

" किधर है वह ? " मी भोळसटपणे विचारले. मनातला उद्देश हा की असला जवळपास तर लगेच पकडून द्यावा. पण नंबर एक खेकसला, " पिकिंगमे. "

" पेकिंग ? — म्हणजे चीनमध्ये नेणार तुम्ही मला ? "

" ऑफ् कोर्स ! तो क्या डेल्ही ले जाऊ ? — "

" पण— पण— " मनात भीतीचा गोळा उठला होता तरी मी कोरड्या घशातून बोललो, " पण मला आधी कागद देता का एक ? हमकू लेख लिखना है ! "

" कागद ? "

" पेपर ! "

" पेपर ? – लिखनेके लिए ? मांग लिंग टांग बक्का ! तुम क्या समझा हमकू ? संदेसा भेजनेके लिए तुमकू पेपर देंगे हम ?"

मी दोन्ही हात लुळे सोडले. भयंकर निराशा झाली माझी. गोष्टीचा मसाला डोक्यात तयार होता आणि हे बुद्दू लोक नसत्या शंका काढून मला तो कागदावर उतरू देत नव्हते. व्हॉट नॉन्सेन्स !

मी एकदम त्यांच्याकडे वळून म्हणालो, " थोडा वेळ छोडो हमको ! जाएंगे, एक लेख लिखेंगे और वापस आयेंगे ! – शप्पथ ! "

नंबर दोनच्या हाताचा पंजा सपाट्याने पुढे आला आणि एक झणझणीत लाफा माझ्या थोबाडात बसला. माझं तोंड त्याने दाबून धरलं. माझा गाल लालीलाल झाला. ते मघाचे काजवे पुन्हा गर्दी करू लागले !

त्या दोघांनी माझे दंड धरले आणि मला फरपटत रानांत चालवलं. एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. त्यांना शक्य तितक्या लवकर मला तिथून हलवायचं होतं. जास्त आरडाओरडा होईल आणि कुणाच्या तरी कानांवर पडेल म्हणून ते भीत होते.

मला त्यांनी जिथे नेलं ती जागा दाट झाडीत होती. मुंग्यांची वारुळं, छोटे उंचवटे अन् रानरोपांच्या जाळ्या यांची तिथे दाटी होती. वर उंच वृक्षांच्या लांब लांब फांद्या एकमेकींना भिडल्या होत्या.

अशाच एका मोठ्या वृक्षाखाली त्यांचा मित्र नंबर तीन होता. त्याचा पोशाख साध्या नेपाळी माणसासारखा होता. पण हातात सातबारी पिस्तूल होतं ! दगडगोट्यांच्या राशीआड झाडाला टेकून तो इसम एका सतरंजीवर बसलेला होता.

पहिल्या दोन सैतानांनी मला धाडकन् ढकलून दिलं. मी सतरंजीवर आपटलो; पडलो. दोनतीन ठिकाणी खरचटलं, आणि आणखी दोन टेंगळं

आली. ते राक्षस माझ्याकडे पाहात खदखदा हसले. नंतर तीन आपल्या रुमालाचा बोळा माझ्या तोंडात कोंबू लागला. मी त्याला हात जोडून म्हणालो, " आधी मला एक कागद द्या. मी गोष्ट लिहितो. मग माझी वाट लावा ! "

मित्र हो, तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण खरोखरीच मला त्या वेळी भीती-पेक्षा काळजीच जास्त वाटत होती. डोक्यात कथा तयार आहे तोवर ती जर लिहिली नाही तर ही संधी हुकणार. मग कसला कुमार अंक नि कसलं लेख छापून येणं !—काही झालं तरी हे बदमाष मला मुदतीच्या आत सोडतील हे शक्य दिसत नव्हतं. कदाचित् खरोखरच ते माझी पेकिंगपर्यंत फरड काढतील. म्हणजे संपलंच सगळं !

भीती ?— भीती अगदीच वाटत नव्हती असं नाही. हो, उगाच बंडलं कशाला मारू ? तसा मनातून भीतही होतोच. पण त्याचं असं आहे माझ्या मित्रांनो—प्रसंग आला, की मनुष्य आपोआप धीट बनतो. देवच त्याला धीट करतो. एरवी घरी शांतपणी विचार करताना आपल्याला खरंसुद्धा वाटत नाही, की आपण कधी काळी तलवार गाजवू किंवा बंदूक उडवू ; पण वेळ आली की होतं सगळं आपोआप.

शिवाय मी लढाई पाहिली होती, तिच्यात भाग घेतला होता, शत्रूचे हेर पकडले होते. याचा थोडा परिणाम होतोच की. त्यामुळे या खेपेस मनाला भीती तेवढी बांधली नाही. लस टोचावी तसं झालं.

पण खरी गंमत वेगळीच होती—माझ्या मनात त्या चिन्यांना फारशी जागाच नव्हती. नो रूम ! माझ्या मनात तो प्लॉट घोळत होता. ती गोष्ट कागदावर उतरायची मला चुटपुट लागली होती. म्हणून मी कागद मागितला.

इकडे त्यांनी केली होती फराळाची तयारी. तिघांपुढे तीन कागद मांडले होते. मी ' कागद ' म्हटल्यावर त्यांना वाटलं, यालाही भूक लागली आहे. त्यांनी माझ्यापुढे एक कागद ठेवला. मी पाहिलं तर त्यांचे कागद होते पाठकोरे. मांझांच तेवढा दोन्हीकडून लिहिलेला. मी वैतागलो अन् एकदम बोललो, " हमकू वह कागद हवा ! " ते ऐकून जवानाचे कपडे घातलेला चिनी चिडला. अन् मला मारायला धावला. तसा मी मूग गिळून बसलो. त्यांना वाटलं असेल, काय पोरागत हट्ट याचे ! एवढा काही लहान दिसत नाही ! असं त्यांना वाटलं असणार याचं कारण एकमेकांकडे पाहून ते फिसकारले, म्हणून म्हणतो.

मी मुकाट त्यांनी दिलेलं खात बसलो. कोरडे कुरमुरे नि दाणे होते. अन् कसली तरी चटणी. तिला मी बोट लावलं नाही. हो, झुरळाची असली तर काय घ्या ?

खाता खाताच वाऱ्याने माझा कागद उडाला. भेळ जमिनीवर सांडली. मला वाटलं, बरं झालं– आता तरी पाठकोरा कागद मिळेल. पण त्यांचं लक्ष नव्हतं. त्याचं खाणं संपून ते आता गप्पांत नि पाणी पिण्यात गुंतले होते. मी निमूटपणे त्यांच्या पुढ्यातला एक कागद ओढला. अन् गोष्ट लिहायला सुरवात केली.

मास्टरजी ! ऐशी रंगलीय गोष्ट म्हणून सांगू ? ओळीमागून ओळी, पॅऱ्यांमागून पॅरे—एक कागद संपला. दुसऱ्याच्या पुढचा ओढला. तो संपला. तिसरा ओढला. ज्याम रंगली ! आता चौथा एकच कागद हवा होता. कारण गोष्टीचा एंड अगदी जवळ आला होता. तिसऱ्या पानाच्या शेवटी हीरोचा एंड आला होता. पण हीरो ग्रेट ! त्यामुळे चौथ्या पानात तो पलट खाणार होता. यमावर मात करून मला गोष्टीचा एंड करायचा होता; पण चौथा कागद मिळेना. माझं लक्ष त्यांनी पलीकडे टाकलेल्या पिशवीकडे गेलं. त्या

पिशवीत पाठकोरे कागद होते. मी पटकन् हात घातला अन् चटकन् काढला. मग मटकन् त्या कागदावरच बसलो. कारण ते तीन दैत्य एकदमच माझ्याकडे वळून पाहात होते.

" ए छोकरा ! क्या करता है ? "

" पेपर कैसा मिला तुमकू ? क्या लिखा बोल ! "

' जवान ' मला मारायला धावला; त्याला दुसऱ्याने आवरले. तो ' टिंग लिंग ' करीत काहीतरी बोलला. त्याच्या हावभावावरून मला असं वाटलं की तो म्हणत असावा—" अरे, काही का लिहीना ? आपल्याच ताब्यात आहे तो. सगळं लिहून झाल्यावर कागद आपलेच आहेत ! " " चिंग— भिंग—" म्हणजे " हो, तेही खरं " तिसरा म्हणत असावा. " त्याने तरी करायचं काय इथे माशा मारीत बसून ? "

त्यांचा हा संवाद होत आहे तोच दुरून बोलणं ऐकू आलं. कुणी तरी येत होतं. तीन शिलेदार खडबडून उठले. एकाने आपला रुमाल माझ्या तोंडात कोंबला. दुसऱ्याने आपल्या रुमालाने माझे हात बांधले, तिसऱ्याचा रुमाल माझे [illegible]कड बांधता झाला आणि अस्मादिकांच्या अंगावर सतरंजी घातली गेली. उर[illegible] तेवढं बाहेर होतं; पण त्याला आडोसा करून नंबर दोन बसला होता [illegible]डलेले तोंडात बोळा असल्यामुळे माझं हूं का चूं होत नव्हतं !

चारपाच लाकूडतोडे आले अन् आमच्याकडे पाहात पाहात निघून गेले. कुणाला काही शंका आली नाही. चिन्यांनी असं दाखवलं की जसे काही वी आर नॉट ऑफ देअर व्हिलेज ! ते गेल्यावर नंबर तीन दरडावून म्हणाला, " वह पेपर किधर है ?—लाव ! "

मी नुसती डोळ्यांची हालचाल केली. तोंड दाबलेलं. बोलणार काय ? माझ्या दातांखालीच ते तीन कागद होते. त्यांनी हिसकावले अन् वाचण्याचा प्रयत्न केला. त्यांना काय डोंबल कळणार त्यातलं ?

पण तेवढ्यात एक भलताच घोळ झाला. एकाएकी जोरदार वारं सुटलं. सुसाट वादळी वारं ! वाळकी पानं भुर्रदिशी चकरा खात उडायला लागली. माझे ते गोष्टीचे कागद पण त्यांच्या हातातनं उडाले. म्हणजे दोन उडाले. एक गेला उडत दक्षिणेला. दुसरा गेला उडत पश्चिमेला.

" अरे–पकड–पकड ! " करीत तो नंबर तीन उगाचच नाचायला लागला. नंबर एक नि नंबर दोन उठले आणि ते कागद पकडायला धावले. नंबर तीन जागेवरच बसून राहिला. माझ्यावर बंदूक रोखून.

मला टॉप मजा वाटली. नाहीतरी हात बांधलेले, पाय बांधलेले, तोंडात बोळा ! करायचं काय नुसतं उताणं पडून? बरं झालं–एवढी तरी मजा बघायला मिळाली.

दुसरी पण एक मजा होती. त्या नंबर तीनला ती कळली नाही. ती ' सेव्हन ओक्लॉक ' होती ना माझ्या खिशातली–ती जवळच पडली होती. सपाट आडवी नाही–चांगली उभी तिरकी, एका दगडाला टेकून. लगेच माझे हात तिकडे वळले होते. आणि–चर्ऽर्ऽर्ऽ–रुमाल कापला गेला होता. हात मोकळे होते माझे. ग्यात

नंबर तीनने माझ्याकडे पाठ केली होती. मुद्दामन् गा्ी; वाऱ्यासाठी असणार. त्याला थोडीच माझी काळजी होती? चक्क माझ्या पायांवर बसला होता तो दांडगेश्वर ! हाताचं बोळकं करून चिल्मीत काहीतरी भरीत होता. अफू असणार !

वारा घोंघावत होता. पानं उडत होती. धूळ डोळ्यांत जात होती. पण तरी या तीन नंबरच्या चिन्याला कशी माती चारावी हे मला कळत नव्हतं.

तेवढ्यात वर नजर गेली. पानांत काहीतरी खसबसलं. वारंच होतं म्हणा पॉवरफुल ! फांद्या हलल्या तर नवल नाही. पण मी तिकडे पाहात होतो; अन् पाहता पाहता माझा एकेक डोळा बघा एवढाला झाला ! कारण

वर पानांत जी हालचाल होत होती ती नुसतीच फांद्याची नव्हती. हातां-पायांची पण होती. कुणीतरी प्राणी बसला होता तिथे!–माकड!–नाही–नाही. मुलगा माझ्यासारखाच मुलगा–ओः ब्वॉय!

मी घशातल्या घशात ' ड्रॉक् ' केलं. कारण तो बोळा होता ना तोंडात?

झाडाच्या एका उंच फांदीवर एक मुलगा बसलेला होता. वाटले, तो मुलगा नाही; माझा जिगर दोस्त हरबान!–आघाडीवरचा माझा मित्र! असं दुपारच्या वेळी कुठच्या तरी झाडावर बसायची सवयच होती त्याला.

खरंच होता की तो हरबान!

पानांची दाटी खूप होती; त्यामुळे आतापर्यंत तो मला दिसला नव्हता. त्याने मला आधीच पाहिलं असावं; कारण तो केव्हाचा मला खुणा करीत होता. माझी ' कंडिशन ' त्याच्या ध्यानात आली होती.

तो आता मला खुणेने विचारीत होता, " तू उठून पळत का नाहीस? तो बदमाष दुसरीकडे बघतो आहे तेवढ्यात पळ!"

मी खुणेनेच उत्तर दिलं, " पळ बोलायला काय लागतं गाढवा?–या सतरंजीखाली दडलेले माझे पाय बांधलेले आहेत. "

" पण हात तर मोकळे आहेत ना?" हरबानने मनगटांच्या फिरक्या फिरवीत विचारले. " मग उचल तो बाजूचा धोंडा नि घाल त्याच्या डोक्यात?" त्याने, पोरी छप्पापाणी घालताना करतात तसे हात केले.

मी उजव्या हाताची मूठ वळून पहिलं बोट तेवढं वर रोखलं. आणि त्याला सांगितलं, " पिस्तूल आहे त्याच्याजवळ. "

" कपाळ माझं! " हरबानने ॲक्टिंग केलं.

माझं लक्ष तेवढ्याच दुसऱ्यात एका फांदीकडे गेलं. हरबान उभा होता

त्या फांदीच्या खाली ही दुसरी फांदी होती. तिला एक पोळं लटकत होतं. भलं मोठं काळं कुळकुळीत, भरगच्च, थबथबीत. हरबानचं तिकडे अजून लक्ष गेलं नव्हतं हे एक नवलच की! आता मी त्याला ते दाखवलं तशी तो घाबरून झाड उतरणार होता. पण मी तेवढ्यात खूण करून त्याला थांबवलं. पुढचा डायलॉग मी शब्दांत सांगतो—झाला मात्र खुणांनी.

"ते पोळं हलव. म्हणजे इथे हैदोस उडेल."

"आणि माझी काय वाट?"

"तू पलीकडच्या फांदीवर जा अन् सरसर उतर."

"यह बेकार होगा. नुसतं पोळं हलवून त्या चिन्याचं काय वाकडं होणार? त्याच्या अंगावर पाडलं पाहिजे."

"मग पाड."

"पाड म्हणे! कुऱ्हाड आहे होय माझ्यापाशी?"

"ही ब्लेड घे."

हरबानचे दोन्ही हात दोन्ही गालांवर चटपट फिरले. "ब्लेड घेऊन काय हजामत करायची आहे?"

पडल्या पडल्या मी त्या खालच्या फांदीकडे एकटक पाहात होतो. मला एकदम वाटलं, फांदी काही मोठीशी मजबूत नाही. लहानशी, काटकोळी अन् वाळकुडी तर आहे. कदाचित्—कदाचित् ती मोडता येईल.

मी संदेश पाठवला, "ती फांदी मोड. — नाच तिच्यावर दणादण!—"

ही आयडीआ हरबानला पटली असावी. क्षणभरच तो बिचकला. कारण यातही धोका होताच. त्याला माशा चावल्या असत्या. पण काटेगा तो काटने दो! उसमें क्या है? दोस्तासाठी एवढं पण करायचं नाही?

हरबान ग्रेट आहे !

वरच्या फांदीला गच्च धरून त्याने खालच्या फांदीवर लाथा हाणायला सुरवात केली. एक–दोन– तीन–

वारा आता फर्स्ट गीअरमध्ये आला होता. नंतर तीनची चिलीम दहादा पेटली, दहादा विझली. तोही हट्टाला पेटला होता. अफू की काय ओढीत होता, देव जाणे. पण त्याची नशा त्याला चढली होती. मी पळून विळून जाईन अशी भीती त्याला मुळीच वाटत नव्हती. त्यातून बैठकीखाली माझ्या पायांच्या नळ्या त्याला बोचत होत्या ना –मग वस्स तर ! या फास्टर फेणेची हाडं म्हणजे माशाचे काटे !

आणि तरी—वारा घों घों करीत होता तरी–हरबानच्या प्रत्येक लाथे-बरोबर ठेका धरून मी 'खॉक' करीत होतो. त्याच्या लाथेचा आवाज बुजावा म्हणून ! नंतर तीनने एकदा वळून माझ्याकडे पाहिलंही. तो म्हणाला, "खॉक-खॉक क्या करता है ?"

"खुः खुः खुः—" मी दाबलेल्या तोंडातून खुलासा केला. तो खदखदा हसला. मग त्याने दूर दक्षिणेला पाहिलं. आपले जोडीदार अजून आले नाहीत म्हणून त्याला क्षणभर काळजी वाटली असावी. पुन्हा तो आपल्या चिलमीत मग्न झाला.

तिकडे हरबानने चौदावी लाथ हाणली आणि फांदी काडकन् मोडली. पण आतापर्यंत पोळ्यातल्या माशा बाहेर पडल्या होत्या. अन त्याला दोन तीन ठिकाणी चावल्या होत्या. आता खालची फांदी तुटताच तो वरचीला वेंघला अन् तिच्यावर उभा राहून झरझर झाड उतरू लागला.

इकडे फांदी पोळ्यासकट खाली आली अन् चिनी माकाच्या डोक्यावर पडली. त्याला मधाचा झकपैकी शॉवर मिळाला ! तो उठून उभा राहिला आणि तांडव की काय म्हणतात तसा नाच करू लागला.

मी उठलो. ब्लेड हातात घेऊन पायबंद तोडले. आणि एक झेप टाकून खाली पडलेली बंदूक उचलली.

इतक्यात त्याचे दोघे जोडीदार धावत येताना दिसले. गॉश ! त्यांच्या हातांत माझ्या लेखाचे कागद पण होते. जिवाच्या मोलाची साहसकथा !



मधाने बरबटलेल्या त्या चिन्याच्या अंगावर मी सतरंजी घातली अन् वर उभा राहून गर्जना केली– " हिलना नही ! हम गोळी झाडेंगे ! "

पुढला चिनी–नंबर दोन–खाडकन् उभा राहिला. त्याचा हात खिशा-कडे चाललेला पाहून मी सणकन् गोळी झाडली.

" ओऽय् " त्याने हात झटकला आणि मागे सरून तो बोटं चोखू लागला.

तिकडे त्याच्या मागे नंबर एक उभा होता. जवानाच्या पोशाखातला चिनी दुश्मन !

त्याचं सोंग हरबानलाही माहीत होतं. नुकताच हरबान झाडाखाली उतरला होता. खोडाला बिडगून आड आड उभा होता. आता त्याने मागनं

जाऊन बेधडक त्या चिन्याच्या पाठीवर उडी मारली अन् दोन्ही हात त्याच्या गळ्याभोवती टाकून तो ते आवळू लागला.

" ओऽय्–ओऽय्– "

" निकाल तेरा हात जेबमेंसे ! "

चिन्याचा हात खिशाबाहेर आला–मोकळाच ! हरबानचा हात त्या खिशात शिरला. पिस्तूल बाहेर निघालं अन् त्याची नळी त्या चिन्याच्या पाठीला भिडली. इकडे हरबानच्या लाथा त्याच्या पेकाटात बसू लागल्या.

सगळीकडे एकच चिलचिलाट झाला. कारण मधमाशांनी कहर मांडला होता. शत्रू-मित्र कुणी न पाहता त्या साऱ्यांनाच भंडावत होत्या. माझ्या तोंडाची आग होत होती. हातांना सुया बोचत होत्या. हरबानचं थोबाड म्हणजे खरबूज बनलं होतं !

आता आणखी मस्ती करणं शक्यच नव्हतं. नशीब आमचं की आमच्या दोघांच्याही हातांत पिस्तुलं होती. हरबान मुंडी हेलवीत ओरडला, " फास्टर फेणे ! चलो, भाग जाएंगे यहाँसे ! "

मी माझ्याच गालांवर थपडा मारीत म्हणालो, " चलो !–लेकिन ठहरो जरा ! तुम इनके ऊपर नजर रखो ! "

मी नंबर तीनच्या खिशात हात घातला अन् माझ्या गोष्टीचं तिसरं पान काढलं. नंबर दोनच्या खिशात हात घातला. दुसरं पान काढलं. हे सगळं हरबान पाहात होता. अजून तो नंबर एकच्या मानेवर स्वार झालेला होताच. सिंदबादच्या त्या म्हाताऱ्यासारखा गच्च आवळून बसला होता. मी दोन पानं मिळवलेली पाहून पहिलं पान काढण्यासाठी त्याने चिन्याच्या डाव्या खिशात हात घातला. चिन्याने उजव्या खिशातून पान काढलं आणि चुरगळलं. पण कमाल आमच्या हरबानची ! त्याने चपळाईने उजव्या हाताने ते हिसकावून

घेतलं अन् पिस्तुलाचा एक रट्टा त्याच्या डोक्यावर हाणून त्याला 'ओऽय्' करायला लावलं.

मी ते क्रमांक एकचं पान घेतलं आणि माशा डसत होत्या तरी खूप खूप खुषी वाटली मला. मग सतरंजीखाली दडवलेला तो चौथा पाठकोरा कागदही मी खिशात घातला आणि माझं ते रफ हस्तलिखित विजेच्या वेगाने नजरेखालून घातलं. पण हाय रे दैवा! देव देतो नि कर्म नेतं म्हणतात तसं झालं. वाऱ्याचा एक सपाटेबंद झोत आला. आमची सर्वांचीच त्याने दाणादाण उडवली. आमचीच केवळ नाही—त्या मधमाशांचीसुद्धा. त्याही बिचाऱ्या पांगल्या.

आणि ते तीन मौल्यवान कागद? त्यांना तर वाऱ्याने माझ्या हातातनं भुर्रदिशी उडवून दिलन्!

"माझी कथा— माझी कथा—" करीत वेडापिसा होऊन मी त्या कागदांमागे धावलो.

हरवानने चिन्याची मान सोडली आणि त्याच्या पाठीत एक लाथ लगावून तोही माझ्या मागे पळत आला. मध्येच तो थांबायचा. अन् मागे वळून पिस्तूल रोखायचा. मध्येच स्वतःला थपडा मारायचा. कारण माशा डसल्या ते दुखत होतंच की!

माझी पण तीच स्थिती होती. मीही स्वतःला मारीत होतो. पण सारखा धावत होतो—त्या हस्तलिखिताच्या मागे. जवळ जवळ मैलभर धावलो आम्ही. पंजाब मेलसारखे.

तिकडे ते तीन चिनी झाडाखालीच चकरा मारीत होते. फिरत होते—स्वताभोवती. बराच वेळ ही गिरगिर माता केल्यावर ते कुठेतरी पळाले असावे. पाण्यात डोचकी बुडवायला बहुतेक. कारण आम्हाला तसंच करावंसं वाटत होतं. पण ते जाऊन जाऊन जाणार कुठे म्हणा? त्यांचे मुखडे असे रिमार्केबल.

बनले होते की कुणाच्याही नजरेने ते टिपले असते. तिचेही झाले होते हॉस्पिटल केस, आणि त्याच्या पश्चात् होणार होते कैदखान्याची केस. आधी वाऊ आणि मग पाऊ— POW– प्रिझनर्स ऑफ वॉर !

पण अगोदर हवे होते ते स्टोरीचे कागद. काही केल्या गावेनात. एकदा अगदी हाताशी आले. पुन्हा चकवून उडाले. मग वावटळीत चकरा खात खात खूप वर जाऊन कुठे तरी दिसेनासे झाले. कुठे गेले देव जाणे ! जगाच्या पाठीवर कुठेही गेले असणार. पण एक ठिकाण सोडून. ते ठिकाण म्हणजे साधना कचेरी ! चांगलीच धूळ फेकली त्यांनी आमच्या डोळ्यांत. खरीखुरी धूळ, पण चिकार गेली डोळ्यांत.

मी उभा राहिलो अन् डोळे चोळीत म्हणालो, " हरवान ! मेरे तकदीरमेंच नही लेखक बनना ! लिखा– लिखा– बहुत लिखा; लेकिन आखिर उड गया सब वारेपर ! "

" शोक नही करना, मेरे यार ! " हरवान माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला. आणि मग अकस्मात् त्याटे दोन्ही हातांनी गाल चोळीत किंचाळायला सुरवात केली.

" उ–ई ! " मी ओरडलो अन् खाली बसून पोटऱ्या चोळल्या. " आई–ग ! " पुन्हा ओरडलो अन् दोन्ही गालांवर फाडफाड थपडा मारल्या.

" तिघांनाही पकडून तुरुंगात डांबलं आहे " कमांडरसाहेब म्हणत होते. हरवानला नि मला त्यांनी भरघोस शाबासकी दिली होती आणि आम्ही बँडेज बांधलेल्या हातांनी शेकहँड करून ती स्वीकारली होती. आमच्या डोक्यालाही मलमपट्ट्या बांधलेल्या होत्या, ईजिप्तमधल्या मम्या असतात ना, तसे दिसत होतो आम्ही. पण त्याचं दुःख नव्हतं. किंवा शाबासकीचं एवढं सुख नव्हतं. मन सारखं टोचीत होतं— घालवलंस ना शेवटी हस्तलिखित ? आता पुन्हा लिहिण्याची आहे का ताकद ?

‘ नाही ’ मी भीत भीत म्हणालो. उगीचच म्हणालो मनाचं समाधान करायला. ‘ पण एवढं काही वाटून घ्यायला नको ’ मी पुढे म्हटलं. ‘ अर्धवटच तर होती गोष्ट. पुरी असती तर गोष्ट निराळी ! ’

‘ ऑह ! ’ माझं मन चिडवायला लागलं. ‘ म्हणे पुरी असती तर ! पुरी करणारच होतास तू ! म्हणून तर तो चौथा पाठकोरा कागद घेतलास ! ’

ओशाळवाणं तोंड करून मी खिशात हात घातला आणि तो पाठकोरा कागद काढला. त्याच्या मागे बॉलपेनने लिहिलेला मजकूर होता. तो चिनी भाषेत होता.

माझ्या मागे पंडितजी उभे होते ते एकदम बोलले, “ आँ ? यह क्या बात है ? —लिस्ट ? ” पंडितजी म्हणजे आमच्या छावणीतले चिनी भाषेचे दुभाषी.

“ लिस्ट ? ”

“ यह तो यादी मालूम होती है. ”

कमांडरसाहेबांचं लक्ष तिकडे वळलं ते म्हणाले, “ कसली यादी ? ”

“ नाम हैं यह सब—” आणि असं म्हणून पंडितजींनी भराभरा ती नावं वाचली.

“ कॉंटॅक्ट मेन ! ” कमांडरसाहेब गंभीरपणे उद्गारले. “ चिन्यांना माहिती पुरवणारे बदमाष ! — जमादार—”

“ जी साब ! ”

“ या तमाम लोकांच्या घरांवर धाड घाला आज ! — फास्टर फेणे, हरवान तुम्ही लोकांनी जाता जाता हे पण काम झकास केलंत !—शेक—”

त्यांनी हात पुढे केला. पण मी भीत भीत बोललो, “ एक्स्क्यूज़ मी सर —हात सुजत चाललाय माझा—”

" गो देन्—बोथ ऑफ् यू. अँड टेक कंप्लीट रेस्ट ! देवासारखे पडून राहा. "

आणि आमच्या स्वाऱ्या परत देवघराकडे चालल्या. शाबासकी मिळाली हो खूप. देशकार्यही घडलं हातून. पण—पण लेखक होणार होतो त्याचं कसं काय ? ती स्पर्धा नि तो कुमार अंक— सगळं स्वप्नच राहिलं की. त्यानंतर चार साडेचार वर्षं गेली. काहीही लेखन केलं नाही पुन्हा म्हणून या पठ्ठ्याने !

आमच्या लेखनाचा फज्जा कसा उडाला त्याचा असा आहे किस्सा ! कसा काय वाटतो ?—काय म्हणता ? हा किस्साच लिहून काढू ? सांगितला तसा पानावर उतरायचा ? आणि धाडून द्यायचा यंदाच्या कुमार अंकासाठी !

ग्रॅक् ! दॅट्स् ॲन आयडीआ ! अजून काही माझं वय तसं गेलेलं नाही. त्या वेळी किशोर गटात मोडलो असतो. आता कुमार गटात मोडेन, पण मोडेन !

[ " मोड लेका ! " — त्या वर्षीचे कुमार अंकाचे संपादक. ]

# फोन करतोय फास्टर फेणे....

बन्या ऊर्फ फास्टर फेणे याची एक मानलेली आत्या संभाजी पुलाच्या पलीकडे राहायची. तिच्याकडे तो क्वचितच जाई. कारण पुष्कळदा आत्या नि आतोबा पुण्यात नसतच.

या आत्याच्या बंगल्यावर घडलेला एक चित्तथरारक प्रसंग आता सांगतो– ऐका !

त्या दिवशी देवकुळ्यांच्या छोट्या मधूने फार हट्ट धरला म्हणून त्याला सायकलीच्या दांड्यावर बसवून बन्या फिरायला निघाला होता. " पंधरा मिनिटांत परत येतो ". असे त्याने मधूच्या घरी सांगितले होते. पण हवा थंड मजेशीर होती अन् बन्याच्या रॅलेचे रोलिंग मस्त होते, त्यामुळे त्याला वेळेचे भान राहिले नाही. तो आपला सारखा पेडल हाणीत राहिला. हर्ष-चकित झालेला मधू म्हणाला, " खूप खूप लांब जायचं ना, बन्यादादा ? "

" ऑं ? " मधूच्या प्रश्नाने तो एकदम भानावर आला. " नाही रे.... आपल्याला लवकर परत गेलं पाहिजे. कुठे आलो आपण– पाहिलंस ? हे

कोथरूड, तो आमच्या आत्याचा बंगला." आणि मग त्याच्या स्वरात आश्चर्य उमटले. "हे काय? आत्याच्या फाटकाशी मोटार? आली की काय मंडळी परत?"

दोन्ही बाजूंस उंच झाडे असलेल्या एका गल्लीत आत्याचा बैठा बंगला होता. बन्या सायकलवरून उतरला तशी मधूनेही खाली उडी मारली. सायकल कुंपणाला टेकून ठेवून बन्याने एकवार बंगल्याकडे अन् मग त्या मोटारीकडे पाहिले. मधल्या एका खोलीत उजेड दिसत होता खराच. पण – पण– ही मोटार आत्याची दिसत नव्हती. काळीच खरी, पण ही होती ॲम्बॅसेडर, आणि आत्याची गाडी आहे फियाट!

म्हणजे आत्यात्रिया गावाहून आली, इतकंच नाही तर त्यांना भेटायला पण आलं वाटतं एवढ्यात कुणी तरी?....पण – पण आत्याची गाडी तर कंपाउंडच्या बाहेरही दिसत नाही अन् आत पण दिसत नाही, हे कसं काय? की आत्या कंपनी दुसऱ्या कुणाच्या तरी गाडीतून आली? हो, तसंच असणार. कारण तो पाहा आत्याचा फिलिप्स रेडिओ मोटारीत दिसतो आहे! पण - पण या मंडळींनी रेडिओ कशाला गावाला नेला होता? तो काही ट्रान्झिस्टर नाही.

बन्याचे कुतूहल आणखीच वाढले. त्याने फाटक उघडले आणि मधूचा हात धरून तो आत शिरला.

पण तेवढ्यात त्या जुन्या फाटकाचा केवढा तरी आवाज झाला होता – कर्रर्र!

बन्या उर्फ फास्टर फेणे उगीचच चमकला होता. अभावितपणे त्याची नजर त्या खिडकीकडे गेली होती. तो कर्रर्र आवाज झाला तरी आत एवढा वेळ भिंतीलगत उभी असलेली कुणीतरी व्यक्ती चपापून खिडकीकडे वळली असावी. कारण तिची काळी सावली खिडकीच्या पडद्यावर उमटली. त्या

व्यक्तीने पुढे केलेला हातही क्षणभर त्या सावलीत दिसला. मग लगेच दिसेनासा झाला. त्या माणसाने हात मागे घेतला असावा. पण क्षणभरच दिसलेल्या हाताच्या त्या सावलीने बन्याला बुचकळ्यात पाडले. आकृती पुरुषाची होती आणि त्या हाताचे एक बोट बरेच लांबलचक असावे. पण– पण ते लांबलचक बोट पुढे करून तो काय दाखवीत होता अन् कुणाला दाखवीत होता ?

आणि मग एकाएकी बन्याच्या डोक्यात प्रकाश पडला. ते बोट नव्हतंच मुळी– ते होतं पिस्तूल !

म्हणजे आत्याच्या घरची मंडळी अजून आलेलीच नसणार. अन् बंगला अगदी एकीकडचा. जवळपास कुठे पोलिस चौकी नाही. अन् बंगल्यात जो माणूस उभा आहे तो साधासुधा नाही. तो नक्की चोर असणार– डाकू ! घरातलं सामान लुटतो आहे तो– रेडिओ बिडिओ !

बन्या ऊर्फ फास्टर फेणे ताठ झाला. त्याच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला होता. मधूच्या हातावरची त्याची पकड एकदम इतकी घट्ट बनली, की तो कळवळून पुटपुटला, "ए ! केवढ्याने दाबतोस हात ?"

बन्याने नाकावर बोट दाबून डोळे वटारले– "चूप !"

एक मिनिट त्याने झटपट विचारात घालवले. मग त्याने 'ट्टॉक्' केले अन् तो आपल्याशी म्हणाला, 'पोलिस तर जवळपास नाहीत. आणि या दांडगोबापुढे माझ्यासारख्या बाळकुड्याची ताकद ती काय ? पण नुसती बडबड करून यांना घाबरवलं तर ? कदाचित् जातीलही पळून !' मग करू पोलिसांना फोन. गाडीचा नंबर आहे ४५२३ बी बाय. क्षण दोन क्षण तो छोट्या मधूकडे रोखून पाहात होता– 'हे पोरगं हुशार आहे. तेव्हा–'

एकदम मधूला जवळ ओढून बन्याने त्याच्या कानात काहीतरी सांगितले बराच वेळ लागला ते सांगायला. पण तो पोरगा समजायचे ते समजला.

उत्तेजित चेहऱ्याने नि विस्फारलेल्या डोळ्यांनी तो आपल्या वड्या मित्राकडे पुन्हा पुन्हा पाहात होता. मग त्याने " तू मुळीच काळजी करू नकोस " अशा अर्थी मान डोलावली.

मग दोघे मिळून बंगल्याच्या दरवाजाकडे निघाले ते मोठमोठ्याने बोलतच ....

" कमाल आहे तुझी बन्यादादा ! म्हणजे तू रोज येत असतोस इकडे ? "

" रोज ! आत्या कंपनी गावाला गेल्यापासून रोज. माझ्याजवळ बंगल्याची दुसरी किल्ली आहे आणि बाबांनी बजावून ठेवलंय की रोज एकदा बंगल्यावर फेरी मारायची ! कुलूप उघडून बंगल्यात सगळं ठाकठीक आहे ना ते पाहायचं; इथून बाबांना 'ओके' म्हणून फोन करायचा आणि मगच घरी परत यायचं. अरे बाबा, काही झालं तरी माझी आत्या मोठी जहागीरदारीण आहे आणि बाबांची ती लाडकी. आणि बाबा पडले पोलिस इन्स्पेक्टर ! "

" हं !– पण आज काही फोन बीन करायला नको. "

" आज नको रे ! आज आत्याच आलेली दिसतेय ! चल, आपण तिला भेटून येऊ–"

हे सर्व बोलणे इतक्या मोठ्याने झाले होते की बंगल्यातल्या माणसाने ते नक्कीच ऐकले असणार. आणि तेवढ्यात बघा–आत टेलिफोन किणकिणला ट्रिंग-ट्रिंग, ट्रिंग-ट्रिंग–

त्या माणसाने रिसीव्हर लगेच उचलला असावा. कारण घंटी वाजायची थांबली. पण तेवढ्यात कुणीतरी गुरगुरले, " गधा कहींका ! –बुद्दू ! रख दो वह फोन ! "

म्हणजे कमीत कमी दोन माणसं होती म्हणायची आत !

" कहूँ – बंगलेमे कोई नही है ? "

" रख दो ! "

लगेच फोन धरलेल्या माणसाने चाचरत सांगितले, " नहीं जी – रॉंग नंबर ! " आणि रिसीव्हर ठेवून दिला. आणि पडदा बाजूला खिडकी-बाहेर पाहिले. लगेच हे दोघे मागे हटले.

" बाबांचाच फोन असणार ! " मधूला बन्या मोठ्याने म्हणाला. " आत्या आली की नाही म्हणून विचारणार असतील–" तेवढ्यात यांनी फोन बंद केला ! आणि मग आवाज खाली आणून तो म्हणतो, " ए ! दार उघडलं ! ते बाहेर येताहेत वाटतं ?–चल, लपून बसू ! "

पण त्यांना लपायला वेळच मिळाला नाही. कारण ते दोघे बदमाष बंगल्यातून बाहेर पडले ते सरळ या दोघांच्या अंगावर धावून आले. फास्टर फेणे एवढा प्रळ्यात पळपुटा, पण मधूला ओढण्याच्या धांदलीत तो स्वतः सापडला. आणि मधू मात्र जो वांदरासारखी टांग मारून खिडकीत चढला– आत उडी मारून त्याने सरळ फोनवर झडप घातली.

ते पाहून बन्याच्या छातीत मात्र धस्स झाले. " घाई केलीस, मध्या ! घाई केलीस ! " तो पुटपुटला.

आणि त्याची भीती खरी ठरली. मधूच्या मागोमाग बुद्दूने पण खिडकीत उडी टाकली होती आणि मधूला फोनपासून मागे ओढले होते.

दुसरा डाकूही मग बन्यासकट आत आला. खोलीतल्या दोन दोऱ्या घेऊन त्यांनी दोन्ही मुलांचे हात पाय बांधले; आणि पिस्तूल हालवीत पुढारी डाकू ओरडला, " आता बसा इथे–आत्याच्या घरची हवा खात ! वाटलं तर या खिडकीतून बाहेर कुदा आणि तुमच्याजवळच्या किल्लीने दरवाजा

उघडा !–" एकदम तो डाकू थबकला. म्हणतो, "तसं नकोच पण ! उगाच धोका कशाला पत्करा ? –बुद्दु, वह बारी बंद कर डाल, और लडकेके जेबमें चाभी होगी वह निकाल ले !"

बुद्दूने त्याप्रमाणे खिडकी बंद केली अन् फास्टर फेणेच्या खिशातली चावी तो काढतो आहे तोच पुन्हा फोन वाजला–ट्रिंग-ट्रिंग, ट्रिंग-ट्रिंग–

"फोनको मत हाथ लगाव, बुद्दू !" पुढारी डाकू ओरडला. "चल !"

ते जायला निघतात तोच बन्या म्हणाला, "नका घेऊ फोन. तुमचीच जिरेल ! मघाचा फोन बाबांचा असणार ! आत्ताचाही बाबांचा असणार ! आज माझा फोन त्यांना मिळालेला नाही आणि त्यांनी केलेल्या फोनलाही उत्तर मिळत नाही; म्हणून त्यांना शंका येईल आणि ते ताबडतोब पोलीस फोर्स घेऊन इकडे येतील. कुठेही गेलात तरी तुम्हांला ते वाटेत गाठतील. माहीत आहे ?"

मोठा डाकू थबकला त्याने कपाळावर आठ्या चढवून बुद्दूकडे पाहिले. त्याच्या मनाचा गोंधळ उडालेला दिसला.

तिकडे फोन वाजतच होता–ट्रिंग-ट्रिंग, ट्रिंग-ट्रिंग—

डाकूने काहीतरी ठरवले. पुढे येऊन त्याने बन्याचा दंड पकडला आणि दबलेल्या आवाजात त्याला दरडावले, "उचल रिसीव्हर आणि सांग बाबांना–म्हणावं, सगळं ठीक आहे. आत्या आली आहे. आमच्याबद्दल काही बोललास तर याद राख ! ही गोळी तुझ्या छातीत घुसेल !"

आणि आपणच एका हाताने त्याच्या हातात रिसीव्हर देऊन डाकूने दुसऱ्या हातातले पिस्तूल त्याच्या छातीला टेकले. बन्या घामाघूम झाला. त्याच्या डोक्यात चक्रे फिरू लागली. तिकडे मधूने ओरडू नये म्हणून डाकूने खूण केली होती, त्याप्रमाणे बुद्दूने त्याचे तोंड दाबून धरले.



"देवा–देवा–देवा–" दोन्ही हातांनी रिसीव्हर घट्ट पकडीत वन्या म्हणाला, "नाही. देवाचा धावा करीत होतो.–कोण? बाबा ना? सगळं ठीक आहे. आत्या आली कारमधून चारपाच मिनिटांपूर्वी–हो, दोन तीन दिवस आधीच आली. गुड बाय! पोलिस स्टेशनवरूनच बोलताय ना पण?– पोलिस स्टेशनवरून–" या ठिकाणी वन्याच्या दंडाला बारीकसा चिमटा बसला. "आई!–नाही. म्हटलं. सांगेन मी आईला, की तुम्हाला लवकर यायला जमणार नाही म्हणून. बरं–"

रिसीव्हर टेवला गेला. टेलिफोनपासून दूर पलंगाच्या खुरांना ही दोन मुले बांधली गेली आणि गोळा केलेल्या वस्तू घेऊन दार आपटून कुलूप लावून डाकू चालते झाले. बाहेर त्यांची मोटार निघाल्याचा आवाज झाला.

अवघ्या पंधरा मिनिटांत ते गृहस्थ आले. आत्याच्या ओळखीचे ते गृहस्थ, ज्यांनी मघाशी फोन केला होता ते देशपांडे नावाचे गृहस्थ.

फोन वन्याच्या बाबांनी केलेला नव्हता. वन्या उर्फ फास्टर फेणे याचे वडील पोलिस इन्स्पेक्टर नाहीत, ते फुरसुंगी गावचे एक शेतकरी होते हे तुम्हाला माहीत असेलच. वन्याने डाकूजवळ ज्या अनेक थापा मारल्या त्यांतलीच 'बाबांचा फोन' ही एक थाप होती. फोन देशपांड्यांनी सहज केला, पण त्यावरून मिळालेले उत्तर ऐकून ते चरकले होते आणि तावड-तोब इन्स्पेक्टर वखल्यांना घेऊन इथे आले होते. पोलिसांनी खिडक्या फोडून आत प्रवेश केला आणि तडकाफडकी या धीट पोरांची सुटका केली.

पण ही मुले संकटात आहेत हे देशपांड्यांना कसे कळले?

देशपांडे आपल्याशी हसत असता फास्टर फेणेने त्याचा खुलासा इन्स्पे-क्टरांजवळ केला. तो म्हणाला, "मी बोलता बोलता मध्येच फोनच्या तोंडा-वर हात सरकवीत होतो, त्यामुळे देशपांडेकाकांना फक्त काही शब्दच

ऐकू गेले आणि ते तुम्हांला घेऊन आले. ”

असे म्हणून त्याने कागदावर आपले शब्द लिहून दाखवले.

“ **देवा–देवा–देवा** !–काही नाही. देवाचा **धावा** करीत होतो. कोण? बाबा ना? सगळं ठीक आहे. आत्या आली **कारमधून चार पाच** मिनिटां-पूर्वी. हो. दोन तीन दिवस आधी आली. अच्छा बाय बाय!–**पोलिस** स्टेशन-वरूनच बोलताय ना?–पोलिस स्टेशनवरून?–आई!–नाही, म्हटलं, मी सांगेन आईला की तुम्हाला **लवकर** यायला जमणार नाही म्हणून!–बरं–”

यांतले ठळक टायपांतले शब्द तेवढे देशपांड्यांना ऐकू गेले!

फास्टर फेणेची ती हुशारी पाहून देशपांडेच काय, पण इन्स्पेक्टर वखले सुद्धा चकित झाले. त्याची पाठ थोपटून ते म्हणाले, “ कमाल आहे तुझ्या डेअरिंगची! आणि हा बाळ पण मोठा शूर दिसतो!–पोरांनो, तुम्ही एक मोठा चोर पकडून दिलात असं म्हणायला हरकत नाही. सगळीकडे वायर-लेस संदेश गेलेले आहेत. आणि पोलिस लवकरच ४५२३ बी. वाय्. गाडीला अटक करतील!–चला आता. हवालदार, बाहेर या बच्चे लोकांची सायकल आहे ती टाका आपल्या जीपमध्ये. सर्वांना जीपमधूनच नेऊ. ”

“ हे बरं झालं! ” फास्टर फेणे म्हणाला; आणि मधूला एकीकडे म्हणतो “ कारण सायकल असून उपयोग काय? ”

“ का रे बन्यादादा–दिवा नाही? ”

“ अरे, दिवा नसला तरी बिघडायचं नाही. इन्स्पेक्टरसाहेब आपल्याला सोडून देतील. पण–पण–सायकलचं कुलूप कसं उघडायचं? घराची चावी समजून त्या डाकूने माझी सायकलची चावी नेलीन् की! ”

▭ ▭

# पार्सलबाजी अंगाशी आली !

मार्च महिन्याची २१ तारीख होती. बन्या पुण्याला शाळेच्या वसतिगृहात राहतो. पण त्या दिवशी 'लास्ट डे' म्हणून शाळेला अर्ध्या दिवसाची सुट्टी होती; आणि बन्या आला होता मामाच्या घरी कसबा पेठेत. दुपारी मामांनी त्याला एक काम सांगितले. ब्राऊन पेपरमध्ये बांधलेले एक बंडल त्याच्या जवळ देऊन ते म्हणाले, "याच्यावर पत्ता लिही. आपले मुंबईचे प्रोफेसर उकिडवे माहीत आहेत ना तुला? त्यांचा पत्ता माझ्या डायरीत सापडेल. मला वाटतं, वसंत भवन, हिंदू कॉलनी, दादर, मुंबई १४. पण पाहून लिही; आणि मग ताबडतोब पोस्टात जाऊन रजिस्टर्ड पार्सल कर. त्यांना तातडीने हवी असलेली पुस्तकं आहेत ही. सिटी पोस्टातून केलंस तर उद्याच्या उद्या मुंबईला मिळेल त्यांना. एक्सप्रेस डिलिव्हरीचे पैसे भर!" आणि मामा कामाला निघून गेले.

बन्याने वर मान करून 'अच्छा' केले होते; आणि खाली मान घालून तो आपल्या उद्योगाला लागला होता. ते बंडल पाहून त्याला खुदकन् हसू आले होते. कारण तो स्वतः पण तसलेच एक बंडल बांधीत होता. बन्याचा

चालू उद्योग कोणता होता, माहीत आहे? तुमच्या लक्षात यावे म्हणून तर मघाशी त्या दिवसाची तारीख सांगितली मुद्दाम. ३१ मार्च. एक एप्रिलचा आदला दिवस.

बन्याने आपले बंडलही ब्राऊन पेपरातच बांधले होते. ते बंडल म्हणजे डाह्याराम लंबोदरदास मिठाईवाले यांचे एक जुने पुठ्ठयाचे खोके होते. वरच्या सोनेरी कागदावर छापलेले होते—'मिक्स्ड मिठाई.' पण आत भरलेली होती तुरटीची बर्फी, अभ्रकाचा माहिमी हलवा अन् फोलकटाचा चिवडा. धावत पळत ही सारी मिठाई त्याने गोळा केली होती. पेढ्यासाठी तो एका टांग्यामागे धावला होता. आणि मग थोडी फळे पण असावीत म्हणून त्याने करवंदे आणली होती. खरी नाहीत. त्या करवंदांकरता त्याला बकऱ्याच्या कळपात घुसावे लागले होते. ती सगळी अजब मिठाई त्याने एका छानदार पातळ कागदात गुंडाळली होती आणि त्यात एक चिठ्ठी घालून ठेवली होती.—फास्टर फेणेकडून सप्रेम भेट. एप्रिल फूल !

हे पार्सल पोस्टाने जाणार नव्हते. पुण्यातल्याच आपल्या बोर्डिंगमधल्या मित्राला—उत्तम टण्णूला तो ते पोचवणार होता. पण कर्मधर्मसंयोग असा की सगळेच तिरपागडे झाले आणि १ एप्रिल हा दिवस बन्याचा शर्यतीचा दिवस बनला. धावता धावता बिचाऱ्याची हाडे खिळखिळी झाली. थोडक्यात सांगायचे म्हणजे तो स्वतःच एप्रिल फूल झाला !

पण थांबा. मी देखील फास्टर फेणेसारखी लाँग जंप मारली की ! सुरवातीपासून सगळं सांगायला हवं, नाही का? ठीक आहे. ऐका तर— त्याचं असं झालं, की थोड्याच वेळात बन्या उर्फ फास्टर फेणे सायकलीवर टांग मारून पोस्टात गेला, आणि पाऊण तासाने बुधवार चौक, नानावाडा, जिजामाता उद्यान करीत करीत कसब्यात मामांच्या घरी परतला. मग त्याने दुसरे बंडल काखोटीला मारले आणि शाळेच्या वसतिगृहाकडे जाऊन उत्तम

टण्णूच्या बंद खोलीच्या खिडकीतून त्याने ते पार्सल आत भिरकावले. त्याला माहीत होते की उत्तमही आपल्या मावशीकडे जायचा होता. उद्या सकाळपर्यंत तो परतायचा नाही ! एक एप्रिलचे ते पार्सल टाकून फास्टर फेणे सटकला.

तो दिवस हुंदडण्यात घालवून बन्या रात्री जेवला-खाल्ला, झोपला, अन् सकाळी उठला; तेव्हा कॅलेंडरात एक एप्रिल तारीख झळकत होती. बन्याच्या मनात कालची आठवण तडकली. त्याला थुर्र झाले. तो आपल्याशीच हसला अन् म्हणाला, " आता उत्तम टण्णूचं तोंड लवकरच चिमणीएवढं होईल. पण त्या चिमणीच्या चोचीला कपभरही मिठाई मिळायची नाही. खा म्हणावं ती माती नि भुस्सा ! "

इतक्यात बाहेर टुर्र झाले. दारावरची घंटी.

बन्याने कडी काढली, तो दारात उत्तम टण्णू उभा.

" उत्तम ! " बन्या डोळे तांवारीत म्हणाला.

" सहज आलो " उत्तम म्हणाला. " पहाटे धावायला जातोच नेहमी. आज म्हटलं तुझ्याकडे यावं तुला थँक्स द्यायला—"

" थँक्स ? "

" काल माझा वाढदिवस—( ' खरं की काय ? ' बन्या पुटपुटला. ' छान ! ' ) तू लक्षात ठेवून मला भेट पाठवलीस ! किती चांगला प्रेमळ मित्र आहेस बन्या तू—"

" बरं—बरं—" अवघडलेला बन्या त्याच्या मिठीतून स्वताला सोडवीत म्हणाला. तो नुसताच अवघडला नव्हता; गोंधळलाही होता. एकेक डोळा सुपारीएवढा करीत त्याने विचारले, " भेट मिळाली तुला ? "

" कालच. "

" म्हणजे—तू मावशीकडे गेलाच नाहीस का ? "

" नाही गेलो. बेत बदलला. बोर्डिंगातच राहिलो. पण पुन्हा एकदा भेटीबद्दल थँक्स ! "



बन्या आता डोळे बारीक करून त्याच्याकडे पाहात होता. मग त्याच्या लक्षात आले. उत्तम टण्णूच्या काखोटीला ब्राऊन पेपरचे पार्सल होते. बन्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तो म्हणाला, " उघडलं नाहीस वाटतं अजून ? " मनात म्हणतो, ' काही बिघडलं नाही. अजून होशील लेका एप्रिल फूल ! '

पण उत्तम तेवढ्यात म्हणतो, " उघडलं की !—तेचे तर सांगायला आलो.—बन्या, थँक यू मेनी मेनी मच ! पण या पुस्तकांचा मला काय उपयोग रे ?—त्यांची नावंच वाचता वाचता माझ्या नाकी-नऊ आले—काय म्हणे Astro-Physical Problems in Thermo-Dynamics ! बबबब ! डिक्शनरीतसुद्धा सापडेना त्याचा अर्थ ! "

बन्याचे दोन्ही डोळे आता पिंगपाँगच्या चेंडूएवढे झाले होते. तो ओरडला, " उत्तम ! "

" अरे, काय झालं ? "

" काय झालं ? उत्पात झाला—धरणीकंप ! गडबड—घोटाळा !—हे पार्सल तुझ्याकडे आलं ? "

" म्हणजे ? "

" म्हणजे काय ? अरे, भलताच डॅम घोटाळा झाला ! —उत्तम—उत्तम—ए मामी ! "

" अरे, असं काय करतोस ? "

" ए मामी ! मी जातो ग सरळ बोर्डिंगात ! जेवायला येणार नाही ! "

बन्याने घाईघाईत पँटीत तंगड्या घातल्या, चपलांत पाय घुसडले अन् सायकलीवर टांग मारून टण्णूची डबलसीट घेऊन तो भराभरा पेडल हाणायला लागला.

बिचारा टण्णू बगलेतले पार्सल सावरीत ठेचा खात बोलला, " हे काय चालवलं आहेस तू ? माझा वाढ— "

" तुझा वाढदिवस गेला खड्—सॉरी हं ! शंभर वर्षं जग तू. "

घारपुरे हॉस्पिटलजवळ टेलिफोनचा ' बूथ ' होता. ताडकन् उडी मारून फास्टर फेणेने सायकल बूथला टेकून उभी केली. आत घुसून त्याने डिरेक्टरी

ओढली. फराफरा पाने उलटली. G-P.O-G-P-O बरोबर– Govt., Central मध्ये पाहायला हवं– हं, हा नंबर. डिरेक्टरी पुन्हा लटकू लागली; डायलमध्ये बोटे फिरली....फटीत दोन नाणी पडली....हॅलो–हॅलो....मी काल एक पार्सल केलं....GPO च ना?– काल सिटी पोस्टातून–मला ते परत मिळेल का?"

तडतडत त्याला जबाब मिळाला, "काय कटकट आहे ही? काय तक्रार असेल ती इथे येऊन सांगा. जिथून पार्सल केलंत तिथेच जा! कट्ट!"

फास्टर फेणेने हातातल्या फोनकडे रागाने पाहिले. तो अडकवला. मग एका उडीत सायकल उचलून तो पुनश्च स्वार झाला. तात्या टण्णूने त्याचे अनुकरण केले. खणखणत सायकली निघाल्या.

सायकल पळवताना फास्टर फेणे मित्राला म्हणाला, "मी काय केलं, माहीत आहे? तुला धाडायचं एप्रिल फूलचं पार्सल प्रोफेसर उकिडव्यांना धाडलं! मला ते आधी अडवलं पाहिजे!"

उत्तम टण्णू चाट पडला. म्हणजे होता अजून सायकलवरच. मग त्याला खुदकन् हसू आले. म्हणाला, "ते अडवणं कसं शक्य आहे? काल केलंस ना तू पार्सल?"

"खुरंच की!–" बन्याच्या डोळ्यांपुढे अंधेरी आली. सिटी पोस्टही आले. एवढं बरं झालं. लगेच तो उडी मारून उतरला. टण्णूला खाली पाडून आणि टुण् टुण् पायऱ्या चढून वर गेला. No Admission चे स्प्रिंगचे दार ढकलून तो आत घुसला आणि एका बुवाला म्हणाला, "कालची पार्सलं गेली का हो?"

तो बुवा पेनमधून दोन्ही बाजूंना शाई उडवीत होता. त्याने बन्याकडे पाहिलेसुद्धा नाही. उत्तर कसचा देतो? एका हवालदाराने बन्याचा कान

धरला आणि त्याला बाहेर काढले, आणि No Admission ची पाटी त्याला दाखवली. टण्णूने त्याला थोपटले. तो म्हणाला, " अशी घाई करून चालत नसतं. " आणि त्याने सरळ मार्गाने नम्रपणे नीट चौकशी केली. तेव्हा कळले की त्या पार्सलवर कालच धबाधब शिक्के बसले. पोत्यात बसून ते स्टेशनावर गेले आणि आता आगगाडीत बसून मुंबईला रवानाही झाले असेल किंवा होईल. आज दुपारी मुंबईत पुन्हा त्याच्यावर धबाधब शिक्के बसतील आणि पोस्टमन ते दिलेल्या पत्त्यावर नेऊन पोचवील– प्रो० उकिडव्यांच्या पत्त्यावर !

प्रो० उकिडवे ! ब ब ब ब ! प्रो० उकिडवे म्हणजे कसला जमदग्नीचा अवतार ! त्यांनी ते पार्सल उघडले– आणि ते उघडणारच म्हणा– अन् आतली ती घाण नि तो कचरा पाहिला अन् एप्रिल फूलची चिठ्ठी वाचली, की– होळी पेटेल त्यांच्या अंगाची ! बोंबाबोंब होईल सारी ! हरे राम ! आपली शंभर वर्षं भरली आता ! मामांना असं खरमरीत पत्र लिहितील उकिडवे अन् मामा असं कांडात काढतील आपलं—

" प्लीज–" बन्या म्हणाला, " मला नक्की सांगता का– पार्सल मुंबईच्या गाडीत बसलं की अजून बसणार आहे ?–म्हणजे त्याचं असं आहे, साहेब–" त्याने तोंड रडवे केले– " मला ते अडवायचं आहे. म्हणून म्हटलं. जरूर तर मला मुंबईला जायला हवं धावत ! "

कारकुनाने चौकशी करून सांगितले, " आत्ता मेलने जाणार ते.– नाऊ गो ! माझा वेळ खाऊ नकोस ! तुला परीक्षा आहे ना बाळ ? "

" परीक्षा ! परीक्षा गेली खड्डु– " बन्याने घाबऱ्या घाबऱ्या घड्याळाकडे पाहिले. पावणेसात ! " माय गॉड !– देवा– देवा ! जनता गेली– डेक्कन गेली– तास वाजे ठणाणा !– पण वेट ! मेल अजून गेलेली नाही. "

" उत्तम ! " बन्या ओरडला, " स्टेशनवर चला !– " पुन्हा घड्याळ–


" अं हं ! पूना स्टेशन नहीं. शिवाजीनगर ! "

" शिवाजीनगर ? "

" हो, कारण पुण्याहून मेल सुटायची वेळ होत आली. आपल्याला ती शिवाजीनगरलाच गाठली पाहिजे !– उत्तम टण्णू, सरना सांग– बन्या अर्जंट कामासाठी मुंबईला गेला म्हणून ! "

हे बोलता बोलताच फास्टर फेणेने सायकल हाणली होती. मागच्या कॅरिअरवर उत्तम टण्णू डगमगत बसला होता. त्याची पुरती बोबडी वळली होती.

शिवाजीनगरला उतरताच बन्याने टण्णूजवळचे पार्सल हिसकावले; सायकल त्याच्या हवाली केली आणि तो ताडताड करीत पायऱ्या चढून क्यूमध्ये उभा राहिला. त्याच वेळी त्याच्या लक्षात आले की मेल पण स्टेशनात उभी राहिली आहे. आता क्यूत पंधरावा नंबर लावण्यात अर्थ नव्हता.



बन्याने खिसा चाचपला–आहे. पाकीट जवळ आहे. त्यात पंधरा रुपये आहेत हे त्याला माहीत होते. म्हणजे डबल चार्ज पडला तरी पुरतील !— गुड ! आता तसंच गाडीत घुसलं पाहिजे. चेकरला सांगून पैसे भरू वाटेत.

पण गर्दीला हटवीत बन्या प्लॅटफॉर्मवर पोचतो आहे तोच गाडीने स्टेशन सोडले होते. घाबरलेला बन्या असा धावलाय– असा धावलाय– की ज्याचं नाव ते. कशी बशी त्याने शेवटच्या डब्याची दांडी पकडली !–बालमित्रांनो, बन्याचं चित्तच ठिकाणावर नव्हतं म्हणून त्याने असं केलन्, बरं का ? तुम्ही नका हो कधी चालत्या गाडीत चढू !

हरे राम ! तो डबा होता गार्डाचा. पण गंमत अशी की गार्डसाहेब स्वतः अजून चढलेले नव्हते. हातातला बावटा हलवीत ते अजून फलाटावर उभे होते. त्यांनी बन्याला पाहिले नाही. बन्याच्या लक्षात आले–आपण भलत्या डब्यात चढलो आहो. त्याने पटकन् एक दार उघडले; आणि तो आत शिरून उभा राहिला.

गार्डसाहेबांचा स्पेशल संडास होता तो !

खडकीला गाडी उभी राहिली अन् तिथून सुटली, तरी बिचारा फास्टर फेणे खांबासारखा उभा होता. त्याच्या अंगातून घामाच्या धारा लागल्या होत्या. मनात तो प्रार्थना करीत होता, की " देवा ! माझ्या छातीतली धडक थांबू दे ! गार्डसाहेबांना दार उघडण्याची बुद्धी देऊ नकोस ! थोडा दम खाल्ल्यावर मी आपण होऊन त्यांची क्षमा मागेन. "

बऱ्याच वेळानंतर बन्याचे मन शांत झाले. तेव्हा आपण होऊनच त्याने दार उघडले आणि तो बाहेर आला.

गार्डसाहेब आपल्या घडीच्या स्टुलावर हाशहुश करीत बसले होते अन् किलकिल्या डोळ्यांनी बाहेर पाहात होते. ते इतके दचकले की–बरं तर बरं,

स्टूल दारापासून अंमळ दूर होते, नाही तर त्यांनी सरळ बाहेरच कोलांटी खाली असती. त्यांनी डोळे फाडले. पटापट कोटाची बटने सोडून शर्टाच्या आत हात घातला अन् जानवे बाहेर काढले.

" तू–तू–तू कोण ? इथे काय करतो आहेस ? "

" थांबा–गार्डसाहेब ! " फास्टर फेणे विनवणीच्या सुरात म्हणाला, " रामरक्षा म्हणू नका. मी भूत बीत नाही.–आणि ब्रेक बीक पण दाबू नका !– मला माफ करा हो ! माझी मान सुऱ्याखाली आहे. म्हणून मी असं केलं !– प्लीज——"

गार्डसाहेबांचा हात ब्रेकवरून मागे झाला. त्यांचे डोळे पुन्हा किलकिले बनले. ते काहीच बोलले नाहीत. पण त्यांनी जरी ब्रेक दाबला नाही, तरी गाडी आपली आपण उभी राहिली. बहुतेक सिग्नल दिलेले नसावे.

गाडी कामशेत स्टेशनात उभी राहिली होती. गार्डसाहेब बावट्याची गुंडाळी घेऊन उठले. त्यांनी फास्टर फेणेचे बकोट धरले व त्याला चक्क खाली फलाटावर फेकला.

" सॉरी– माय बॉय ! दुसऱ्या डब्यात बैस जाऊन ! चेकरला पैसे भर ! "

पण तेवढ्यात त्यांचा हिरवा बावटा उलगडला होता. सिग्नलही पडले होते आणि गाडी हलली होती. बन्या पुढचा डबा पकडण्यासाठी धावला, तशी गार्डसाहेब ओरडले,

" नॉट फॉर ए सेकंड टाइम ! लोकल येईल आत्ता. तिने जा ! "

" लोकल ! " बन्याने कपाळावर हात मारला. ती काय मला मुंबईला नेणार आहे ?

वन्या धीर सोडणारा नव्हता. पुन्हा एक ' आयडीआ ' त्याला सुचली. पुण्याच्या पोस्टात जमलं नाही— इथून करू या का? तो धावत पळत स्टेशन मास्तरांच्या कचेरीत गेला आणि त्याने अगदी काकुळतीला येऊन आपले गाऱ्हाणे त्यांना ऐकवले. " फोन केलाच पाहिजे हो— दादर पोस्टात. अगदी अर्जंट ! " त्याच्याकडे स्टे. मा. नी डोळे वटारून पाहिले. मग ते गुरकावले, " कर ! " वन्याचा जीव भांड्यात पडला. टेबलावर नाणी पडली. डायलात बोटे शिरली. गरगरली, करकरली....पण " ट्रिंग— ट्रिंग— " काही ऐकू येईना. सगळं डेड होतं जसं काही. पंधरा मिनिटे अशी घालवल्यावर वन्या वैतागला. तेवढ्यात खिडकीतून त्याला-बॉंबे पूना रोड दिसला.

वन्याचे लक्ष स्टेशनाबाहेर गेले. बॉंबे-पूना रोड कामशेत स्टेशनला लागून जातो. पुण्याहून आलेली एक खाजगी मोटार मुंबईकडे जाताना त्याला दिसली. टेबलावरची नाणी उचलून त्याने खिशात टाकली. काखेतले ते पार्सल सावरीत वन्या ताडताड उड्या मारीत बाहेर गेला अन् हात वर करून ओरडला, " लिफ्ट प्लीज, सर ! लिफ्ट घाल का मला ? "


पण मोटार तेवढ्यात पुढे गेली होती. मात्र तिच्या ड्रायव्हरने ' नो ' म्हणून केलेली गर्जना वन्याच्या कानात तापलेल्या तेलासारखी घुसली.

" कसा देत नाहीस बघतो ! " वन्या दात ओठ खात म्हणाला. " माझ्या जीवन—मरणाचा प्रश्न आहे हा ! "

मोटारच्या मागे धावला वन्या. कामशेत स्टेशनच्या जरा पुढे गेले की एक पूल लागतो मोटारींसाठी. आज त्या पुलाची दुरुस्ती चालली होती की काय, कोण जाणे. पण पूल बंद होता, त्यामुळे मोटारीला खालून जाणे भाग होते. रुळांपाशी येताच फाटक बंद म्हणून मोटार थांबली. अजून ती पूना मेल गेलेलीच नव्हती, त्यामुळे मोटारीला उभे राहणे भाग होते.

वन्याने धापा टाकीत मोटार गाठली. मोटारीचा मागचा भाग असतो

ना— सामान ठेवायचा कप्पा? त्याचे ढप्पण नीट लागलेले नव्हते. अर्धवट उघडे होते. बन्याने ते उघडले आणि तो सरळ आत घुसला अन् अंग चोरून नि हातपाय ओढून बसला. त्या जागेत लवकरच घामाचे थारोळे झाले.



थोड्याच वेळात पूना मेल आली आणि धडाड-धाड धडाड-धाड करीत निघून गेली. बन्याने ते आवाजावरून ओळखले. मग फाटक उघडले अन् मोटार सुरू झाली.

बन्याने नंतरचे तीन तास अवघडलेल्या स्थितीत कसे घालवले त्याचे नीट वर्णन करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. एवढेच सांगतो, की वाटेत मोटार खोपोलीला थांबली आणि आतली मंडळी बटाटेवडे खाऊन चहाच्या निटक्या मारीत परत आली, तरी बन्या तसाच बसलेला होता. बिचाऱ्याचे तोंड सुकले होते; अंग आंबले होते आणि तापलेल्या पत्र्यामुळे डोके दुखत होते. पण त्याने हूं का चूं केले नाही. आपले मळून काळे मिट्ट झालेले बोट त्याने ओठावरून फिरवले तेव्हा तिथे आपसूक मिशीचा मेकप तयार झाला हेही त्याच्या ध्यानात आले नाही.

आणि मग ठाण्याची गर्दी पार करून आली एकदाची गाडी दादरला.

आणि वरं झालं– नेमकी दादरलाच थांबली–खुदादाद सर्कलजवळ. नशी बन्याचे, की कष्ट्याचे झाकण उघडून बाहेर उडी टाकीपर्यंत त्याला कोणी पाहिले नाही. बन्याने मुंग्या आलेले अंग झटकले. त्याच्या काखेत पार्सल होतेच. त्याने मोटारचा नंबर त्या पार्सलवर टिपला.– हेतू ? पुढे मागे या गृहस्थाचे आभार मानावेत हा. तसा बन्या मोठा चांगला मुलगा होता, वरं का ? पण तो हे टिप्पण करतो आहे इतक्यात मोटारवाले गृहस्थ दार आपटून बाहेर पडले होते. त्यांचे लक्ष त्याच्याकडे गेले आणि ते आपल्या कुटुंबाला म्हणाले, " या मुलाला कुठेतरी पाहिल्यासारखं वाटतं ! कुठे वरं ? "

कुटुंबाचे उत्तर ऐकायला बन्या उर्फ फास्टर फेणे थांबला नाही. तो हात हलवीत " थँक्स " म्हणून ओरडत तिथून धूम पळाला. पुन्हा इराण्याकडून फोन करावा का ?–पण नको. जवळ तर आहे पोस्ट ऑफिस. त्याला दादरचे पोस्ट ऑफिस माहीत होते. तिथे जाऊन त्याने चौकशी केली; तेव्हा कळले, की असं असं प्रो. उकिडव्यांचं पार्सल घेऊन आत्ताच डिली-व्हरीवाला गेला.

बन्याने लांब लांब टांगा टाकल्या आणि हिंदू कॉलनी गाठली. सुदैवाने त्याला हवी असलेली गल्ली लवकरच लागली. त्या गल्लीतले वसंतभवनही सापडले. बन्या वसंतभवनाच्या फाटकाशी घोटाळत उभा राहिला. दहा-एक मिनिटांनी रजिस्टरवाला पोस्टमन आला; तेव्हा मात्र आपण फार घाईत आहो असे त्याने दाखवले. पोस्टमन जवळ येताच तो गडबडीने म्हणाला, " माफ करा, पोस्टमनसाहेब ! पण प्रो. उकिडव्यांचं एखादं रजि-स्टर आहे का ? "

" आहे " असे म्हणून पोस्टमनने एक पार्सल काढले.

तेच–तेच–बन्याच्या ओळखीचं पार्सल ! त्यानेच बांधलेलं ! बन्याने गुटकन् एक आवंढा गिळला. रुमालाने कपाळाचा घाम टिपीत तो म्हणाला,

" त्याचं असं आहे. प्रोफेसरसाहेबांच्या घरात आत्ता कुणी नाही. त्यांनी मला सांगून ठेवलंय पार्सल घ्यायला.—देता ? "

पोस्टमनने वन्याकडे पाहिले. अगदीच फाटका नि ठेंगणा तरुण वाटतो. ओठावर मिशी आहे खरी. पण खोटीच वाटते ती ! आणि चेहरा किती वाल्लिश, निर्व्याज, निष्कपटी वाटतो !

" देतो की " तो म्हणाला. " रजिस्टर म्हणजे काही मनीऑर्डर नाही, इथेच घ्या म्हणजे मला आत यायला नको. "

" चालेल " वन्या म्हणाला, " तुमचं पेन द्या. सही करतो. "

आणि वन्याने सही केली, पार्सल घेतले. आणि पोस्टमन गेला. त्याने गल्लीचे वळण घेतल्याबरोबर वन्याने हुश्श केले. त्याचा जीव भांड्यात पडला. खूप मोठ्या भांड्यात. हौदातच म्हणा ना !

पोस्टमनकडून घेतलेले पार्सल वन्याने आता काखोटीला मारले—त्याचे पत्याचे वेष्टण फाडून. आणि पुण्याहून आणलेले पुस्तकांचे पार्सल त्याने हातात धरले. मग रुमालाने त्याने आपले सगळे सगळे अंग नीट पुसले. एका पानवाल्याच्या आरशात पाहिले. अवतार मोठासा चांगला नाही. पण अगदीच वाईट आहे असंही नाही. धकून जाईल.

फाटक ढकलून तो आत गेला. 'प्रो. उकिडवे' अशी पाटी पाहून दारावरची बेल त्याने वाजवली.

'ट्टुर्र—'

प्रो. उकिडवे स्वतःच दार उघडून आले. वन्याने त्यांना ओळखले, पण त्यांनी त्याला ओळखले नाही.

" काय ? " ते गुरगुरले.

" हे बंडल दिलंय पुण्याहून आमच्या मामांनी. "

“ ओः गुड ! ” ते एकदम नरम होऊन म्हणतात. “ तू बन्या फेणे, नाही का ? बरं झालं. मला अर्जंटली हवी होती ही पुस्तकं ! थँक् यू माय बॉय !–आणि ते दुसरं काय ? ”

आपल्या काखेतल्या दुसऱ्या पार्सलाकडे प्रोफेसरसाहेबांचे लक्ष गेले आहे ही गोष्ट बन्याच्या ध्यानात आली. तो गडबडीने म्हणाला, “ ते–ते काही नाही. दुसरीकडे पोचवायचं आहे ! ”

“ वा ! म्हणजे पोस्टमनच बनला आहेस की तू !– अहो, या मुलाला काही खाऊ द्या ना ! ”

काखेतले पार्सल बन्याने आणखी जोरात दाबले. ‘ सुटलो ! ’ तो आपल्याशी म्हणाला. “ प्रोफेसरसाहेबांनी जर हे पाहायला मागितलं असतं तर माझी शंभर वर्षं भरली असती ! ”

थोड्याच वेळात बन्यासाठी आतून खाऊ आला. दुसऱ्या दिवशी पाडवा होता. त्यामुळे खाऊच्या बशीत पोटभर मिठाई भरलेली होती. ती भराभरा घशात कोंबून अन् वर पाणी ढोसून बन्याने तृप्त मनाने ढेकर दिला आणि प्रोफेसरसाहेब नि प्रोफेसरीणबाई यांचा प्रेमाचा निरोप घेऊन तो बाहेर पडला. सरळ स्टेशनात जाऊन त्याने पुण्याची गाडी गाठली.

गाडीत चढल्यावर तो धापा टाकीत स्वताला म्हणतो, “ बन्या– लेका ! आता वाटेत वडा बिडा खायचा नाही, बरं का ? कारण तुझाच वडा झाला आहे. वाटेत खायची ही बॉक्सातली मिठाई– आपल्या मित्राला बनवण्यासाठी तू ती गोळा केलीस ना ? ती !– हॅ:! म्हणे एप्रिल फूल ! ”

# फास्टर फेणेची घोडदौड !

बुन्या ऊर्फ फास्टर फेणे तुमच्या ओळखीचा झाला तो पुण्याला विद्या-भुवनमध्ये शिकायला आल्यापासून. त्याच्या आधी तो फुरसुंगीला राहात असे हे तुम्हाला माहीत आहेच. ही गोष्ट तो आपल्या गावी असतानाची आहे.

बन्याचे वडील काका फेणे यांची फुरसुंगीत बऱ्यापैकी शेती होती. ऊस, मुसुंबी, मका अशी खपावू पिके ते काढीत. पंधरवड्यातून एकदा तरी ते पुण्याला जात अन् मंडईतल्या दलालांना भेटून येत.

त्या दिवशी असेच भाई फेणे पुण्याची ट्रिप उरकून आले तेव्हा दुपारचे तीन वाजलेले होते. त्यांनी आपली सोला हॅट काढून खिडकीच्या कट्ट्यावर टाकली. सोलापूर चेकचा आपला प्रचंड ढिसाळ कोट काढून खुंटीला टांगला. भाईंचा कोट म्हणजे एक पोते आणि त्याचे बाहेरचे दोन खिसे म्हणजे थैल्या होत्या. त्या थैल्यांतून काय काय भरलेले असे. तपकिरीची डबी नि डागळलेला रुमाल, अमृतांजनची बाटली नि हुंगायची जपानी नळी, बंदुकीची काडतुसे नि सिग्रेटच्या पाकिटातली चांदी नि चित्रे, चॉकलेट नि

चाक्या ! खिशातल्या खजिन्याची ही यादी सांगितली, की वडिलांच्या कोटावर बन्या नेहमीच तुटून पडत असे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पण आज या नेहमीच्या रत्नांखेरीज दुसऱ्याच एका वस्तूने भाईंचा खिसा गच्च भरलेला होता. प्रवासाने जीर्णशीर्ण झालेली वर्तमानपत्रे त्यातून डोकावत होती. बन्याने ती ओढून खाली फेकताच मृदुलने त्यांच्यावर झडप घातली.

" बाप रे !" क्षणार्धात तिचे डोळे विस्फारले होते. " बन्या, हे बघ काय ते !"

बन्याने खिसासंशोधन तसेच टाकून चॉकलटने चिकट झालेली आपली बाळकुडी बोटे बाहेर काढली. तो ताईजवळ फतकल मारून बसला अन् त्याचे मोठाले डोळे वर्तमानपत्रांवरून चटचट फिरू लागले.

टोलेजंगी टायपातल्या लांबच लांब मथळ्यांनी त्यांचे लक्ष वेधून घेतले होते. प्रत्येक पेपरचे हेडिंग वेगळे, आणि तरी साऱ्यांमधून एकच नाव धुडगूस घालीत होते— खेमराज खोसला.

बन्याची ताई मोठ्याने वाचू लागली—

**" महाराष्ट्रात दरोड्यांचे सत्र सुरू**

**लूटखोर डाकू खेमराज खोसला !**

" जलालाबादचा कुप्रसिद्ध डाकू खेमराज खोसला हा आपल्या राज्यात सध्या धिंगाणा घालीत असल्याचे सर्वांना माहीत आहेच. त्याची टोळी आपले सर्व उद्योग इतक्या शिताफीने व गुप्तपणे करीत असते, की त्याला पकडणे पोलिसांना अद्यापि शक्य झालेले नाही. तरी पण ताज्या बातम्यां-वरून असे समजते की खोसलाची टोळी नुकतीच पुण्याकडे वळली आहे. गेल्या आठवड्यात पुरंदर तालुक्यात जे घरफोडीचे प्रकार झाले त्यांच्या

मागचा सूत्रधार खोसलाच होता असे आमचा खास वातमीदार कळवतो. ”

या ठिकाणी खोसलाच्या काही ‘ पराक्रमां ’चा उल्लेख केला होता. वेषांतर करण्यात तर तो पटाईत होताच; पण त्याने कॉलेजशिक्षणही घेतलेले होते म्हणे. एक गंमत म्हणजे सासवड गावी जुन्या वाड्यावर डाका घालून खिडकीवाटे तो पळत असता वाड्यातल्या एका गृहस्थाने सफाईने त्याला चाकू मारला; त्यामुळे त्याच्या उजव्या हाताचा अंगठा तुटला होता. आणि तरी या आधुनिक शाइस्तेखानाची हल्लेखोरी चालू होतीच.

“ सासवड ? बाप रे ! म्हणजे आपल्या अगदी जवळ आला की ! ” बन्याची ताई मृदुल उद्गारली.

“ कदाचित् फुरसुंगीलासुद्धा येईल ! ” बन्या म्हणाला.

“ इथे मिळणार आहे काय त्याला ? कडबा ? की उसाची चोयटी ? ”

“ का बरं ? गुळाला भाव काही कमी नाही ! ”

“ हो ! पण सोन्याच्या चिपांसारख्या गुळाच्या ढेपा काही सोप्या नाहीत पळवून न्यायला ! ”

ताईची ही उपहासाची उत्तरे बन्याने ऐकलीसुद्धा नाहीत. त्याचे कान त्या वेळी माजघरात चाललेला आईवडिलांचा संवाद टिपीत होते.

वहिनी विचारीत होत्या, “ कुठचा राजा येणार आहे ? ”

“ अग, नाव आहे त्याचं बादशहा ! ” भाई सांगत होते. “ पण तो माणूस नाही. घोडा आहे. कुठल्या तरी राजाचा घोडा ! ”

“ घोडा ? एका घोड्यासाठी का एवढा आटापिटा चाललाय ? ”

“ मग ? साधा घोडा नाही तो. रेसचा लाखमोलाचा घोडा आहे. फेव-रिट—म्हणजे चँपियन घोडा ! इतके दिवस कोल्हापूर महाराजांच्या तबेल्यात

होता. आता–पुण्याला चाललाय परवाच्या शर्यतीत भाग घ्यायला. स्पेशल गाडी सोडलीय त्याच्यासाठी ! ”

“ स्पेशल गाडी? हुं: ! इतके दिवस घोडे गाड्या ओढायचे. आता गाडीत बसून जायला लागले ! तेही स्पेशल गाडीत !–बरं, पण आमच्या भिकार फुरसुंगी स्टेशनवर कशाला थांबणार आहे ती स्पेशल? ”

“ तेही सांगितलं मला स्टेशनमास्तरनी. त्यांना थोड्याच वेळापूर्वी मांजरीहून फोन आला म्हणे. दिल्लीचे एक प्रख्यात पशुवैद्य सध्या मांजरी फार्मवर आलेले आहेत. त्यांना महाराजांचा तातडीचा संदेश आला की स्पेशल गाडीवरचे डॉक्टर अचानक आजारी पडले अन् घरी राहिले.. तेव्हा कृपया बादशहाच्या प्रकृतीवर नजर ठेवण्यासाठी आपणच या–फुरसुंगीला गाडी गाठा ! ” हे सांगताना भाईच जरा अडखळल्यासारखे झाले होते. कारण फुरसुंगी स्टेशन झाले तरी मांजरीहून जवळ नव्हते. आणि डॉक्टर-साहेब मांजरीहून मोटारीने तडक पुण्यालाच जाऊ शकले असते की !– पण कुणास ठाऊक ! कदाचित् फुरसुंगी ते पुणे या अल्प अंतरातसुद्धा घोड्याच्या तब्येतीची काळजी घ्यायला हवी असे त्याच्या मालकाला वाटले असेल. म्हणून पुण्याऐवजी फुरसुंगीच गाठणे प्राप्त. बन्याच्या आईलाही हा विचित्रपणा जाणवला असावा. कारण त्या म्हणाल्या, “ मांजरीहून फुरसुंगी स्टेशनला यायला गाडीरस्ता तरी आहे का चांगला? एवढा आटापिटा करून फुरसुंगीसारख्या मधल्या स्टेशनावर गाडी उभं करणं म्हणजे काही-तरीच ! ”

बन्या पुढचे ऐकायला थांबला नाही. त्याला घोड्याच्या शर्यतीतले काही कळत नसले तरी या बादशहा घोड्याचे नाव त्याने ऐकलेले होते. वर्तमानपत्रांतून जिकडे तिकडे त्याची जाहिरात झालेली होती. ‘ डर्बी ’ की कुठचीशी मोठी शर्यत त्याने जिंकली होती म्हणे ! आपल्या मालकाला

त्याने लाखो रुपये मिळवून दिले होते. आणि आता तो पुन्हा एकदा पुण्याचे मैदान गाजवायला निघाला होता; परवाच तर ‘ सकाळ ’मध्ये त्याचा फोटो आला होता. काळेभोर अंग, कपाळावर गंध लावल्यासारखा उभा पांढरा दुपट्टा असा तो अश्वराज बन्याला एकदम आवडला होता.

“ बाबा—” बन्या पुढे होऊन म्हणाला, “ केव्हा यायची आहे ही कोल्हापूरची स्पेशल ट्रेन? मला त्या बादशहाला भेटायचंय ! ”

“ चार वाजता.—पण वेड्या, तुला कोण बघू देणार ? फलाटावर पहारा असेल, माहीत आहे? तुला कुणी स्टेशनातदेखील सोडणार नाही? ”

“ सोडतील ! मास्तरकाका आपलेच आहेत. ते मला नक्की सोडतील ! ” बन्या निश्चयाने म्हणाला. “ पण साडेतीन वाजले की ! म्हणजे मला निघालंच पाहिजे ! ”

आणि वहिनी “ संभाळून जा ” म्हणताहेत तो बन्या उर्फ फास्टर फेणे पळालासुद्धा !

गावापासून स्टेशन दीड मैल अंतरावर होते. शिवाय वाटेत बन्या आपला मित्र ताल्या तनपुरे याच्या घराशी थांबला आणि त्याने त्यालाही बरोबर घेतले. त्यात दहा मिनिटे मोडली.

बन्यापेक्षा ताल्या वर्षभराने मोठा असेल; पण दोघांचे सूत चांगले जमे. बन्याच्या हाकेसरशीच यायचा तो; पण बापाबरोबर खळ्यावर धान्य झोडीत होता, त्यामुळे त्याला एकदम उठता आले नाही. एकदा उठल्यावर मात्र तो बन्याबरोबर मारुतीच्या वेगाने पळत सुटला. पायांखालची जमीन टणक होती तोवर दोघे चांगले धावत होते. भुसभुशीत ढेकळांचे वावर लागले तेव्हा त्यांना पळायला त्रास होऊ लागला. मग ते बांधावरून पळू लागले. त्यांचे ते पळणे पाहून बादशहालाही हेवा वाटला असता.

क्र. ५९ लो. [illegible], वाचनालय शाखा.
क्र. २१ ०८५ आं. दि. २८/१०/८०
[illegible]

पळता पळताच बन्याने बादशहाबद्दल आपल्याला ठाऊक असलेली माहिती तात्याला ऐकवली.

" खरा बादशहा आहे म्हणायचा !" तात्या म्हणाला, " परवा मला ताप भरला व्हता तरी बाबांनी मुइमूग खुडाया पिटाळलं ! आणि हा घोड्यावानी घोडा— त्येला काईबी झालं नसताना डागदर लागतो !"

इतक्यात बन्याचे लक्ष डाव्या बाजूला उंच बांध होता तिकडे गेले. त्या बांधाच्या पुलाखालून फद् फद् आवाज येत होता.

" फटफटी ! मोरीतनं भाइर आली !" तात्या ओरडला.

दोघेही थांबून पाहू लागले. काल्ल्याच्या खालून वाहणाऱ्या त्या अर्धसुक्या ओढ्यात एक मोटारसायकल दिसत होती खरी. तिच्यावर दोन माणसे बसलेली होती. वरून गळणाऱ्या पाण्याच्या थेंबांनी त्यांचे कपडे डबरलेले होते. बोगद्यातून फटफटी नुकतीच बाहेर पडली होती. पंक्चर होऊ नये म्हणून काटेकुटे टाळण्याच्या नादात तिला दगडगोट्यातून धडपडत यावे लागले. आली एकदाची ओढ्याचा उतार चढून वर, अन् आता स्टेशनाची दिशा धरणार तो खाडकन् उभी राहिली. मागचा माणूस टांग वर करून खाली उतरला; अन् पुढच्या माणसाने पायाने धडाधड किका हाणल्या. 'फुर्र्र्' झाले. फटफटी हालली नाही. बन्या—तात्यांनी थोडा वेळ ते दृश्य पाहिले. मग बन्या म्हणाला, " चल ! वेळ होतोय आपल्याला. राजेवाडीकडचं सिग्नल पडलंय बघ !"

राजेवाडी हे कोल्हापूर बाजूचे फुरसुंगीच्या आधीचे स्टेशन. सिग्नल पडले म्हणजे स्पेशल यायची वेळ झाली असणार.

दोघे स्टेशनबाहेर मास्तरांच्या बंगल्यापाशी येऊन पोचतात तो फटफटी दुरुस्त होऊन तिथवर आली होती. स्टेशन तसे उजाडच होते, पण दोन

पोलिस लाठ्या घेऊन कंपाउंडच्या दाराशी पहारा करीत होते. फटफटी-वरचा मागचा ठेंगणा माणूस खाली उतरला होता आणि पुढचा उंचाडा माणूस उतरण्याच्या बेतात होता. उन्हातून अन् आडमार्गाने त्याने फटफटी आणली होती. आणि या प्रवासाला अनुरूप असा त्याचा पोशाखही होता. अंगात काळा सूट, डोक्यावर जाडी हॅट, डोळ्यांना भले मोठे गॉगल, पायांत बूटमोजे, इतकेच नाही तर हातांतही रबरी मोजे. उतरताना त्याने उजवा हात जेव्हा हँडलवरून वर उचलला तेव्हा त्याचा रबरी हातमोजा निघून खाली पडला. आणि—

" ट्रॅक् ! " बन्या उर्फ फास्टर फेणे उद्गारला. " तू पाहिलंस, तात्या ?"

" काय ? "

" त्याच्या हाताला बँडेज बांधलेलं आहे. आणि—"

" आणि काय ? "

" त्याला आंगठा अजिबात नाही !— म्हणजे नसावा ! "

" मग—"

त्या माणसाने तेवढ्यात झटकन् आपला मोजा सावरला. कपाळाला आठ्या चढवून त्याने या बच्या मुलांकडे पाहिले.

" स्टेशन मास्तरका मकान यही न ? " दुसऱ्या माणसाने या मुलांना उद्देशून विचारले. बन्या त्याला होकारार्थी उत्तर देणार, तो स्टेशन मास्तरच बाहेर आले आणि नमस्कार करीत म्हणाले, " आपण मांजरीहून आलात ना ? डॉक्टर शर्मा ? "

" राइट ! हे माझे असिस्टंट गोपालन् ! "

" या !—कम् राइट ऑन् दि प्लॅटफॉर्म. मांजरीहून फोन वेळेवर आला म्हणून बरं झालं ! गाडीची वेळ झालेलीच आहे. आपणही वेळेवर आलात.

नाहीतर गाडी डीटेन करावी लागली असती !—अरे, हा बनेश फेणे इकडे कुठे आज? काय रे बन्या?"

मास्तरांचे लक्ष आपल्याकडे गेलेले पाहून बन्या चटकन् म्हणाला, "काही नाही. एरवीच आलो फिरत फिरत. बोरं पाडणार आहोत तिकडची!"

"पाडा!" मास्तर म्हणाले, "पण आज स्टेशनात मात्र जायचं नाही बरं का?"

तात्याचा हात धरून बन्या डाव्या बाजूला पळाला, तशी तात्या म्हणतो, "आपल्याला स्टेशनात जायची परवानगी दिली असती मास्तरांनी. तू विचारलं का नाहीस?"

"कारण मला परवानगी नको आहे!" बन्या म्हणाला, "आपण बादशहाला पाहू—पण चोरून पाहू!"

आपला मित्र एकदम गंभीर बनला असल्याचे तात्याच्या लक्षात आले होते. त्याला याचे कारण कळले नाही; पण तो मुकाट्याने बन्याबरोबर पळत होता. प्लॅटफॉर्म सोडून फर्लांगभर दूर गेल्यावर बन्या आणि त्याच्याबरोबर तात्याही रेल्वे लाइनवर चढला.

"लवकर हं—ते बघ वळणावरून एंजिन येताना दिसतंय!"

दोघांनी रूळ ओलांडले. पलीकडे बराच झाडझाडोरा होता. त्या झाडोऱ्यातून पळत पळत दोघे पुन्हा मागे आले; प्लॅटफॉर्मच्या बरोबर समोर एका मोठ्या झुडपाआड दडून बसले अन् रुळांकडे पाहू लागले.

या चोरटेपणाचा बन्याने अजून काही खुलासा केला नव्हता आणि तात्यानेही त्याला काही विचारले नव्हते.

थोड्या वेळाने धडाड् धाड् करीत ती तीन डब्यांची छोटी गाडी येऊन स्टेशनात थडकली. एंजिनला लागून असलेला डबा तिसऱ्या वर्गाचा होता. त्यात चार पाच नोकर बसलेले होते. दोन नंबरचा डबा जनावरांचा होता. त्याच्या दरवाजाचा वरचा अर्धा भाग उघडा होता आणि त्यातून एका उमद्या घोड्याचे ऐटबाज मस्तक डोकावत होते. कपाळावरचे पांढरे गंध बादशहाच्या रूपाची जाहिरात करीत होते. खोगीर, लगाम, रिकिबी सर्व साज त्याच्या अंगावर होता. या डब्यात दोन पिस्तूलधारी शिपाई पहाऱ्याला होते. शिवाय मोतद्दार होता. तिसरा डबा पहिल्या वर्गाचा होता. त्यात दोन अधिकारी बसलेले होते.


गाडी थांबली. प्लॅटफॉर्म गाडीच्या पलीकडे असल्यामुळे त्यांना दिसत नव्हता. बादशहाच्या पहारेकऱ्यांनी एकवार डब्याच्या दारातून या बाजूला डोकी काढली आणि सर्व सामसूम आहे असे पाहिल्यावर ती परत आत घेतली. नंतर ते पलीकडच्या बाजूस फलाटावर उतरले असावेत. गाडीतल्या सर्वच मंडळींचे लक्ष आता स्टेशनाकडे असावे. काहीजण फलाटावर उतरले असतील. काही गाडीच्या दारात उभे असतील. कारण बादशहाचा मोतद्दारही आता पलीकडच्या दारात उभा होता— या दोघांना पाठमोरा.

“ चल आता— ” बन्या तात्याच्या कानाशी कुजबुजला. “ आपल्याला डब्यात जायचंय ! ’

“ डब्यात ? ”

“ हो ! तो डॉक्टर म्हणून आलेला माणूस डॉक्टर नाही— तो डाकू असावा— अशी— अशी मला शंका येते आहे— ” बन्या चाचरत बोलत होता; कारण त्याची त्याला खात्री नव्हती. पण ज्या अर्थी शंका आली आहे त्या अर्थी आपण तावडतोब तिचा निकाल लावला पाहिजे असे त्याचे ‘ फास्ट ’ मन त्याला सांगत होते.

"चल—" तात्याला जवळ जवळ ओढीतच बन्याने रेल्वे लाइनवर नेले. दोघांनी डब्याची पायरी धरली. मग वरची दांडी नि कडी धरली. दोघे वांदरासारखे वर चढले. बन्याने आत उडी टाकली. सुदैवाने आत ताज्या हिरव्या विलायती गवताचा ढीग होता; आवाज झाला नाही. मागोमाग तात्या टपकला. बादशहाने फुर्र केले तेव्हा त्याची पाठ थोपटण्याचा जो क्षणिक मोह झाला होता तो बन्याने आवरला. दोघेही झटक्यासरशी पली-कडच्या कोपऱ्यात गेले. ही बाजू अंमळ काळोखाची होती. आंग चोरून दोघे कोपऱ्यात उभे राहिले. खाली एक घोंगडी पडलेली होती, ती उचलून फास्टर फेणेने आपल्या पुढ्यात धरली. एक टोक तात्याच्या हातात दिले. आणखी आडोसा झाला.



घोड्याने त्यांच्याकडे पाहिले. पुन्हा 'फुर्र' केले. पण एकंदरीत फास्टर फेणे त्याला आवडला असावा. कारण फा. फे. ने नाकावर बोट ठेवून दटावताच त्याने तो इशारा मानला आणि तो गप्प झाला.

तिकडे मोतदारही आता खाली उतरला होता. थोड्याच वेळाने तो उंचाडा पशुवैद्य खरा की खोटा, देव जाणे!— डॉ. शर्माही वर चढला.

तोंडाने त्याची वडबड चाललेली होती. फलाटावर उभे असलेले अधिकारी त्याला आपल्याबरोबर फर्स्ट क्लासमध्ये बोलवीत होते वाटतं. त्यांना तो सांगत होता– " नहीं जी ! ड्यूटी इज ड्यूटी ! मी आत्ता आधी बादशहाजवळ बसतो. त्याची हालत बघतो. गार्डसाहेब, तुम्ही बरोब्बर पंधरा मिनिटांनी गाडी उभी करा. मी खाली उतरून त्या डब्यात जाईन. पण अगोदर बादशहाची तब्येत तपासलीच पाहिजे ! "

" आमच्यापैकी कुणी राहू का बरोबर ? " अधिकाऱ्यांपैकी एकाचा आवाज असावा हा.

" नको– नको ! डोंट बॉदर. आय हॅव्ह् माय असिस्टंट विथ् मी ! " डॉक्टरांनी त्यांना परतवून लावले.

असिस्टंट वर चढला. दोघांनी क्षणभरच बादशहाकडे पाहिले. डॉक्टरांनी खालचा ओठ दातांनी दाबून हलक्या आवाजात पण गुरगुर केली— " ठैर शैतान ! तेरी सारी शान निकाल दूँगा ! पूना पहुँचतेही तुरन्त तुझे बुखार चढेगा ! और हम हो जायेंगे पसार !– बादशहा की ऐसी की तैसी !"

हे त्याचे पटकन् बोलून टाकलेले शब्द बाहेरची माणसे दूर असल्यामुळे त्यांना ऐकू गेले नाहीत. ते फक्त आपल्या मदतनिसाने ऐकले असतील अशी त्याची कल्पना ! त्याला काय माहीत की एका काळोखी कोपऱ्यातून चार पाणीदार डोळे आपल्या हालचाली चोरून पाहात आहेत अन् कान आपले शब्द ऐकत आहेत !

तुन्या ऊर्फ फास्टर फेणेने ते बोलणे ऐकले आणि त्याची उरली सुरली शंका फिटली. हा माणूस खरा डॉक्टर असो वा नसो, तो दुष्ट हेतू घेऊन बादशहाच्या डब्यात शिरला आहे याबद्दल त्याची खात्री झाली. बुखार म्हणजे ताप ! हा माणूस बादशहाला ताप आणणार आहे ! ' पुढच्या प्रसंगाला

तोंड देण्यासाठी सावध राहा !' असा त्याने डोळ्यानेंच तात्याला इशारा दिला.

आणखी दोन तीन मिनिटे गेली.

अधिकारी वगैरे दुसरी मंडळी आपापल्या डब्यात चढली असावी. दोघे पहारेकरी या डब्यात शिरले आणि डब्याच्या भिंतीलगत उभे राहिले. मोतद्दारही चढून घोड्याजवळ उभा राहिला. डब्यात दोन पोरे चोरून उभी आहेत हे कोणालाही कळले नाही.

एक शिट्टी देऊन गाडी सुटली.

भप्–भप्–भप्–भप्—

'सदर्न रेल्वे'चे सुप्रसिद्ध हलुवार मीटरगेज एंजिन एकेक 'पाऊल' टाकीत मोठ्या कष्टाने गाडी ओढीत होते. आपण ओढतो आहो ती गाडी 'स्पेशल' आहे या जाणिवेने त्याला आणखीच कष्ट होत असावेत.

'डॉक्टरां'नी एकवार बादशहाचे समग्र निरीक्षण केले. बादशहाने आपल्या मोठाल्या चलाख डोळ्यांनी त्यांचे निरीक्षण केले. त्याच्या नजरेत अविश्वास चमकला का ?–कुणास ठाऊक ! पण फास्टर फेणेला तरी तसे वाटले नक्कीच !

मग डॉक्टरसाहेब पुढे झाले. त्यांनी घोड्याची पाठ थोपटली. आयाळ गोंजारली. शेपूट हाताळली. टॉर्च घेऊन त्याच्या पोटाखाली डोकावले. भिंग घेऊन त्याच्या नाकाकानांत न्याहाळले. बॅग उघडून स्टेथॉस्कोप काढून तो कानांना अडकवून त्याच्या छातीला लावून त्यांनी ठोके मोजले. शेवटी चेहरा गंभीर करून ते मोतद्दाराला म्हणाले, "सब ठीक है इसका–लेकिन हार्ट थोडा कमजोर मालुम होता है—"

" हार्ट ! " मोतद्दार आश्चर्याने म्हणाला, " हार्ट तो बादशहाका ठीक है, डागदरसाब ! "

" बाहरसे ठीक लगता है— लेकिन— जरा कमजोरी है, एक इंजेक्शन देता हूँ— कुछ चिंता नहीं रहेगी ! "

" इंजेक्शन ! "

" जी ! क्यौं ? इतने चौंक उठे ? "

" लेकिन डागदरसाब, परसोंके दिनहि रेस है—"

" उसी लिये !— अरे, रेसमध्ये त्याने नीट धावावं म्हणून तर मी इंजेक्शन देणार आहे. "

" मगर— "

" हे बघ, डॉक्टर तू आहेस का मी ? " असे म्हणून डॉक्टरसाहेबांनी पहारेकऱ्यांकडे वळून पाहात हास्य केले. त्यांना बिचाऱ्यांना यातले काय कळते ? त्यांनीही किंचित् हसल्यासारखे केले.

डॉक्टरांना आणखी अनुमतीची जरूर नव्हती. त्यांनी बॅगेतून पिचकारी काढली. मोतद्दार ते पाहात होता. तो काही तरी बोलण्याच्या आधीच ते म्हणाले, " उकळूनच आणलेली आहे. " असे म्हणत त्यांनी एका काचेच्या कुपीचा टवका उडवला आणि पिचकारीची सुई आत घातली.

पिचकारीच्या नळीत ते विष चढत होते आणि इकडे फास्टर फेणेचे रक्त सळसळत होते. तात्याला त्याने डोळ्याने खूण केली.

डॉक्टर शर्मा पिचकारीचे टोक घोड्याच्या पुठ्ठ्यात टोचणार तोच—

घोंगडी फेकून देऊन ही दुक्कल पुढे झाली आणि डॉक्टरावर गिधाडां-सारखी तुटून पडली. फास्टर फेणे आपल्या वाळकुड्या मुठीचा एक तडाखा

म्हणून ती पिचकारी उडवणार तोच डॉक्टरांनी आपला हात मागे ओढला.

" यह क्या है ? " ते ओरडले आणि डोळे तांवारून पाहू लागले. " तुम कोन हो ? इधर कैसे आये ? "

सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. आकस्मात प्रगट झालेली ही दोन कार्टी म्हणजे भुताटकीचा तर प्रकार नाही ? त्यांना काहीच समजेना !

आणि स्पेशल ट्रेनला आता जरा वेग चढला होता !

पहारेकरी पुढे झाले. एकाने बन्याला पकडले. दुसऱ्याने तात्याला आवळून धरले. मोतद्दाराने बादशहाच्या गळ्याला घट्ट मिठी मारली आणि तो डोळे फाडून या प्रकाराकडे पाहू लागला.

" बदमाष ! शैतानी लडके ! " एक पहारेकरी ओरडला.

" हम बदमाष नहीं ! " फास्टर फेणे किंचाळला. " यह आदमी बदमाष है !– यह डाक्टर नहीं– डाकू है ! "

" क्या बोलता है ? "

" सच बोलता हूँ !– यह बदमाष घोडेकू मारना बघता है ! " बन्या ओरडला, " पकडो– उसको पकडो ! "

" देखो, वह जहरका इंजेक्शन देता है "

आणि डॉक्टरचा असिस्टंट आयोडिनचा बोळा घोड्याच्या पुठ्यावर चोळण्याचे सोंग करीत होता, तो डॉक्टरला म्हणाला, " जलदी करो– जलदी करो ! "

त्यांची ती घिसाडघाई पाहून पहारेकऱ्यांनाही चमत्कारिक वाटले असावे. दोन्ही पोरांना ढिले सोडून ते पुढे झाले आणि डॉक्टरांकडे बारकाईने पाहू लागले.

ही संधी साधून फास्टर फेणे ताडकन् पुढे झाला अन् आपली तंगडी उचलून त्याने जी लाथ झाडली ती त्यां डॉक्टराच्या हातावर. तत्क्षणी हातातली ती पिचकारी उडाली, खाली पडली, अन् तिचे तुकडे तुकडे झाले.

आता मात्र डॉक्टर खरा खवळला. त्याने आपल्या बॅगेतला चाकू काढला आणि दात-ओठ चावीत तो बन्याकडे वळला.

" बदमाष !– सिरिंज फोड डाला !– ए चौकीदार ! इसको पकडते क्यौं नहीं ? "

पण ते दोन पहारेकरीही आता डॉक्टरांबद्दलच साशंक बनले होते. एकाने त्यांचा हात दाबून तो चाकू काढून घेतला. दुसरा आळीपाळीने त्या मुलांकडे नि डॉक्टरांकडे पाहू लागला. त्याचा हात आता पिस्तुलाकडे गेला होता.

" हे अजूनसुद्धा बादशहाला इजा करतील ! " फास्टर फेणे तात्याला एकीकडे म्हणाला आणि दुसरीकडे त्याने गाडीबाहेर पाहिले. त्याचा आशय ओळखून तात्यानेही बाहेर पाहिले. गाडीचा वेग मंद मंद होत होता. निघाल्यापासून पंधरा मिनिटांनी गाडी उभी करायची असे ठरलेले होते. पंधरा मिनिटे आता भरत आली होती.

तात्या नि बन्या दोघांनी मिळून दरवाजाचा अर्धा भाग जो बंद होता, त्याची कडी काढली. दाराला खाली आडवी बिजागरी होती. कडी काढताच दरवाजा दापणासारखा बाहेर पडला आणि दोघांनी बाहेर उड्या टाकल्या.

आत चाललेल्या गोंधळामुळे बादशहा पण बावरला होता. सारखा खिंकाळत होता अन् दुगाण्या झाडीत होता. डब्याचा दरवाजा उघडलेला पाहताच त्यानेही आता बाहेर उडी टाकली. आणि मग आणखी एका उडीत तारेचे कुंपण ओलांडून तो पळत सुटला.

बुन्याची उडी हातांपायांवर पडली होती. चतुष्पाद बनलेला बन्या पुन्हा झटदिशी द्विपाद बनला. उठून उभा राहताच त्याने डब्याकडे पाहिले. आत चाललेली झटापट पाहून तो ओरडला, "वह डाकू है—खेमराज खोसला !"



आणि मागे वळून तो घोड्याच्या मागे पळत सुटला.—हो ! बादशहाला पकडलंच पाहिजे ! तो रेसचा मौल्यवान् घोडा आहे !

त्याच्या मागे तात्या पळत होता. चांगली अर्धा मैल पळाली ही तिकडल. बेफाम धावत असलेल्या बादशहाने एकदोन गिरक्या खाल्ल्या आणि तो पुन्हा पहिल्या ठिकाणी आला म्हणून बरे. नाहीतर फास्टर फेणेला झाले तरी तो रेसचा घोडा सापडणे अशक्यच होते. तात्याला तो मागे ओरडून सांगत होता, "मला घोड्यावर बसता येतं ! मागे बाबांनी हिरू घोडा पाळला होता तेव्हा आम्ही सगळ्यांनी रायडिंग शिकून घेतलंय !"—तरी पण नामांकित रेसहॉर्स पकडणे आणि त्यावर आरूढ होणे सोपे का काम होते? बन्या जॉकी थोडाच होता?

पण फास्टर फेणेने गंमत केली. बादशहा एक चक्कर खाऊन पुन्हा पहिल्या जागी येत आहे असे पाहून तो एका झाडावर चढला आणि खाली आलेल्या फांदीवर तयारीत उभा राहिला. मग घोडा फांदीखाली येताच त्याने त्याच्या पाठीवर आंग फेकून दिले. त्याने त्याचा लगाम पकडला. मग तडकाफडकी तो पालथा पडला आणि घोड्याची आयाळच घट्ट पकडून आपल्या किरट्या तंगड्यांनी त्याने त्याचे पोट आवळले.

बादशहा खिंकाळला. एकदा तर बावचळून त्याने पुढचे पाय उचलले अन् तो मागच्या पायावर उभा राहू लागला. बन्याची पाचावर धारण बसली आणि मागे दूर अंतरावरून ते दृश्य पाहणारा तात्या बोंबलू लागला, "बन्या! तुझी शंभर वर्षं भरली!"

पण नाही! बन्याची शंभर वर्षे भरली नव्हती. नशीब त्याचे—नि तुमचे पण—की त्या भयंकर प्रसंगातून तो सहीसलामत सुटला. नाही तर त्याच्या बहाद्दुरीच्या पुढच्या कथा तुम्हाला ऐकायला मिळाल्या नसत्या. त्याचा रण-रंग तुम्हाला बघायला मिळाला नसता.

मजा अशी झाली, की बन्या घोड्यावर पालथा पडून एकीकडे देवाचा धावा करीत होता, तर दुसरीकडे त्या दिलदार प्राण्याच्या कानात म्हणत होता, "बादशहा—बादशहा! तू शहाणा ना? मग थांब ना दोस्त!"

देवाने त्याचा धावा ऐकला की बादशहाने त्याची विनवणी ऐकली ते त्याच दोघातिघांना माहीत! एवढे खरे की थोड्याच वेळाने घोडा एका ओढ्यापाशी आला अन् ब्रेक दाबल्यासारखा उभा राहिला.

फास्टर फेणेने खाली उडी मारली. तो घोड्याच्या मानेजवळ गेला. त्याची मान कुरवाळीत त्याने त्याच्या आयाळीला गाल घासले. तो स्वतः घोड्या-इतकाच घामाघूम झाला होता आणि त्याची छाती धाडधाड उडत होती.

पण तसाच धापा टाकीत तो बादशहाला म्हणाला, " कसं छान थंड पाणी आहे बघ ! प्यायचं ना तुला राजा ? "

आणि बादशहाने अगदी खुषीत येऊन फुर्र केले. तो पुढे झाला, ओढ्यात उतरला आणि पोटभर पाणी प्याला. बन्याही ओंजळभर पाणी प्याला.

थोड्या वेळाने तात्या तिथे धावत आला आणि आपला मित्र सुखरूप आहे असे पाहून तोही पाणी प्याला.

आणखी दीड तासाने जेव्हा स्पेशल ट्रेनवरची मंडळी ओढ्याजवळ आली, तेव्हा एका चिंचेच्या झाडाखाली तण्णावून झोपा घेत असलेले बन्या नि तात्या, आणि त्याच झाडाखाली—उभ्या उभ्या—झोपलेला बादशहा त्यांना दिसला. त्या तिन्ही स्वाऱ्या उठल्यावर त्यांना असे कळले की डाकूला नि त्याच्या साथीला पकडून केव्हाच पोलिस कोठडीत रवाना केले आहे. या दोन्ही पोरांवर अन् विशेषतः बन्यावर सर्वजण निहायत खूष होते. त्यांच्यावर अधिकाऱ्यांनी शाबासक्यांचा मारा केला आणि मोतद्दाराने तर डोळ्यांत अश्रू आणून आधी बादशहाचे नि मग बन्याचे पापे घेतले. नंतर त्याने दोघाही मुलांना बादशहाच्या पाठीवर बसवून फुरसुंगीला त्याच्या घरीच वाजत गाजत नेले. म्हणजे वाजंत्री बरोबर नव्हते खरे, पण ते पहारेकरी पिस्तुलांचे बार हवेत उडवीत बरोबर चालत होते. घरच्या मंडळींना सर्व हकीगत कळल्यावर त्यांना केवढा अभिमान वाटला असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !

पण पकडलेला डाकू खेमराज खोसलाच होता. मांजरीहून त्यानेच खोटा फोन केला होता. कोल्हापूरहून महाराजांचा संदेश आला वगैरे सर्व थापा होत्या. बादशहासारख्या अश्वश्रेष्ठाबरोबर डॉक्टर धाडणार नाहीत हे शक्य तरी आहे का ? आणि अनोळखी पशुवैद्याला—मग तो दिल्लीचा असो नाही-

तर तेहरानचा असो—बादशहासारख्या घोड्यासाठी फोनवरून कोणी बोलवून घेईल का ?

खरी गोष्ट अशी होती की पहिला डॉक्टर आजारी पडला अशी अधिकाऱ्यांजवळ बतावणी करून पुढे खेमराजच्या टोळीनेच त्याला पळवून नेले होते आणि त्याची जागा खेमराज घेऊ पहात होता. तो त्याचा डाव केवळ फास्टर फेणेच्या चलाखीमुळे फसला. आपले नेहमीचे घरफोडीचे काम टाकून खेमराज घोड्याच्या मागे हात धुवून का लागला हे रहस्यही लवकरच उलगडले. खेमराज खोसलाने अनेक डल्ले मारून जी अपार संपत्ती लुटली होती ती त्याला कुठेतरी गुंतवायची होती. म्हणून त्याने रेसचे अनेक उत्तमोत्तम घोडे—अर्थात् कुणाच्या तरी खोट्यानाट्या नावाखाली—खरेदी केले होते. पण बादशहा मात्र खूप किंमत देऊ करूनही त्याला मिळू शकला नाही. तेव्हा त्याचा काटा काढणे ओघानेच आले. आपल्या घोड्याला जिंकायचा 'चान्स' द्यायचा असेल तर बादशहाला रेसमधून बाद करणे जरुरीचे होते. पण फास्टर फेणेमुळे त्याचे कारस्थान फसले आणि एरवी सर्वांना गुंगारा देणारा खेमराज डाकू पकडला गेला.

बादशहा शर्यतीत धावला; इतकेच नाही तर पहिला आला. त्याच्या मालकाने अत्यानंदाने फुरसुंगीच्या स्टेशन मास्तरांकडे ट्रंककॉल केला. बनेश फेणेचे अभिनंदन !—गुड गॉड ! ते तडकाफडकी धावत पळत भाई फेण्यांकडे आले. बन्याच्या पाठीत धबाधबा बुक्के मारून त्यांनी अभिनंदन सव्याज पोचते केले.

"मी मात्र गाढव !" ते घाम पुशीत म्हणाले, "त्या खोट्या फोनने फसलो ! पण भाई, तुमचा पोरगा अनन्य आणि तुम्ही नि वहिनी धन्य !.... बरं, मी येऊ ?.... थर्टीन अपची वेळ होतेय !—" आणि ते चहा घ्यायलाही न थांबता पुन्हा स्टेशनकडे पळाले.

दुसऱ्या दिवशी भाई फेण्यांकडे तारेने पाचशे रुपये आले !....बादशहाच्या मालकाने बन्याला स्वखुषीने दिलेले बक्षीस !

# फास्टर फेणेचे मार्जारी प्रकरण

" अग आत्या, ती रिपेर करता येईल अजून." बन्या उर्फ फास्टर फेणे म्हणाला.

पण आत्याने चिडून उत्तर दिले, " काही नको मला आता ती छत्री! तुला आवडते ना? घे खेळणं म्हणून!" असे म्हणून तिने ती छोट्या शशाच्या हातात दिली आणि शशाने " माया थत्ती!" असे म्हणून ती खुषीने कवटाळली.

बन्या सुट्टीत मुंबईला निशाआत्याकडे गेला होता, तेव्हाची ही गोष्ट आहे. आज नंदा नि शशी यांच्याबरोबर बन्यालाही तिने आपल्या मैत्रिणीकडे— मारजॉरीमावशीकडे— आणले होते. मारजॉरी डीमेलो पेडर रोडवर नवीनच बांधलेल्या तेरामजली इमारतीत साडेबाराव्या मजल्यावर राहायची. ती ख्रिश्चन होती म्हणून साडेबारा म्हणायची; कारण तेरा आकडा ख्रिश्चन लोकांत अशुभ समजतात!

डीमेलो मंडळी घरात कोकणी बोलत; इतरांशी शुद्ध मराठी.

गगनचुंबी इमारतीत—' स्कायस्क्रेपर 'मध्ये—चढायला मिळणार म्हणून बन्या खुषीत होता. पण आत्याची छत्री जेव्हा स्वयंचलित लिफ्टमध्ये अडकून मोडली तेव्हा सर्वांच्या उत्साहावर विरजण पडले. आत्या तर भयंकर वैतागली. कारण मारजॉरीनेच तिला अमेरिकेहून भेट म्हणून ती सुरेख गुलाबी छत्री आणलेली होती. येथपर्यंत ती ठीक यावी अन् आत्ताच तिचे तुकडे व्हावेत या गोष्टीची आत्याला चीड आली तर नवल नाही.

" आईची ट्रिक आहे बरं का ही ? " नंदा बन्याला एकीकडे म्हणते, " मुद्दाम शशाच्या हातात दिलीन्. म्हणजे मारजॉरीमावशीनं पाहिलंन् तर तिला वाटावं, पोरांनी मोडली ! "

आणि बन्या नंदाला एकीकडे म्हणाला, " मला एक आयडीआ सुचली आहे. आपण त्या छत्रीचं पॅराशूट बनवू या ! "

" पॅराशूट ? " फास्टर फेणेएवढाच एक मुलगा तेवढ्यात तिथे दाखल झाला होता अन् त्याच्याकडे मोठाले डोळे करून पाहात होता.

" तूच ना रे फास्टर फेणे ? " तो म्हणाला. आणि नंदाने त्यांची ओळख करून दिली, " हा मारजॉरीमावशीचा भुरगा पीटर ! " ती हसून म्हणाली, " भुरगा म्हणजे मुलगा. "

बन्याला तो भुरगा बेहद्द आवडला आणि पहिल्यापासूनच दोघांची गट्टी जमली.

" पॅराशूट ? " तो डोळे विस्फारून विचारीत होता, " म्हणजे तू त्याला धरून उतरला होतास तसं ? "

" हो, " बन्या हसून म्हणाला, " तसंच पण छोटं ! पॅराशूटसारखंच कापड आहे या छत्रीचं—सिल्क किंवा टेरिलिन ! वजन म्हणून एखादी वस्तू बांधू त्याला आणि देऊ सोडून तुमच्या गच्चीवरनं खाली ! "

" आयडीआ ! पडद्याच्या दोऱ्या पडल्या आहेत घरी. त्या आणतो मी ! " असे म्हणून पीटर घरात धावला.

आणि तेवढ्यात एक विचित्र प्रकार घडला.

शेजारच्या ब्लॉकचे दार उघडले. आतून एक सफेत सोनेरी, सुरेख मांजरी केकाटत बाहेर पडली आणि गच्चीच्या जिन्याने वर पळाली. तिला बदडणारा शेजारचा बुवा हातात काळा रूळ घेऊन उंबऱ्यावर उभा होता. त्याचे केस पिंजारलेले होते. डोळ्यांत क्रूरपणाची तांबूस छटा दिसत होती.

तेवढ्यात पीटर पडद्याच्या रेशमी दोऱ्या घेऊन आला होता. कपाळावर आठ्या चढवून तो म्हणाला, " हॅल्लो मि. सुब्रम् ! सॉरी अबाउट द कॅट ! " आणि मग बन्याकडे वळून एकीकडे म्हणतो, " आमचा नेबर मिस्टर सुब्रम्हण्यम्. म्याड आसा ! आमच्या डिंकीला दररोज छळतो. एकदा इस्पितळाची हवा खाऊन आलाय आणि आज फिरून अॅटॅक आलेला दिसता. आता काय करावं ? त्याची मंडळी पण इथं नाहीत ! "

त्याचा अवतार पाहून चकित झालेला फास्टर फेणे म्हणतो, " पण तुम्ही सोडता कशी मांजरीला या वेड्याकडे ? "

" आम्ही सोडीत नाही आणि ती जात पण नाही, " पीटर म्हणाला. " आज तिने वेडेपणा केलेला दिसतो. "

" पण हा भयंकर माणूस तिला ठार मारील एखाद् दिवस ! "

" नुसता मारणार नाही. तिची भाजी करून खाईल ! " पीटर म्हणाला, " भयंकर राक्षस आहे तो. ऑगर !—आणि नुसतं मांजरीलाच नाही, आम्हाला पण ठार मारील तो एखाद् दिवस ! "

इकडे तो वेडा माणूस रूळ उगारून बडबडत होता, " सॉरी क्या करता है—सॉरी ? डॅम ब्लडी कॅट ! मारेंगा उसको हम ! तुमको भी मारेंगा !—आय्

विल् किल् यू ! आय् विल् स्मॅश् यू टु ॲटम्स. " त्याचे दात तडतड तडतड वाजत होते—" आय् विल्—आय विल्—आय् विल्...."

" यू विल् गेट इंटु युवर हाऊस ! " फास्टर फेणेने ताडकन् त्याच्या उंबऱ्यावर उडी मारून त्याला आत ढकलीत म्हटले. नंदा ' ए बन्याऽ—' म्हणत असतानाच त्याने धाडकन् दार लावले अन् त्याला बाहेरून कडी घातली. मग ही पोरांची पलटण गच्चीवर धावली.

गच्चीवर जाताच नंदाने डिंकीला खूप शोधले. पण ती घाबरून कुठे लपली होती ती सापडलीच नाही.

तिकडे गच्चीच्या ऊंच भिंतीवरून बाहेरचे दृश्य पाहणाऱ्या बन्याने चकित होऊन आपला पेटंट उद्गार काढला होता, " ट्रॉक् !— बाप रे—बाप रे ! "

आणि शशाला पीटरने उचलून धरल्यावर तो म्हणाला होता, " तॉक् ! बाप् ये ! बाप् ये ! "


" काय मजा दिसते रे इथून ? दुसरी घरं किती ठेंगणी वाटतात ! तो फ्लाय-ओव्हर बघ ! ती खंबाला हिल ! ती या बाजूला मलबार हिल ! तो पलीकडे समुद्र ! आणि खाली ती माणसं नि मोटारी....बाप रे ! मुंग्या म्हणणेसुद्धा शोभणार नाही त्यांना. हे वळवळ करणारे सूक्ष्म जिवाणू वाटतात ! "

नंदाने एकदम डोके मागे घेतले. " आपल्याच्यानं नाहीबा बघवत खाली ! " ती म्हणाली. " मी आपली जाते ! "

पीटर म्हणाला, " इथून नुसतं पाहण्यानंसुद्धा चक्कर येऊन एखादा पडायचा; तसं होऊ नये म्हणून तर ही कठड्याची भिंत एवढी उंच केली आहे. "

तो भोवळ आणणारा खोलपणा पाहून बन्याला पुन्हा आपली 'आयडीआ'

आठवली आणि मग पीटर-फास्टर पॅराशूट कारखाना फास्ट गतीने काम करू लागला. छत्रीच्या काड्यांच्या टोकांजवळ कापडाला छिद्रे पाडून त्यांत रेशमी दोऱ्या ओवण्यात आल्या आणि खाली सर्व दोऱ्यांची टोके एकत्र आणून त्यांची पक्की गाठ बांधण्यात आली. छत्रीच्या घुमटाच्या मध्यावर एक छिद्र पाडले गेले. झाले पॅराशूट तयार ! आता याला वजन म्हणून कोणते पार्सल बांधावे याचा विचार ते करताहेत तोच जिन्यावर पावले वाजली.



एक काळे डोके वर येत होते. लवकरच त्या डोक्याखालचे धड दिसू

लागले. येणाऱ्या आकृतीकडे पाहात वन्या म्हणाला, " ड्रॉक् ! हेच पार्सल पाठवू या का? पण सुटला कसा हा कैदी ?"

त्याची कीव येऊन नंदानेच त्याला सोडला होता हे अर्थात् त्यांना माहीत नव्हते. आणि सुटताक्षणी रुद्रावतार धारण करून तो वर आला होता. हातातल्या रुळाची जागा आता बंदुकीने घेतली होती आणि तोंडाने ' आय् विल्, आय् विल् ' चा जप चालू होता.

" त्या बंदुकीला भिण्याचं कारण नाही. म्हणा, " पीटर म्हणाला, " त्याच्या मुलाची मोडकी एअरगन आहे ती. "

" तरी पण त्याची लक्षणं ठीक नाहीत ! लेटस् रन. "

" येस. लेटस् ! " असे म्हणून पीटरने जिन्याकडे धाव घेतली. त्याच्या हातातले पॅराशूट तिथेच पडले. वन्याही त्याच्यामागे धावला. पण जिना उतरण्यापूर्वी त्याने दार बंद करून त्याला कडी घातली. धडाधडा पायऱ्या उतरून दोघे भरधाव खाली घरात आले. वन्या तर जो बंदुकीच्या गोळी-सारखा आला तो मारजॉरीमावशीच्या अंगावरच आपटला.

" हा आमचा वन्या उर्फ फास्टर फेणे ! " आत्या म्हणाली.

मारजॉरीमावशी धापा टाकीत होती. ती आता हसून म्हणाली, " आता ते कशाला सांगायला हवं ? झालीच की त्याला शोभेशी ओळख !– कमॉन् किड्स् ! इतका वेळ कुठं होतात ? तुमच्यासाठी ॲपल पुडिंग केलंय. आवडतं ना सगळ्यांना ? "

फराळ झाल्याबरोबर दोघे पुन्हा गच्चीवर धावले.

" आता गेला असेल त्याचा ॲटॅक ! " वन्या म्हणाला.

" दार उघड. पण हळूच उघड ! "

बन्याने हलक्या हाताने कडी काढली, दार ढकलले. पाहतात तो दाराशीच वेडा पाय फाकटून दबा धरून उभा ! पण आता तो मारण्या-विरण्याच्या त्वेषात नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर विजयाची गुर्मी दिसत होती.

" हा: हा: हा: हा: ! " त्याने खिदळायला सुरवात केली. " कैसा मजा किया !– ओ: गॉड ! व्हॉट ब्लडी फन ! "

" व्हॉट हॅपन्ड, मि. सुब्रम् ? " पीटरने आश्चर्याने विचारले. " और.... " त्याचे डोळे काही तरी धुंडाळू लागले.

बन्याची नजरही भिरीभिरी फिरली. तो एकदम म्हणाला, " पॅराशूट ?– हमारा पॅराशूट किधर है ? "

" अपनी ड्यूटी बजाता है !– हा: हा: हा: हा: ! " वेडा सुब्रह्मण्यम् खिदळत म्हणाला, " देखो. "

त्याने बोट केले होते त्या दिशेला दोघांनीही पाहिले. काही दिसेना तेव्हा ते गच्चीच्या भिंतीकडे धावले. कठड्यावर ओळंगले आणि मग–

" ते बघ– "

" ओ हो ! काय मस्त चाललंय रे ! "

पॅराशूट आकाशातून मजेने उडत होते; आणि फास्टर फेणे तिकडे वटारल्या डोळ्यांनी पाहात होता. त्या क्षणापुरता दुसऱ्या-तिसऱ्या कोणत्याही गोष्टीला त्याच्या मनात थारा उरला नाही. गर्वाने त्याची छाती फुलली होती.

आणि पीटरही डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहात होता.

" सक्सेसफुल ! " तो ओरडला, " पण– पण त्याला वजन कोणतं बांधलंय यानं ? नीट दिसत नाही ! "

" खरंच की ! " मन्या म्हणाला. " अहो मिस्टर मॅडमन ! तुमने पॅराशूटके नीचे क्या पार्सल बांधा है ? वजनके वास्ते ? "

" पार्सल ? " वेडा खदखदला. आणि मग त्यांच्यापुढे तोंड वेंगाडीत म्हणतो, " एक जीता पार्सल है— लाईव्ह पार्सल ! "

आणि लगेच भसाड्या सुरात तो गायला लागला—

The parcel is
a little cat
A bad little cat
named Dinkie
Its master is
a boy named Peter
And he is
a bad little monkey.

आणि ते गाणे म्हणत वेडा सुब्रम्हण्यम् सबंध गच्चीभर नाचत धिंगाणा घालू लागला.

पीटर नि मन्या दोनतीन क्षण तोंडे वासून अन् डोळे फाडून त्याच्याकडे पाहातच राहिले !

मुंबईसारख्या प्रचंड शहरात माणसांची नि वाहनांची वर्दळ सदाच चालू असते. पेडर रोडवर तर काय, दादरकडे नि फोर्टकडे जाणाऱ्या मोटारी नि बसगाड्या यांचे उलट-सुलट प्रवाह सारखे धो धो वाहात असतात. माणसे त्या मानाने कमी; पण तरी फूटपाथवर संध्याकाळी भरपूर गर्दी असते. पण या साऱ्या रहदारीला एक प्रकारची नियमबद्धता असते. आता त्या नियमाला एकाएकी तडा गेला होता. कुठून तरी कोणीतरी

विजेचा शॉक द्यावा अन् अंग थरारावे तसे झाले होते. शाळकरी पोरे घरी जाता जाता थबकली होती. त्यांची बोटे वर रोखली गेली होती. मग काही मोठी माणसेही थबकली अन् वर पाहू लागली. बोटे दाखवून एकमेकांशी बोलू लागली.

पॅराशूट आपले गोते खात खात उत्तरेकडे चाललेच होते.

" काय रे ते ? छत्री ? वर उडाली ? "

" अंब्रेला ? छाता ? "

" छत्री ? इतक्या वर कशी उडत गेली ? नॉन्सेन्स ! ते पॅराशूट असणार ! "

" पॅराशूट ?—बाप रे ! पाकिस्तानचा हेर उतरतोय की काय ? पण—पण—पॅराशूट म्हणावं तर फार लहान वाटतं ! त्याला माणूस लटकणार कसा ? "

" मोठा माणूस नसेल ! " एक दहा वर्षांचा, गटाण्या डोळ्यांचा मुलगा म्हणाला, " आमच्यासारखा पोरगा असेल ! "

" हो, पाकिस्ताननं पोऱ्या धाडला असेल ! काय त्याचा नेम ? "

" पण....दिसत नाही ! "

" दिसेल कसा ? भरकटतंय किती, पाहा ना ! "

" गिंड्या लेका, आपणं पकडू या का रे त्या हेराला ? तिकडे कारमायकेल रोडवर पडणार बहुतेक. "

" चल—चल ! "

गळ्यात दप्तरांची ओझी कशीबशी सावरीत ती विद्यार्थ्यांची टुक्कल आचरटासारखी रस्ता ओलांडू लागली. पाकिटाची जेव्हा फारच अडगळ

झाली तेव्हा त्यांच्यापैकी एकाने ते रस्त्याच्या मध्यभागी फेकून दिले आणि तो पेडर रोडच्या त्या फाट्याकडे—कारमायकेल रोडकडे—धावला. काही झाले तरी प्रसंग बाका होता. अशा वेळी राष्ट्र आधी—अभ्यास नंतर !

इकडे ' किच्—कॅर्ऽऽ ' असे आवाज झाले. रस्त्यावर खाडखाड मोटारी उभ्या राहिल्या. त्यांच्या खिडक्यांतून टाळकी डोकावू लागली.

" क्या हुवा ?—क्या हुवा ? "

" कुछ नही. ॲक्सिडेंट नही. जमीनपर कुछ नहीं हुवा. उपर देखो—अस्मानमें ! "

सर्वांचे डोळे अस्मानाकडे लागले.

आकाशमार्गाने चाललेले ते चिमुकले गुलाबी पॅराशूट आता कारमायकेल रोडवर, म्हणजे रोडच्या पातळीपासून पन्नासएक फूट उंचीवर पोचले.

तेवढ्यात कोणीतरी फायरची काच फोडून हँडल फिरवले आणि अग्नि-शामक दलाला पाचारण दिले....

दरम्यान त्या तेरामजली बिल्डिंगच्या गच्चीवर एक पेचप्रसंग उभा राहिला होता.

" पागल—बदमाष ! " पीटर ओरडला होता. " हम तुमको पुलीसमें देंगे !—तुम क्या समझा ? "

" अरे जा ! " म्हणून वेड्याने टाकीच्या मागे हात घालून आपली बंदूक काढली होती; आणि ती या दोघांवर रोखून तो किंचाळला होता, " आय् विल्....आय् विल्....आय् विल्...."

" यू विल् डू नथिंग वुइथ दॅट टॉय ! " बन्या म्हणाला आणि त्याने जिन्याकडे धूम ठोकली. पीटर त्याच्या मागे धावला आणि जिन्याच्या

तोंडाशी थांबून त्याने खाडकन् पुन्हा दार लावले. वेडा सुब्रम् पुन्हा कैदी बनला. पण फास्टर फेणेने पीटरला मागे ओढून दार उघडले. तो म्हणाला, " त्याला कोंडणं जास्ती डेंजरस आहे. तो वेडा एखाद वेळेस गच्चीवरून रस्त्यावर उडी घेईल. त्याचा काय नेम ! "

" खरंच की ! "

बन्या नि पीटर उड्या मारीतच गच्चीचा जिना उतरले; आणि मग बन्याने फलांग मारून खालचा जिना गाठला.

इकडे नंदा, शशी, आत्या नि मारजॉरीमावशी हे सर्व मंडळ बाहेर कसली गडबड चालली आहे ते पाहण्यासाठी मजल्याच्या बोळात जमा झाली होती. इतकेच नाही तर खालच्या मजल्यावरची काही मंडळी पण धावून आली होती. पीटरने त्यांना थोडक्यात कल्पना दिली.

" तुम्ही तावडतोब पोलिसला फोन करा ! " तो म्हणाला, " आणि ठाण्याच्या मेंटल इस्पितळालाही कळवा. "

" मी कळवते, " आत्या म्हणाली. " तिथले डॉक्टर माझ्या चांगले माहितीचे आहेत. "

" वेड्याला पकडून न्यायचा तर ओळख कशाला हवी ? " नंदा पुटपुटली " आई उगाचच भाव खाते ! "

" आणि संभाळून राहा बरं का– " पीटर कर्त्या पुरुषाच्या थाटात म्हणाला, " भयंकर पागल माणूस आहे तो ! केव्हा काय करील याचा नेम नाही. "

आणि तो फास्टर फेणेच्या मागे धावला—

" ए फा. फे. ! तुला पण वेड लागलं काय ? जिन्यावरनं कशाला गडगडतोस मॅडसारखा ? लिफ्टमधून चल की ! "

" ड्रॉक् !" बऱ्याची जीभ टाळ्याला आपटली, " ते माझ्या लक्षातच नाही !"

जोडगोळी लिफ्टमध्ये घुसली. पीटरने बोट दाबले, ' ग्राउंड. '

त्याच वेळी बाराव्या मजल्यावर एक बिऱ्हाडकरू टेलिफोनच्या तबकडीत बोट फिरवीत होता— ' वन्—झीरो—झीरो. पोलिस—इमर्जेन्सी—'

आणि अकराव्या मजल्यावर एकजण डायल फिरवीत होता— ' वन्—झीरो— टू अँब्युलन्स '.

आणि तेराव्या मजल्यावर आत्या फोनमध्ये बोलत होती— " कोण ? बाळासाहेब ? काय सांगू तुम्हाला ? इथं सगळा गोंधळ माजला आहे हो ! एक वेडा माणूस इथं मांजरांची नि माणसांची कत्तल करतो आहे. असाल तस्से धावत या !"

जिकडे तिकडे ' ट्रिंग—ट्रिंग 'ची धमाल उडाली होती.

" मोटारीतून या हो— " नंदाने मध्येच तोंड घातले.

" हेड्कॉप्तल्मधून या "— शशा.

" तुम्ही नका हो येऊ "—आत्या सावरून घेत म्हणाली, " कुणाला तरी पाठवा. रिस्पॉन्सिबल माणसाला !"

बुऱ्या-पीटरची दुक्कल तेरा मजले उतरून खाली आली होती. लिफ्ट-मधून सरळ पायऱ्यांवर अन् पायऱ्यांवरून फूटपाथवर त्यांनी लांब उड्या मारल्या आणि वाटेतल्या पादचाऱ्यांना बाजूला ढकलीत ते पुढे धावले.

" ए ! दिखता नहीं क्या ?"

" डोळे फुटले का रे मेल्यांनो ?"

" आय् ! केवढ्यानं धक्का दिलान् ! समोरचं माणूस दिसत नाही ? "

पण खरोखरीच आमच्या बालमित्रांना समोरचे माणूस दिसत नव्हते. त्यांना फक्त मांजरी दिसत होती– पॅराशूटला लटकणारी डिंकी ! केव्हा जाऊन तिला गाठतो अन् तिची सुटका करतो असे त्यांना झाले होते. अर्थात् तिला सोडवायचे कसे, याचा कोणताही मार्ग त्यांना सुचलेला नव्हता. ते आपले दडा-दडा दौडत होते. पण– पण– पण जिवंत तरी असेल का ती ?

" डिंकीला लागलं असेल का रे ? "

" मला नाही वाटत ! मघाशी मजेनं उडत होती. "

" मांजराला लागत नाही म्हणे ! कुठूनही पडलं तरी चार पायांवर उभं राहतं ! "

" कुठूनही म्हणजे काय ? तेराव्या मजल्यावरून ? – आणि याचे चारी पाय त्या गद्ध्यानं बांधलेले असले तर ? "


" पण पॅराशूट आहे ना.... "

" बोंबललं ते पॅराशूट ! " फास्टर फेणे म्हणाला. " कुठून दुर्बुद्धी झाली मला पॅराशूट करायची देव जाणे ! "

खरंच, कुठून आपल्याला बुद्धी झाली ? काय झालं असेल त्या बिचाऱ्या डिंकीला ?

बन्याला मांजरे आवडत नसत हे खरे, पण म्हणून त्याला हृदय नव्हते असे नाही. त्याला सारखी रुखरुख लागली होती. एवढासा चिमुकला मुका जीव तो ! त्याला एका मंद् विकृत झालेल्या बुवाने शंभर फूट उंचीवरून खाली फेकून दिलेले ! छत्रीला बांधून असले, तरी फेकलन् ना त्याने !

" मीसुद्धा बावरलो होतो पक्क्या पॅराशूटमधून उतरताना ! मग त्या बिचाऱ्या मांजराला काय झालं असेल ? "




इकडे रस्त्यातला गलका आता वाढला होता. मोटारींची शिंगे वाजत होती– पॅम-पॅम ! ब्रेक वाजत होते– कॅर्र-किच् ! आणि त्यातच आता भर पडली होती आगीच्या बंबांची. एक पोरगा कोकलत होता, " बंबवाला चाललाय ठण्-ठण्-ठण्-ठण् ! "

" बाप रे ! आणखी एक बंब आला ! बघ– "

" मुंबईत अठरा बंब आहेत आहेत. ते सगळे जमतील बघ लवकरच ! "

पीटर म्हणाला, " पण हा बघ कारमायकेल रोड आला आणि ती बघ डिंकी– "

आतापर्यंत मधल्या इमारती नि झाडे यांच्या अडथळ्यांमुळे डिंकीचे पॅराशूट काही वेळ यांच्या नजरेआड झाले होते. आता त्यांना ते स्वच्छ दिसू लागले.

पण पेडर रोडवरून उजवीकडे वळलेली ती गल्ली आता पोलिसांनी साखळी करून बंद केली होती.

" हवालदारसाहेब, प्लीज सोडा ना आम्हाला– "

" हुकूम नहीं ! "

" अहो, आमचं मांजर आहे ते ! "

" असेल– तुम्ही सोडवणार आहात का त्याला ? हट जाव्– पीछे हटो ! "

बन्या म्हणाला, " त्यात काही अर्थ नाही ! आपला मार्ग आपल्यालाच काढला पाहिजे ! "

कारमायकेल रोडला लागून एक वाडी होती. कंपाऊंडचे फाटक बंद होते, पण त्या फाटकावर चढून आत कुदणे म्हणजे बन्याच्या हाताचा नि पायाचा मळ होता. पीटरला मात्र ते चटकन् जमेना. तेव्हा बन्याने आत बुडी टाकताच एकदा अवती भवती पाहिले. बंगल्यातली सर्व मंडळी बाहेरची गडबड पाहण्यात गुंतली आहेत हे पाहून त्याने पटकन् फाटकाची कडी उघडून पीटरला आत घेतले आणि दोघेही बागेच्या पिछाडीकडे धावले. तिथली भिंत ठेंगणी होती; ती त्यांनी चुटकीसरशी ओलांडली आणि ते आणखी मागच्या वाडीत गेले. इथे ताडामाडाची उंच झाडे होती. झावळ्यांच्या गचडीतून बन्याने वर पाहिले तेव्हा डिंकीचे गुलाबी पॅराशूट हळूहळू आपल्याच दिशेने येत असलेले त्याला दिसले. मध्येच ते झावळ्यांच्या आड अंतर्धान पावले.

" ड्रॉक् ! कुठे गेलं रे ? "

" ते बघ ! "

" आता पुन्हा पॅराशूट दृष्टिपथात आले होते. उंच चढत होते, खाली येत होते; गोते खात होते. त्यामुळे डिंकी दिसत नव्हती. कुठे अडकणार तर नाही ती ? "

" आत्ता मला डिंकी दिसली ! " बन्या म्हणाला.

" रडत होती का रे ? "

" हॅट्ट ! मांजरं रडत नसतात. पण मला नीट दिसलंच नाही. जिवंत आहे की—"

" ए ऽ ! काही तरी बोलू नकोस ! डिंकी एवढ्या लांब सुखरूप आली ती शेवटी मरायची नाही. "

आणि त्याच वेळी डिंकी पुन्हा दिसली. तिचे पॅराशूट येऊन बागेतल्या एका उंच माडाच्या झावळीवर पडले. त्याच्या दोऱ्या नि कापड फांद्यांना अडकले आणि डिंकी पण अडकली. थोड्या वेळाने तिचे शरीर फांदीपासून सटकले अन् खाली लोंबायला लागले.

" म्यांव– म्यांव्– "

पीटरला भास झाला, की खरेच ओरडत होती डिंकी ? कुणास ठाऊक ! पण एवढे खरे की ती जिवंत होती; इतकेच नाही तर शुद्धीवर होती. चांगली हालचाल करीत होती की– घाबरली असली तरी !

पण आता....

" बाप रे ! "

पाय पक्के बांधलेले होते अन् छत्रीच्या कापडात एक वाळक्या फांदीचे टोक घुसून छत्री रुतली होती म्हणूनच डिंकी पडली नाही. ती लटकत

राहिली. पण छत्री आता फाटली होती आणि ती सुटली असती तर डिंकी पुन्हा उड्डाण करण्याऐवजी सरळ खाली येऊन आपटली असती. तिच्या चिमुकल्या देहाच्या चिंधड्या झाल्या असत्या !

बाहेर गल्लीत एक बंब शिरला होता. बंबवाले वर बघून कपाळाला हात लावीत होते.

" वह मेरी बिल्ली है—उसको बचाव ! " पीटर किंचाळला.

" कैसे बचाना ? " बंबवाल्यांचा प्रमुख म्हणाला. " आमच्याजवळ उंच शिडी आहे; पण ती वरपर्यंत पोचवायची कशी ? झाडं किती आड येताहेत, पाहा ना ! "

त्याची ही निष्फळ बडबड चालू असतानाच झाडाला लटकलेले पॅराशूट खाली डुचमळले आणि डिंकी आता पडते की मग पडते अशा अवस्थेत हेलकावे खाऊ लागली.

" डिंकी ! " पीटर ओरडला आणि त्याला निदान त्याला एकट्याला तरी तिची केविलवाणी किंचाळी स्पष्ट ऐकू आली — " मियांव्, मियांव्, मियां....व्—"

" डिंकी म्हणून चिकटली आहे झाडाला डिंकासारखी ! " कोणीतरी विनोद केला, " दुसरी असती तर पडलीच असती ! "

बंबवाल्याची शिडी अजून झाडपाल्यातच घोटाळत होती. " मी चढतो झाडावर ! " तिकडे पाहात बन्या म्हणाला. आणि लगेच त्याने माडाचा बुंधा कवटाळलासुद्धा.

" अरे, पण तुला येतं का चढता ? " असे पीटर विचारतो आहे तो बन्या दहा फूट उंचीवर गेलाही होता. सुदैवाने ते नारळीचे खोड चिंचोळे होते, बन्याच्या कवेत मावण्यासारखे. आणि त्याला खाचा पाडल्या होत्या

त्याही झकास होत्या. पाय निसटण्याची भीती नव्हती. पण हातांना खरचटत होतेच.

वन्या उर्फ फास्टर फेणे इतक्या सरसर वर चढला की खाली जमा झालेली अन् उत्सुकतेने वर पाहणारी मंडळी थक्क झाली. कित्येकांच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाले. फार काय, दुसऱ्या दिवशी हा किस्सा आपल्या मित्रांना सांगताना वन्याच्या श्रोत्यांइतकाच तो स्वतःही थक्क झाला. वृक्षारोहणाचा हा विक्रम आपल्या हातून कसा काय पार पडला याचे त्याला पुढे राहून राहून नवल वाटायचे. पण खरी गोष्ट अशी होती की फास्टर फेणेला एक प्रकारची धुंदी चढली होती. त्या धुंदीत तो झाड चढून गेला— अगदी वर शेंड्यापर्यंत गेला आणि हात लांब करून त्याने डिंकीला पकडले. चर्र वाजले अन् डिंकी इतक्या चटदिशी त्याच्या हातात आली, की वन्या जरा चपापलाच. छत्रीचे कापड टरकले होते आणि दोन क्षण उशीर झाला तर डिंकी—पाय बांधलेली डिंकी—भूतलावर पडली असती आणि तिचा कपाळमोक्ष झाला असता. ही गोष्ट आत्ता त्याच्या ध्यानात आली होती. त्याला एकदम शहारल्यासारखे झाले.

" डरो मत, डिंकी ! " असे तो म्हणाला खरा, पण—

त्याला कसेसेच होत होते.

उजव्या हाताने डिंकीला धरले होते तेव्हा माडाचा आधार फक्त डाव्या हाताला मिळत होता. वन्याला एकदम अशक्त वाटू लागले. आपला डावा हात निसटतो की काय ! तोल जाऊन आपण पडतो की काय असे त्याला वाटले. तो गांगरला. मग त्याने माडाला उजव्याही हाताचा विळखा घातला पण त्या हाताच्या पंज्यात मांजरी असल्यामुळे उजव्या हाताने त्याला झाड नीट धरता येईना.

फास्टर फेणेची क्षणमात्र फेंफें उडाली. छातीत धडधड होत असताना

त्याने घाबऱ्या घाबऱ्या खाली पाहिले.

अंतर फार होते....फार....पण खाली फास्टर फेणेला सोडवण्याची जय्यत तयारी सुरू होती. चार बंबवाले वाडीची भिंत चढून आत आले होते. त्यांनी हातातले जाळीदार कापड ताणून धरले— सर्कशीतल्यासारखे वर पाहात ते ओरडले, " फेक दो बिल्लीको ! "

दुसरा एक बंबवाला माड चढू लागला.

बाहेर कारमायकेल रोडवर बंब उभा होता. त्यातले बंबवालेही स्वस्थ नव्हते. एकजण हातात छोटी कुऱ्हाड घेऊन शिडीच्या टोकापर्यंत चढला होता. वाटेत येणारी झाडांच्या फांद्यांची अडगळ त्याने सपासप कुऱ्हाड चालवून दूर केली होती. खालचा बंबवाला हँडल फिरवीत होता. शिडी उंच-उंच तिरकी चढत होती. लवकरच तिचे टोक माडाला टेकले. बंबवाला भराभर पायऱ्या चढून टोकापर्यंत गेला. त्याने हात पुढे केले....

माडावर चढलेला बंबवाला फास्टर फेणेपर्यंत पोचला. त्याने त्याला एका हाताने घट्ट धरले.

बन्याने यापूर्वीच डिंकीला सोडून दिले होते. डिंकी खाली जाळ्यात पडली होती. टणकन् वर उडाली होती....पुन्हा पडली होती....टणकन् वर उडाली होती....पुन्हा पडली होती. टणकन्....अगदी सर्कशीतला प्रकार चालू होता.

डिंकीला काही म्हणता काही लागले नव्हते. तिच्या त्या मऊमऊ केसां-पैकी एकालाही धक्का लागला नव्हता. फक्त ती घाबरलेली होती, भलतीच घाबरली होती आणि अखंड 'म्याव्–म्याव्' करीत होती. बंबवाल्याने तिला उचलून कडेवर घेतल्यावरही तिने 'म्याव्–म्याव्'चा सपाटा चालूच ठेवला अन् जमिनीवर उडी घेतली. आणि मग ती धूम पळाली असती. पण....

" डिंकी– डिंकी !"

कानांवर ओळखीचा आवाज आला म्हणूनच ती थांबली. पीटर पुढे धावला होता. त्याने तिला उचलले; घट्ट कवटाळले आणि तिचा पापा घेतला.

इकडे माडावरच्या बंबवाल्याने बन्याचे मुटकुळे शिडीवरच्या बंबवाल्याकडे दिले होते.

" शुद्धीवर आहेस ना बाळ ?" शिडीवरच्या बंबवाल्याने विचारले. बन्याने मानेनेच होकार दिला.

" मग माझ्या पाठुंगळीला बैस. माझ्या गळ्याला घट्ट मिठी मार."

बन्या त्याप्रमाणे त्याला घट्ट कवटाळून बसला. शिडीवरचा बंबवाला फा. फे. चे पार्सल घेऊन खाली उतरला. माडावरचा बंबवाला माड उतरला.

आतापर्यंत टांगल्यासारखे झालेले बऱ्या लोकांचे जीव भांड्यात पडले. जवळजवळ प्रत्येकाच्या तोंडातून सुटकेचा निःश्वास निघाला. पेडर रोडवरचे बाकीचे बंब ' ठण-ण् ' करीत परत निघाले.

पीटरचे डोळे पाणावले होते. बंबवाल्यांच्या प्रमुखांशी हस्तांदोलन करीत तो म्हणाला, " थँक्यू सो मच, सर !"

" आम्हाला कशाला थँक्स देतोस ?" ते हसत म्हणाले. " तुझ्या या लुकड्या मित्राला दे. तो वेळेवर वरती जाऊन पोचला नसता तर मांजर हाती लागलं नसतं. काय नाव म्हणालास त्याचं ?"

" डिंकी."

" यू आर ए ब्रेव्ह बॉय, डिंकी" बन्याचा हात हलवीत ते म्हणाले.

" अहो, त्याचं नाही नाव डिंकी !– मांजराचं. हा मुलगा तर चिन्यांशी

लढून आलेला प्रसिद्ध वीर आहे. तुम्ही ऐकलेलं नाही त्याचं नाव ?– फास्टर फेणे ! ”

बँडवाल्यांच्या प्रमुखांनी डोळे विस्फारले. मग ते मोठ्याने हसले. सगळेच बँडवाले हसले. मग प्रमुखांनी ललकारी दिली तेव्हा सर्वांनीच त्यांना अनुमोदन दिले—

“ थ्री चिअर्स फॉर फास्टर फेणे !– हिप्– हिप्–”

“ हुर्रे ! ”

“ हिप्– हिप्–”

“ हुर्रे ! ”

“ हिप्– हिप्–”

“ हुर्रे ”

“ पोलिस इन्स्पेक्टर आलेले आहेत आणि ठाण्याहून बाळासाहेब स्वतः येताहेत, ” आत्या म्हणाली. “ सुत्रमूला ते स्वतःच्या जबाबदारीवर मॅड म्हणून सर्टिफाय करतील. ”

सर्वांचे कॉफीपान नुकतेच उरकले होते. बऱ्याची भोवळ विवळ थांबली होती. त्या तेरामजली इमारतीतले सगळे तेराशे लोक तिथे जमले होते की काय कोण जाणे ! त्यांनी फास्टर फेणेला अक्षरशः ‘ घेराव ’ घातला होता.

डिंकी मजेत होती. तिलाही दूध मिळाले होते आणि वर पापलेटचा खुराक आणि आता मारजॉरीमावशी तिचे मटामट मुके घेत होती आणि म्हणत होती, “ निशा, एकदाच आणलंस तू या फास्टर फेणेला तर त्यानं पेडर रोड हादरून सोडलान् ! आता याची ओळख आम्ही कध्धी कध्धी विसरणार नाही ! ”

" पण ममी, " पीटर म्हणाला, " तू त्याला गुडबाय केल्यासारखं काय बोलते आहेस ? आज याला आपण सोडायचंच नाही मुळी ! "

" चालेल ! " मारजॉरीमावशी म्हणाली. " आज बन्या पीटरकडेच राहील. उद्या येईल तो दादरला. "

" चालेल. " आत्याही म्हणाली. " हो, तेवढीच दादर भागाला शांतता ! "

आणि नंदा म्हणाली, " कसा येशील, बन्या ? विमानातून की रॉकेटमधून ? "

# फास्टर फेणेचे काश्मिरी साहस

श्रीनगरच्या या निसर्गसुंदर सरोवराच्या काठाशीच पडलेल्या या लहानग्या होडीआडून कुणाची बरं डोकी वर येत आहेत ?....अरे, यातलं एक डोकं तर आपल्या ओळखीचं आहे—बन्या उर्फ फास्टर फेणे ! पण हा काश्मीरमध्ये कधी आला !

सांगतो हं तुम्हाला त्याचा काश्मिरी किस्सा !

झेलम नदीचा नागमोडी प्रवाह सकाळच्या कोवळ्या उन्हामध्ये चकाकतो आहे. जणू एखाद्या राजकन्येने काढून टाकलेला रुपेरी कंबरपट्टाच. नदीच्या दोन्ही तीरांवर गर्द वनश्री आहे आणि हिरव्या गार झाडांच्या गर्दीतून ठोकळ्यांसारख्या लाकडी इमारती डोकावत आहेत. नदीवर ठिकठिकाणी घातलेले पूलही लाकडाचेच आहेत. खुद्द झेलमच्या पात्रांतही लाकडी घरे थोडी आहेत असे नाही. ही पाण्यावर डुलणारी लाकडी घरे म्हणजेच काश्मीरच्या सुप्रसिद्ध गृहनौका—हाऊसबोटी !

या हाऊसबोटींपैकी काही नौका फारच अलिशान दिसत आहेत.

काश्मीरमध्ये चैन करण्यासाठी आलेल्या श्रीमंत हौशी मंडळींनी या विलासी नौकांमधून मुक्काम ठोकलेला आहे. महिना महिना हे लोक आपल्या टुमदार जलवेष्टित घरात राहतात, पोहतात, मासे मारतात, धनुष्यबाणाने किंवा बंदूक घेऊन पाखरांची शिकार करतात; कधी कधी शिकाऱ्यात बसून नदीतून स्वैर भटकायला जातात, तर कधी अरण्यातून पायी सहली काढतात. काश्मीरचे हे अरण्य म्हणजे पृथ्वीवरचे नंदनवन ! उंच उंच पाइन, देवदार नि चिनार वृक्ष; लांब लांब पात्याच्या विलोसारख्या पाण्यावर वाकलेल्या वनस्पती; द्राक्षे नि चेरी यांसारख्या नाजुक स्वादिष्ट फळांची आणि फर्न, गुलाब, चेरीब्लॉसमसारख्या फुलांची झाडे रानोमाळ आढळतात. रंगीबेरंगी रानफुलांनी डोंगर-उतार सजलेले असतात. जरा दूर झाडांच्या पलीकडे नजर फेकली तर हिमालयातले ऋषितुल्य पहाड आपली पांढरी माथी वर करून आपल्याकडे मोठ्या गंभीरपणे पाहात आहेत असे दिसते.

अशाच एका सोनेरी उन्हाच्या सकाळी पंधरासोळा वर्षांचे दोन मुलगे अन् बारातेरा वर्षांची एक मुलगी झेलमच्या काठाकाठाने ओल्या पानांचा खच तुडवीत धावत निघाली होती. बाळकुड्या मुलाच्या हातात तिरकमठा होता तर दुसऱ्या गोऱ्यापान गोबऱ्या मुलाच्या हातात बेचके होते. त्यांना नुकतीच कुणी तरी अशी बातमी दिली होती, की झेलमवरच्या खडकांत जी असंख्य बिळे आहेत त्यांत कधी कधी चंदेरी कोल्ह्याची वस्ती असते. अर्थात् बातमी खरी होती की थाप होती ते कुणास ठाऊक ! चंदेरी कोल्हा ऊर्फ सिल्व्हर फॉक्स म्हणजे महामौल्यवान् प्राणी. त्याच्या कातड्याला हजारो रुपयांची किंमत येते आणि अशा चंदेरी कोल्ह्याची मऊ केसाळ 'फर' गळ्यात घालून ठुमकत ठुमकत जाण्याची फॅशनेबल बायकांना फार हौस असते म्हणे ! आमचे बालवीर मात्र कोल्ह्याच्या शिकारीला निघाले होते ते तसा हेतू धरून नाही. त्यांच्या मनातून चंदेरी कोल्हा जिवंत पकडून आणायचा होता. अर्थात् कोल्ह्याच्या ऐवजी आपल्या हातांत एक क्रूर लांडगा पडणार

याची त्या वेळी त्यांना थोडीच कल्पना होती !

या मुलांपैकी वाळवुंडा वीर आपल्या चांगला परिचयाचा आहे. त्याचे नाव वन्या उर्फ फास्टर फेणे. त्याच्या गोऱ्यापान गुटगुटीत मित्राचे नाव अन्वर हुसेन.

कोण विचारतंय ते—फास्टर फेणे तर पुण्याचा राहणारा; तो इथे कसा आला? असा प्रश्न करणाराची कीव करावी तेवढी थोडी होईल. फास्टर फेणे कुठे वाटेल तिकडे जातो. नेफा आघाडीवरसुद्धा हे रोडके पोर जाऊन आले हा इतिहास विसरलात का तुम्ही? शिवाय, काश्मीरला तर काय, कुणीही जातो. जसं काशी तसं काश्मीर. एक यात्रेचं ठिकाण. भारताचं नंदनवन. ज्याने काश्मीर पाहिलं नाही त्याला आपल्या संस्कृतिसंपन्न राष्ट्राचं एक अंग दिसलंच नाही असं म्हटलं पाहिजे. ज्याला ज्याला म्हणून संधी मिळेल त्याने काश्मीर पाहावे. आमच्या फास्टर फेणेचे सौभाग्य हे की काश्मीर पाहण्याची संधी त्याला फारच लहान वयात अन् अचानक लाभली. त्याच्या मामांनी अगदी आयत्या वेळी जयगंगा यात्रा कंपनीची तिकिटे काढून काश्मीरचा दहा दिवसांचा झटपट दौरा आखला, तेव्हा त्यांनी वन्यालाही होस्टेलमध्ये फोन करून विचारले. नुसते त्याला नाही. नंतर फुरसुंगीला त्यांनी ट्रंककॉल केला. वास्तविक वन्याचे हे एसेस्सीचे वर्ष. त्यामुळे इतक्या दूरच्या ट्रिपवर शाळा बुडवून जावे की नाही असा त्याला पहिल्यांने प्रश्न पडला होता. पण त्याच्या खुद्द वडिलांनीच जेव्हा फुरसुंगीच्या पोस्टातून फोन करून सांगितले की, " तू खुशाल जा. प्रवासाची कुठलीही संधी तुझ्यासारख्याने सोडू नये. दहा दिवस काही फार नाहीत. अभ्यास तुला आल्यावर भरून काढता येईल. " तेव्हा मग प्रश्नच उरला नाही. वन्याने आपली पुस्तके ट्रंकेत भरून तिला कुलूप ठोकले आणि बॅगेत आपले कपडे कोंबून तो तडकाफडकी मामांच्या बरोबर यात्रा कंपनीच्या गाडीतून श्रीनगरला आला होता. मामा, मामी, त्यांची मुलगी माली अन् वन्या, तसेच मामांचे

एक मित्र नि त्यांच्या पत्नी अशी सहाजणे होती. श्रीनगरला येताच त्यांनी पाच दिवसांच्या बोलीने एक छोटी हाऊसबोट घेतली होती; आणि तीत सर्व जण मोठ्या मजेने राहिले होते. हाऊस बोटीचे नाव होते 'रोशन आरा.' तिचा मालक शमसुद्दीन मोठा उमदा आनंदी गडी होता; आणि त्याच्या अन्वर नावाच्या मुलाशी बन्या-मालीची चांगली गट्टी जमली होती. श्रीनगरच्या सर्वंध परिसरात अन्वरने त्यांना हिंडवून आणले होते आणि मोठ्या माणसांबरोबर बघायला मिळणार नाहीत अशा अनेक गमती त्यांना दाखवल्या होत्या. आता त्यांना एका दृष्टीने वाईट वाटत होते. कारण लवकरच ही सुंदर निसर्गशोभा सोडून आपल्याला रांगड्या पुण्याकडे परतावे लागणार आणि नेहमीचे व्यवहार अन् अभ्यास यात बुडावे लागणार ही कल्पना मनाला अस्वस्थ करणारी होती. त्यांना राहून राहून वाटत होते की वडील मंडळींनी मे महिन्यातच ही ट्रिप काढली असती तर किती बहार झाली असती!

"त्यातून—" मामा सकाळी म्हणाले होते, "उरले सुरले दोन दिवस तरी आपल्याला लाभणार आहेत की नाही याची आता शंकाच वाटते आहे. एखाद वेळेस पोलिस किंवा मिलिटरी उद्याच आपल्याला इथून हलायला सांगेल."

"म्हणजे? ते का बुवा?" बन्या नि माली एकाच वेळी उद्गारली.

उत्तरादाखल मामांनी त्यांच्यापुढे 'हिंदुस्तान टाइम्स' चा अंक केला होता. त्यात बातमी छापलेली होती की पाकिस्तानव्याप्त प्रदेशातून बरेच लोक काश्मीरमध्ये घुसले आहेत आणि त्यांनी हेरगिरीला सुरवात केली आहे. जम्मू-काश्मीर सरकार त्यांच्याविरुद्ध कडक इलाज योजीत आहे.

"कहते हैं पॅराशूटवाले भी उतरे हैं" अन्वरला त्या वेळी न राहवून तो बन्याच्या कानात म्हणाला होता. "लेकिन पेपरमे कुछ आया नहीं!"

" पण पाकिस्तानचे शिपाई काश्मीरच्या सीमेवर नेहमीच त्रास देत असतात ना ? त्यात नवीन ते काय ? " मामी म्हणाल्या होत्या आणि त्यावर मामांनी सांगितले होते की या वेळची त्यांची लुडबुड साधी नाही. पाकिस्तानने फार मोठा डाव रचलेला स्पष्ट दिसतो आहे. काश्मीरवर स्वारी करण्यासाठी त्यांचे हात म्हणा, पाय म्हणा, शिवशिवताहेत. सरहद्दीवर त्यांनी खूप मोठं सैन्य जमवलं आहे. तोफा नि रणगाडेसुद्धा खूप आणले आहेत. "

" हे हल्लेखोर हेर म्हणजे युद्धाची विनीवरची तुकडी आहे म्हणा की ! " बन्या म्हणाला होता. " आधी हेर पाठवायचे अन् मग चोरट्या हल्ल्यांना सुरवात करायची हे दगलबाज देशाचं नेहमीचं तंत्र आहे. "

" घ्या !— या आमच्या जवानमर्दाला विचारा ! नेफा आघाडीवर जाऊन आलाय म्हटलं तो ! " मामांचे ते मित्र किणीकाका हसत म्हणाले होते.

" पण— ए मर्दा ! " मामींनी लगेच डोळे वटारून त्याला बजावले होते, " तुझ्या वडिलांनी काय कानमंत्र दिलाय तो विसरायचा नाही, बरं का ? "

बन्याने ओठावर ओठ दाबून जोरजोराने मान हलवली होती. तो कानमंत्र बन्या कसा विसरेल ? ट्रिपसाठी परवानगी देणाऱ्या पत्रातच त्याच्या बाबांनी एक ताजा कलम जोडला होता. त्यात त्यांनी बजावले होते— " काश्मीरमध्ये जा— अवश्य जा. पण ही ट्रिप आहे हे विसरू नकोस आपण मामांच्या बरोबर जात आहो हे लक्षात ठेव आणि मामांच्याच बरोबर परत ये. नाहीतर अडीच वर्षांपूर्वी जमशेदपूरला केलंस तसं करशील— हो बाबा ! काश्मीरदेखील एक यज्ञकुंडच आहे आणि तुला विस्तवात उडी घ्यायची भारी खोड आहे. पण लक्षात ठेव. अजून तू लहान आहेस. "

" ल्हान !—हं: !"

बन्याने वडिलांची अट मान्य केली होती खरी; पण त्या ' ल्हान ' शब्दाने त्याचा अगदी तिळपापड झाला होता. हे असले काही लढाई बिढाईबद्दल ऐकले की त्याचे बाळकुडे बाहू फुरफुरू लागत; आणि तो म्हणे— " मरो ते ल्हानपण ! लोक ' ल्हानपण देगा देवा ' म्हणतात, पण देवा— तू आपला मला झटपट मोठाच कर ! म्हणजे चांगला उघड उघड खाकी पोशाख करून मला सैन्यात जाता येईल. शत्रूचा समाचार घेता येईल—अजून किती ? तीन वर्षं हवीत ना ?—की सहा ? वयाने किती लागतो ? अठरा की एकवीस ?

बन्याने जे रणकंदन पाहिले होते त्याची आज त्याला आठवण झाली आणि हिंमतसिंग, खंडू चुंबळे यांच्यासारख्या रणशूर जवानभाईंच्या स्मृतींनी त्याला गहिवरून आले होते.

आता झेलमच्या किनाऱ्यावरून ही मुले चांगली दीड मैल दूर आली होती. मालीच्या हातात तिचे छोटे स्केचबुक नि पेन्सिल होती. दालसरोवराचे एखादे रमणीय दृश्य रेखाटण्याचा तिचा बेत असावा. पण बन्याने तिची टर उडवली होती.

" ताईसाहेब, आपण म्हटलं शिकारीला चालली आहो, चित्रं काढायला नाही. "

आणि त्यावर मालीने उलट टोमणा मारला होता—" तुम्ही शिकार करा. मी त्या शिकारीचं चित्र काढीन. अर्थात् पहिलं जमलं तर दुसरं जमणार ! "

ताज्या घटनेवरही त्यांच्या गप्पा चालल्या होत्या.

" अगर पाकिस्तानी आयेंगे " अन्वर बेचके ताणून म्हणत होता, " तो उनको बता देंगे इधर किनसे मुकाबला है—इथले मुसल्मान म्हणजे बोळ्याने दूध पिणारे नाहीत म्हणावं ! अब्बाजान कहते हैं— "

हिंदुस्तानमें खुशहालीसे
रहते हैं सब मजहब
पाकिस्तानही खालीपीली
मचा रहा है गहजब

है क्या उनके वहाँ—सारा गोलमाल और बंडलबाजी ! ”

“ हां—हां—” धनुष्याला बाण जोडीत बन्या म्हणाला, “ वहाँ तो किसी का जूता किसीके पाँवमें नही ! ”

“ लेकिन उनके कुछ आदमी यहाँ है ! सुना है कि आदमपुरेमें कुछ जगहपर वे मिलते है—कधी कधी कागज वाटतात. पण श्रीनगरचे बहुतेक लोक फाडून त्याच्या चिंध्या करतात ! ”

“ कागद ? काय असतं त्या कागदात ? ”

“ बंडलबाजी ! दूसरा क्या ?—ढेर बातें कहेंगे वे, यहाँ कोई सुनेगा नहीं !—बातें ऐसी होती हैं—यह देख ! ” असे म्हणून त्याने खिशातून एक चुरगळलेले हँडबिल काढले अन् बन्यापुढे केले. मग त्याच्या एकदम लक्षात आले की बन्याला कश्मिरी भाषा येत नाही आणि त्या पत्रकात छापलेला मजकूर कश्मिरी भाषेत होता.

“ हिंदुस्तानकी बदनामी की है—और कुछ नही ! ” तो कागद परत खिशात कोंबीत अन्वर म्हणाला.

“ मग तू कशाला ते एवढं जवळ बाळगलं आहेस ? ”

“ पोलिसला देणार आहे. अब्बाजाननी सांगितलं आहे की असली काही पत्रकं मिळाली तर ती पोलिसकडे द्यावीत. ”

बोलत बोलत तिघे डाल सरोवरावर आली होती. या ठिकाणी तलावाच्या किनाऱ्याला बाक आलेला असून पलीकडच्या तीरावरची तांबड्या फळांनी

लदलदलेली झाडे उन्हात चकाकताना दिसत होती.

" ते कोणतं फळ बुवा ? " बन्याने नेम धरीत विचारले.

" अल्खबुखार मालुम नहीं तुमको ? " असे म्हणून अन्वरही बेचके ताणणार होता. पण एकाएकी त्याची दृष्टी झाडावरून खाली आली अन् तीरावर एकाग्र बनली.

" काय रे झालं, अन्वर ? " बन्याने विचारले. त्याचा नेम तेवढ्यात हुकला होता; आणि आपल्या भात्यातला काटकीचा दुसरा बाण काढून तो धनुष्याला जोडीत होता. इतक्यात त्याचा बाहू पकडून अन्वर म्हणाला "यह अजीब है !— त्या हाऊसबोटीत कुणीतरी राहायला आलेले दिसतात. गेले चार महिने ती बोट नुसती पडली आहे. कुणी मुसाफिर भाड्याने मागायला लागले तर मालक ' बुक्ड !' म्हणून जबाब देतो. "

" असं कुणी चारचार महिने बोट बुक्ड करून ठेवतो वाटतं ? " फास्टर फेणे म्हणाला.

" खोटंनाटं बुक्ड करणारा भुक्कड कोण हा ? " मालीबाईनी विनोद केला.

" है कोई मियाँ गुलाम कादर ! " अन्वरने माहिती दिली.

" मला यात काहीतरी रहस्य असावंसं वाटतं आहे " फास्टर फेणेने स्वताचे मत दिले. " आपण जाऊन पाहू या का ? "

लवकरच या त्रयीने त्या हाऊस बोटीची पिछाडी गाठली. तिथेच ते अल्बुखारचे झाड होते. मालीने एकदा झाडाच्या फांद्यांकडे पाहिले; आणि मग ती खाली पडलेली फळे वेचू लागली. इतक्यात अन्वरचे लक्ष एका खाली आलेल्या फांदीकडे गेले. त्या फांदीला फळांचा एक लहानसा झुपका लटकत होता. अन्वरने तो फांदीला वेंबून काढला. तेव्हा त्या झुपक्यालाच

लागून कसलेतरी चिरगुटही आले. ते तो ओढून काढीत होता, इतक्यात फास्टर फेणेने भुवया संकुचित करीत तिकडे पाहिले.

" पाहू— पाहू— " तो ती चिंधी ओढून म्हणाला. " ब्लॅक्!— हे कसलं कापड आहे, माहीत आहे ? "

" कसलं ? "


" हवाई छत्री. पॅराशूट ! "

" पॅराशूट ! " माली उद्‌गारली. ती जमिनीवर फतकल मारून बसली होती अन् चित्र काढण्यासाठी तिने स्केचबुक उघडले होते.

तिघांनीही डोळे फाडून एकमेकांकडे पाहिले. मग फर्लांगभर अंतरावर सरोवराच्या काठाशी उभ्या असलेल्या त्या हाऊस बोटीकडे पाहिले. तिघांच्याही मनांत एकच संशय आला होता. शत्रूचा छत्रीधारी सैनिक इथे उतरला असावा; झाडात अडकला असावा; आणि मग पॅराशूट ओढून काढताना फांदीला अडकलेली ती चिंधी त्याला दिसली नसावी. कुठे गेला असेल तो पॅराशूटवाला ? अर्थात् त्या हाऊसबोटीत ! इतके दिवस हाऊस-बोट रिकामी का पडली होती त्याचाही त्याच क्षणी उलगडा झाला. खरो-खरीच बोट ' बुक ' केलेली होती. पाकिस्तानी हेराने ' बुक ' केली होती. म्हणजे या ' मैना ' बोटीचा मालक गुलाम कादर मियाँ हाही पाकिस्तानला सामील असला पाहिजे !

" ऐसी बात है ! " अन्वर दातओठ चावून म्हणाला, " तो मियाँ-साहबकी यह मैना पाकिस्तानके बोल बोलती है ?—अच्छा ! "

" तो आत काय करतोय् ते पाहू या का ? " बन्या हळूच म्हणाला. अन्वरला ती कल्पना पटली. मालीला लक्ष ठेवायला सांगून ते दोघे हळूच चोरपावलांनी किनाऱ्याकडे गेले. मग घोटाभर पाण्यांत उतरून त्यांनी मैना



बोटीचा काठ पकडला अन् वर चढून खिडकीचा पडदा सारून आत पाहिले, लगेच त्यांनी पडदा परत होता तसा केला.

आत एका खाटेवर दोघेजण बसलेले होते. त्यांतला एक बोटीचा मालक गुलाम कादर होता हे अन्वरने ओळखले. दुसरा कोणी अनोळखी इसम होता. पण त्याचे कपडे सर्वसाधारण गरीब काश्मिरी माणसासारखे होते. अंगात लांब सैल सदरा, वर लोकरीचे जाकीट, पायांत सुरवार. आपली उंच गोल टोपी त्याने खाली काढून ठेवली होती. शेजारीच एक दुर्बीण पडली होती. त्या इसमाचे नाक लांब होते अन् त्याच्या टोकावर एक पुटकुळी होती. कल्ले नि मिशा मोठ्या लांब, ऐटबाज होत्या. त्याने आपल्या पुढ्यात एक मोठा नकाशा पसरला असून बोटाने तो गुलाम कादरला काहीतरी दाखवीत होता. त्यांचे संभाषण काश्मिरी भाषेत चाललेले असले तरी मध्येच उर्दू वाक्ये डोकावत होती. आपण मात्र ते मराठीतच समजून घेतलेले बरे :

" मनसुबा ऐसा है ! " पाहुणा समारोप करीत होता. " पण त्याच्या आधी आदमपुऱ्यात जाफर कंपूला निरोप पाठवणं जरूरी आहे.—कुतुब घरी नाही म्हणतोस ? "

" नाही. पेहेलगामला मॉसीकडे गेलाय तो. "

" अरे–अरे ! आणि तुला तिकडे धाडण्यात अर्थ नाही. हे काम एखाद्या पोऱ्यालाच करायला लावलं पाहिजे.—काय करावं ? "

" जाफर कंपू काय ? " अन्वर आपल्याशी पुटपुटला. " अच्छा ! उनकी तलाश करेंगे – लेकिन ठीक जगह मालुम होती तो—"

" काय करावं ? " म्हणून तो अनोळखी इसम डाव्या तळव्यावर उजव्या हाताची मूठ आपटीत असतानाच हे चोर श्रोते खाली उतरले आणि पुन्हा किनाऱ्यावर आले. झुडपांच्या गर्दीत एक आडोशाची जागा पाहून ते खाली बसले. काही क्षण दोघेही एकमेकांकडे डोळे फाडफाडून पाहात स्तब्ध बसले होते. मग फास्टर फेणे म्हणाला, " आपल्याला काहीतरी केलंच पाहिजे. – पण ही जागा बेटी शहरापासनं फार दूर एकीकडे आहे. इथे कुठे फोनही नाही. निरोप पोचवायचा म्हटला तरी अर्धा तास लागेल. तेवढ्यात पाखरं उडून जातील. "

" काही नाही उडून जात. त्यांच्या बोलण्यावरून त्यांचा एवढ्यात इथून हलवण्याचा बेत दिसत नाही " अन्वर म्हणाला, " अरी यार ! मेरे दिमागमें एक आयडीआ आई है ! "

" अचरजकी बात है ! " फास्टर फेणेने टोला हाणला.

" आपण असं करू या— " अन्वर त्याच्याकडे दुर्लक्ष करून म्हणाला. " त्यांना कुणीतरी पोऱ्या हवा आहे ना ? ठीक ! मी बनतो तो पोऱ्या ! आपल्याला जसं काही पाकिस्तानबद्दल भयंकर प्रेम आहे असं मी नाटक करतो. "

" एकपात्री नाटक? की आम्ही पण त्यात भाग घ्यायचा?" मालीने स्टेजवर प्रगट होऊन विचारले. इतका वेळ ती कुठे गुल झाली होती कोण जाणे!

" नहीं— नहीं! हालमें तो मैं अकेला नाटक करूंगा. तुम्ही दोघं इकडली आघाडी संभाळा— "

आणि मग त्यांच्यांत आणखी थोडी कुजबुज होऊन अन्वर आपले नाटक वठवण्यासाठी ' मैना ' बोटीच्या अगदी जवळ किनाऱ्यावर जाऊन बसला. खिशातून त्याने मघाचे ते पत्रक काढले अन् उलगडून मोठमोठ्याने वाचायला सुरवात केली.

माली म्हणाली, " बन्या, मला पण एक आयडीआ सुचली आहे. " आणि आपल्या चित्रवहीतले एक पान फाडून तिने त्याच्या पुढे धरले. त्यावर तिने पेन्सिलीने ठसठशीत अक्षरात लिहिले होते— " पॅराशूट गनीम छिपा है. हाऊस बोट ' मैना, ' दाल लेक पश्चिमी किनारा " खाली तिने या तीन शिलेदारांची नावे लिहिली होती.

" तुम्ही खिडकीतून डोकावत होता तेव्हा मी फर्लांगभर त्या दुसऱ्या बाजूला जाऊन आले. तिथून झेलम नदीचं पात्र स्पष्ट दिसतं. इतकंच नाही तर आपली रोशनअरा हाऊसबोट पण स्पष्ट दिसली.— बन्या, तुला इतक्या दूर बाण मारता येत असेल, तर—"

" चल—चल आधी– " असे म्हणून बन्या उड्या मारीत तिच्या बरोबर गेला.

सुमारे दोनशे पावले चालल्यावर ती दोघे झाडीतून बाहेर पडली ती डाल सरोवराच्या दुसऱ्याच एका काठावर. ही बाजू अंमळ उंचावर असून इथून झेलम नदीची नागमोड खरोखरीच स्वच्छ दिसत होती.

" ती पाहिलीस रोशन आरा ? " मालीने हाऊसबोटीकडे बोट दाखवीत म्हटले.

बन्याची जीभ टाळ्याला चिकटली आणि तिने ' ट्रॉक 'चा पेटंट घोष केला. तो म्हणाला, " तसं फारसं दूर नाहीय. आहे. मी प्रयत्न करून पाहतो. "

मालीने एका दगडाभोवती चिठ्ठी गुंडाळली होती. आपल्या वेणीतल्या आगवळाचे तिने दगडावर ठेचून पाचसहा तुकडे केले; एका तुकड्याने चिठ्ठी पक्की बांधली. बन्याने तो कागदात बांधलेला दगड घेऊन बाणाच्या टोकाला टाचला आणि एक डोळा बारीक करून नेम धरला.

पण बन्या उर्फ फास्टर फेणे नेमबाजीत कुशल असला तरी अजून अर्जुनाच्या किंवा रॉबिन हुडच्या पातळीला पोचलेला नव्हता. मालीला आपल्या बहुमोल वहीचे तीन कागद फाडावे लागले, तीन चिठ्ठ्या लिहाव्या लागल्या, अन् बन्याला तीन वेळा तिरंदाजी करावी लागली. तिसरा दगडमात्र बरोबर रोशनआरा बोटीच्या खिडकीवर आपटला अन् तावदान फुटलेले त्यांना दिसले. लगेच आतून काही माणसे आलेलीही त्यांनी पाहिली.

" काही माणसं का ? मामा, किणीकाका नि अन्वरचे आब्बाजानच आहेत की ते ! " बन्या उद्गारला.

' रोशन आरा 'चा मालक शमसुद्दीन जे हातवारे करीत होता त्यावरून तो चिडला असावा. त्यालाही कोणा तरी व्रात्य पोरांची खोडी वाटली असावी. पण तेवढ्यात खाली वाकून त्याने जेव्हा ती दगडाची पुरचुंडी उचलून हातात घेतलेली बन्याला दिसली तेव्हा त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला.

दगडाभोवतालचा कागद उलगडून त्याने किणीकाकांजवळ दिलेला बन्याने पाहिला अन् लगेच मालीचा हात पकडून तो म्हणाला, " हे ट्राळी ! "

इकडे अन्वर एकटाच हातात ते पत्रक घेऊन एका खडकाला टेकून मोठमोठ्याने आपल्याशीच वाचीत बसला होता. मग त्याने खिशातून बाजा काढला अन् तो तोंडात घालून वाजवायला सुरवात केली. भारतद्वेषाने बरबटलेल्या एका गाण्याचे ते सूर होते. अन्वरला ते गाणे सबंध येत नव्हते, किंवा ते जाणून घेण्याची त्याची इच्छाही नव्हती. पण सहा महिन्यांपूर्वी श्रीनगरात पडलेल्या एका छाप्याच्या वेळी पोलिसांनी पकडलेल्या एका कैद्याच्या तोंडून त्याने हेच सूर ऐकलेले होते; आणि तथाकथित आझाद काश्मीरवाल्यांचे ते एक पेटंट गाणे असावे असा त्याने तर्क केला होता.

तो तर्क खरा असल्याचे त्याच्या लवकरच अनुभवाला आले. कारण हाऊसबोटीचे दार उघडून तो अनोळखी पाहुणा बाहेर आला होता. क्षणभर स्तब्ध उभा राहून त्याने अन्वरकडे पाहिले. अन्वरने प्रथम त्याच्याकडे लक्षच दिले नाही. मग एकाएकी जणू त्याच्या लक्षात आले की पाहुणा आपल्याकडे पाहतो आहे. तत्क्षणी चपापून त्याने जीभ चावली; गाणे बंद केले, बाजा आपल्या खिशात कोंबला आणि उठून पळून जाण्याची तयारी केली. पण पाहुण्यांनी तेवढ्यात दोन उड्या मारून त्याचा दंड पकडला होता.

“ घबराना मत ! ” तो हलक्या आवाजात म्हणाला. आणि त्याच्या हातातले पत्रक घेऊन त्याने विचारले, “ यह किधर मिला ? ”

अन्वरची आता भीतीने जणू बोबडी वळली होती. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. तो नुसताच त-त प-प करू लागला. त्याने पटकन् पत्रक हिसकावून घेतले अन् फाडून त्याच्या चिंध्या वाऱ्यावर उडवून दिल्या. मग पुन्हा ओढाताण करून तो निसटण्याचा प्रयत्न करू लागला.

“ मैंने कहा न—घबराने की कोई जरूरत नही !—” पाहुणे त्याचा दंड न सोडता दुसऱ्या हाताने त्याची पाठ गोंजारीत म्हणाले, “ तू बहादूर लडका दिखता है. मेरा एक काम करोगे ? ”

" हां–हां–हां—" अन्वर घामाने गडबडला होता. आपली मुंडी हल-वीत त्याने कसाबसा होकार दिला.

" आदमपुरेमें कल्लूकी कोठी मालुम है तुझे ? "

" हां–हां—" अन्वर आपला घाम पुसून म्हणाला. " मैं उधरकाही रहनेवाला हूँ. "

" तो बहोत अच्छी बात है ! होडी वल्हवता येते तुला ? "

" आसानीके साथ ! " अन्वरने गर्वाने उत्तर दिले. त्याची भीती जशी काही हलके हलके ओसरत चालली होती.

" तो यह और एक अच्छी बात है !—हमारी हाउसबोटकी एक डोंगी है, वह ले जाना. एकदम फास्ट जा कल्लूकी कोठीवर आणि आमची ही चिठ्ठी पोचव.—हे घे तुला खाऊला पैसे ! "

खिशातून एक पाच रुपयेवाली नोट त्याने काढली होती. पण ती त्याने गडबडीने परत पाकिटात घातली. त्याचे कारण अन्वरला तेव्हाच कळून चुकले. ती हिरवी नोट पाकिस्तानची होती.

दुसरी पाचाची नोट त्याने अन्वरच्या हातात दिली तेव्हा अन्वरने साळसूदपणे विचारले, " क्यों ? वह चलता नहीं ?—अच्छा नया कोरा तो है ! "

" हां—लेकिन आज चलती नहीं ! थोडे दिनोंमें चलेगी ! " पाहुणे आसुरी हास्य करीत उत्तरले. " एवढं काम तू फतेह कर अन् सांगायला ये. तुला आणखी पाच रुपये देईन. "

अन्वरने डोंगीत उडी टाकली; तेव्हा त्याने हलवलेला हात पाहुण्यांनी पाहिला आणि " सलाम, साब ! " असे त्याचे शब्दही त्यांच्या कानांनी

मोठ्या खुपीत ग्रहण केले. पण अन्वर त्या वेळी दातओठ चावीत होता आणि त्याने उच्चारलेले शब्दही " सलाम साप " असे होते, हे त्या मानवी भुजंगाला कळले नाही एवढे बरे झाले.

" मेरा काम हो गया ! " पाहुण्यांनी हाऊसबोटीत प्रवेश करून मोठ्या आनंदाने घोषणा केली. " बहोत तेज लडका मिला चिठी पहुँचानेके लिये ! "

" कौन लडका ? " गुलाम कादरने डोळे वटारीत विचारले. " आणि कसा गेला तो चिठ्ठी घेऊन ?—पैदल ? "

" पैदल नहीं— तेरी डोंगीमें " स्वतःशीच खुदू खुदू हसत पाहुणे म्हणाले.

" मेरी डोंगी ?—मेरी डोंगी क्यौं दे दी तुमने—तुला माहीत नाही इथले लडके किती शैतान आहेत ते ? कोण छोकरा हा ? तुझ्या पहचानीतला तरी होता ? "

" नहीं ! लेकिन फिक्र मत करो ! बहोत अच्छा होश्शार लडका था ! —पाकिस्तानसे खास प्यार करता है. अरे भई, ऐसे कई लडके होंगे इस कश्मीरमें—जो आँखें मूँदकर सपने देख रहे हैं अपनी आज़ादीके ! "

" अरे, खड्डेमें गई तेरी पाक आज़ादी !—यहाँ आज़ादी नहीं तो क्या है ?—तुला काय वाटतं तुला इथे कुणी धूप घालणार आहे ? पाकिस्तानमधली आज़ादी म्हणजे काय चीज आहे त्याची खबर आहे सगळ्यांना. म्हणे लडके सपने बघत असतात ! " शेवटचे वाक्य गुलाम कादरने चक्क वेडावून म्हटले.

पाहुणे चरकले. एक क्षणभरच त्यांना अशी भीती वाटली की हा आपल्यावर उलटतो की काय ? पण नाही—तसे नाही, जरा दमबाजी केली की येईल ताळ्यावर !

ते म्हणाले, " इतकी वखवख करतोस तर आम्हाला मिळालास तरी कशाला रे ? "

" पैशासाठी—दुसरं काही नाही !—बोल, माझी डोंगी का दिलीस त्या कार्ट्याला ? "

पाहुण्यांना वाटले, हा आपल्याला मारायला येतो की काय ? एक पाऊल मागे घेऊन आपल्या हातातली दुर्बीण त्याच्याजवळ देऊन ते घाईघाईने म्हणाले, " तूही देख अपनी आँखोंसे !—इतका दूर गेला आहे तो पोऱ्या, की आता वखवख करण्यात हासिल नाही. त्याला करू दे आपलं काम; मग तू माझा इन्साफ कर ! "

गुलाम कादरने त्याच्या हातातली दुर्बीण हिसकावून घेतली अन् डोळ्यांना लावली. पाच सहा सेकंदांतच त्याच्या तोंडून " माशाल्ला ! " असा उद्गार निघाला.

" क्यौं ? क्या हुआ ? "

" अरे भई ! वह लडका कौन है, जानते हो तुम ? "

" कौन ? "

" अन्वर !—शमसुद्दीनका लडका ! पक्के नॅशनलिस्ट लोग ! तुम्हारे पाकवालोंके कडे दुश्मन. "

" अरे, क्या कहते हो ! " पाहुण्यांची एकच तिरपीट उडाली. " चल जल्दी ! अपना शिकारा निकाल. उसका पीछा करेंगे हम ! "

फास्टर फेणेने बाहेरून हा सर्व संवाद ऐकला होता. त्याने पुढल्या कृती अतिशय त्वरेने केल्या.

मालीला तो शॉर्टहॅण्डमध्ये म्हणाला, " तू पळ गावाच्या दिशेने ! कुणीही

माणूस दिसला तरी त्याला पुकार अन् इथे हेर आल्याची खबर दे! मी त्या बदमाषांचा बंदोबस्त करतो!"

"पण जपून बरं का बन्या?" असे म्हणून मालीने शॉर्टहॅण्डचे 'लॅंगलेग' मध्ये रूपांतर केले.

ती तिकडे पळाली अन् बन्या हाऊसबोटीत घुसला. शिकारा त्वरेने निघालेला त्याने आधीच पाहिला होता. पाहुण्यांच्या धोकटीतल्या छोट्या शस्त्रांची त्याने झटपट पाहाणी केली. हो— स्वताचे संरक्षण करण्याची पाळी आली तर असावं जवळ, म्हणून एकदोन हात बॉंब उचलून त्याने खिशात कोंबले. पुन्हा किनाऱ्यावर येऊन त्याने सदरा काढला; "जय बलभीम!" म्हणून गर्जना केली अन् आपले लुकडे दंड थोपटून पाण्यात बुडी मारली.

सपाट्याने सूर मारीत तो शिकाऱ्याच्या मागे निघाला.

नंतर जवळ जवळ वीस मिनिटे बन्या फास्ट—फास्टर—फास्टेस्ट पोहत होता. पण शिकाऱ्यात बसलेले गुलाम कादर नि पाहुणे इतक्या वेगाने वल्ही मारीत होते की आपल्याला त्यांना गाठणे शक्य नाही हे त्याने आता ओळखले. त्याचा दम कोंडायला लागला आणि नाकातोंडात पाणी शिरून आपण बुडतो की काय अशी त्याला भीती वाटू लागली. पण काही झाले तरी सावज हातचे निसटू द्यायचे नाही असा त्याचा निर्धार होता. काही तरी तातडीचा उपाय करणे भाग होते.

बन्याचा हात आपसूक खिशाकडे गेला. हातबॉंब त्याने बाहेर काढला. पण तो फेकण्यापूर्वीच त्याचा हात थबकला. झुरळे मारावीत तशी माणसे मारलेली त्याने रणांगणावर पाहिली होती; पण चालू घटकेला तरी हे युद्ध नव्हते. एखाद्यावर गोळी झाडणे, बॉंब फेकणे हे कृत्य सात्त्विक माणसाच्या

हातून सहजासहजी वडत नाही. त्याचे हात आपोआप लटपटतात. बन्याचेही तसेच झाले. बाँब फेकायला हात धजेना. तो हातबाँब त्याने परत पँटीच्या खिशात घातला आणि पुन्हा हात मारायला सुरवात केली.



पण आता क्षणोक्षणी त्याचा थकवा वाढत होता; आणि शिकाऱ्यातली शिकार तर दूर दूर पळत होती.

काय करावे, बन्याला सुचेना. डोळ्यांत गेलेले पाणी निपटून तो एक चूळ टाकतो आहे तोच सूं-सूं करीत एक गोळी आली आणि त्याच्या अगदी जवळ पाण्यात घुसली.

दचकून बन्याने समोर पाहिले. शिकाऱ्यातले प्रवासी आत पालथे पडले होते आणि शिकाऱ्याच्या नक्षीदार कठड्यात पिस्तूल घालून पाहुणे सटासट गोळ्या झाडीत होते. तलावाचा हा भाग निर्जन असल्यामुळेच की काय त्याने हे साहस केले होते.

" असं काय ? " बन्या पुटपुटला. " मी तुझा पाठलाग करतोय हे कळलं वाटतं तुला ?—गुड ! "

फास्टर फेणेला एकदम त्वेषाची नवी उबळ आली. त्याने पाण्यात डोके खुपसले अन् पाण्याखालून पोहत पोहत, गोळीबार चुकवीत तो शिकाऱ्याला बगल देऊन पुढे गेला. नंतर क्षणाचाही विलंब न लावता त्याने खिशातला हातबॉंब काढून शिकाऱ्याच्या पुढल्या भागावर भिरकावला.

शक्य तो प्राणहानी होऊ नये, शिकाराच फुटावा, अशी बन्याची इच्छा होती. ती सफळ झाली. दुसऱ्याच क्षणी मोठा स्फोट होऊन शिकाऱ्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. दोघेही प्रवासी पाण्यात पडले. त्यांना कोणतीही इजा झाली नव्हती. ते पाण्यावर धडाधड हात मारून एखादी फळी पकडण्याचा प्रयत्न करीत होते. पण तो प्रयत्न फसला. कारण त्याच वेळी सायरेन वाजवीत एक मोटरलॉंच तुफान वेगाने समोरून आली. तिच्यात सशस्त्र पोलिस होते. त्यांनी पाण्यात उड्या टाकून तावडतोब दोघांही गुन्हेगारांना पकडाव केले. त्या झटपटीत पाहुण्यांचे कल्ले तर पाण्यावर वहात गेलेच, पण नाकावरची ती पुटकुळीही विरघळून गेली !

एक पोलिस पोहत पोहत बन्याजवळ गेला, आणि त्याला धरून त्याने आपल्या लॉंचवर नेले. बन्याची शुद्ध तोपर्यंत गेली होती.

" बुच्चे लोग ! यू हॅव्ह डन ए ग्रेट जॉब ! " पोलिस इन्स्पेक्टर सैद महंमद फास्टर फेणेला, मालीला नि अन्वरला शाबासकी देत म्हणाले. " हाऊसबोटवाला गुलाम कादर अन् तो जासूस दोघे तर गिरफदार झालेच, पण कल्लूकी कोठीवरही यशस्वी छापा घातल्याचा आताच फोन आला. " त्यांनी फोनचा रिसीव्हर नुकताच खाली ठेवला होता. त्यांची मुद्रा गंभीर बनली होती.

बन्या नुकताच शुद्धीवर आला होता आणि आपण पोलिस ठाण्यावर आहोत असे त्याच्या हळूहळू लक्षात आले होते. त्याच्या सभोवती ओळखीचे

चेहरेही खूप जमले होते. मामा, मामी, किणीकाका, शमसुद्दीन, अन्वर, माली आणि दुसरी पण चार-पाच पोरे ! आपल्या पोरट्यांनी जी बहादूरी गाजवली तिचे वर्णन ऐकून मामांची छाती अभिमानाने फुल्ली होती. बन्या लवकरच कॉफी पिऊन ताजातवाना झाला. त्याच्या डोक्यावरून प्रेमभराने हात फिरवीत मामा म्हणाले, " ए ग्रेट जॉब—अँड ए ग्रेट बिगिनिंग टू !— पोरांनो, इन्स्पेक्टरसाहेबांनी तुम्हांला अजून सांगितलं नाही. मी सांगतो. आत्ताच आलेल्या ताज्या बातमीवरून असं कळतं की पाकिस्तानने भारताशी जवळजवळ युद्ध पुकारलं आहे; आणि शास्त्रीजींनी जे भाषण केलं त्यावरून असं स्पष्ट दिसतं की अयूब सरकारची नांगी पुरेपूर ठेचल्याखेरीज आपले जवान आता स्वस्थ बसणार नाहीत ! "

यावर बन्या ऊर्फ फास्टर फेणे उजवा हात वर करून ओरडला, " जय हिंद ! "

आणि त्याला साथ देणारी घोषणा सर्वांच्याच मुखातून बाहेर पडली. " जय हिंद ! "

ट्रिंग— ट्रिंग— पुन्हा एकदा फोन वाजला. आता फोन सारखाच वाजणार होता. सारखेच होणार होते—" ट्रिंग—ट्रिंग ट्रिंग—ट्रिंग—! " फा. फे. स्वताशी पुटपुटला, " की डिढिंग—डिढिंग ? "

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६०८५ नों. दि ९६/०१/०७
वि. क्री-९१

IRBK-0116085